म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
REFBK-0003131

सन १९२६

मराठी ग्रंथ संग्रहालय

ग. स. पिपुरकर

यांजकडून

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ता.
ठा. न.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.
ठाणे

५।२।३८

ॐ

श्रीराम

# चितळेभट्ट प्रकरण

लेखक

रामकृष्ण सदाशिव पिंपुटकर

संपादक–आत्मोद्धार

[illegible], न्यॅशनल कॉलेज, कलकत्ता.

ग्रा. क्र. 3939

प्रकाशक

गणेश सदाशिव जोशी, बी. कॉम्.

खांडके बिल्डींग दादर–मुंबई

REFBK-0003131

शके १८४८.] [ एप्रील १९२६.

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Press,
318 A, Thakurdwar, Bombay.

ॐ

श्रीराम

# प्रस्तावना.

इतिहाससंशोधक राजवाडे यांचा "देवरुखे यांची मूलोत्पत्ति" हा लेख भारत इतिहास संशोधक मंडळाच्या इतिवृत्तांत प्रसिद्ध झाल्यानंतर आमचे कांहीं स्नेही दोन चार वेळ भेटले. या वेळीं हा लेख व त्याविषयीं त्यांचें मत काय झालें तें त्यांनीं निवेदन केलें. पण त्यावेळीं त्यांचे म्हणण्याची आम्ही उपेक्षाच केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण थोडक्याच महिन्यांपूर्वी ज्ञानकोशांतील देवरुखे या सदराखालील मजकूर प्रसिद्ध झाल्यानंतर दुसरे दोन चार स्नेही भेटले. पण हे दोन लेख त्यांस इतके मर्मी लागलेले दिसले कीं त्यामुळें हे दोन लेख आम्ही पुनः शांतपणें वाचून पाहिले. इतक्यांत देवरुखे समाजाला या गोष्टी अत्यंत लागलेल्या असून त्यामुळें अस्वस्थता व असंतुष्टता पसरलेली असल्याचें आढळून आलें. याकरितां पुष्कळ स्नेही मंडळीच्या आग्रहावरून "देवरुखे" समाजाची खरी बाजू काय आहे ती अशा वेळीं पुढें मांडली जावी या बुद्धीनें आम्ही प्रवृत्त झालों आहों.

अशा वेळीं पुण्याचे श्रीयुत भिकाजी मोरेश्वर मांदुस्कर यांनीं आपल्या कागदपत्रांतील अत्यंत उपयुक्त अशी माहिती पुरविली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोंत. सध्यां जी कांहीं माहिती हातीं आली आहे तेवढ्यावरच भागवून घेऊन न थांबतां पुढें चालावयाचें आहे.

आमच्या अखिल राष्ट्राची उन्नत्ति व्हावी या हेतूनें आज आम्ही हिंदवासी जन अनेक प्रकारें धडपड करीत आहोंत. पण या आमच्या आर्यभूमीच्या नष्टचर्येचे दिवस अद्याप संपलेले नाहींत कीं काय कोणास ठाऊक! अशा अवस्थेंत जातीजातींमधील द्वेषाला

व मत्सराला अवकाश मिळणें ही तर अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय. कित्येक वेळ ज्या गोष्टी आवडत नाहींत, नको असतात, किंबहुना घातक आहेत असें वाटत असतें, इतकेंच नव्हे, तर त्या टाळण्याचा शक्य तो प्रयत्नहि चाललेला असतां त्या 'आपला पाठलाग करीत 'दत्त' म्हणून समोर येऊन उभ्या रहात असतात हेंच खरें.

प्रथमतः या गोष्टीची उपेक्षाच करावी या मताचे आम्ही होतों- परंतु कोणत्याहि गोष्टीचा त्रास अगर उपद्रव हा विशेषतः गरीब अगर सामान्य अवस्थेंतील लोकांनाच जास्त होत असतो. दुसरें असें कीं रा० राजवाडे व ज्ञानकोशकार यांनीं लिहून ठेविलेल्या या गोष्टी पुढील पिढयांना अत्यंत जाचक व नडीक होण्याचाहि संभव आहे. म्हणून आमच्या कित्येक स्नेहीमंडळीप्रमाणें एकंदर परिस्थिति विचारांत घेतां अत्यंत दुःखानें, कष्टानें, खेदानें हा ओढवलेला प्रसंग शिरावर घेणें भाग पडत आहे.

उंबरगांव,<br>
हनुमज्जयन्ती,<br>
चैत्र शके १८४८.

रा. स. धिंपुटकर.

---

## अनुक्रमणिका.


| | | पृ |
|---|---|---|
| १. | निषयानुसंधान ... ... ... ... | १ |
| २. | निर्णयपत्र कीं चिटोरें ? ... ... ... | ६ |
| ३. | चितळेभट्टपक्ष ... ... ... | १३ |
| ४. | देवरुख्यांची प्रखर तेजस्विता ... ... | १५ |
| ५. | देवरुखे आले कोठून ? (सं. राजवाड्यांचें मत)... | ३५ |
| ६. | देवराष्ट्रीय कीं देवर्षि ? ... ... ... | ३९ |
| ७ | देवरुखे शब्दाची उपपत्ति. ... ... | ४५ |
| ८ | देवरुखे यांचें वसतिस्थान. ... ... | ४७ |
| ९. | ज्ञानकोश ... ... ... ... | ५८ |
| | परिशिष्ट—पत्रें. ... ... ... ... | ७६ |

ॐ

श्रीराम

भाग १ ला.

# विषयानुसंधान.

शके १८३६ ( इ. स. १९१४ ) च्या भा. इ. सं. मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तांत इतिहास संशोधक वि. का. राजवाडे यांनीं " देवरुखे यांची मूलोत्पत्ति " या मथळ्याखालीं स्वदस्तुरचा एक लेख छापून प्रसिद्ध केला आहे. आणि नुकतेंच कांहीं महिन्यापूर्वी त्यांचीच ' री ' अधिक ताणून ' ज्ञानकोशकारांनीं आपल्या ज्ञानाचा कोश कांहींसा वृद्धिंगत केलेला आहे. आणि तेथें त्यांनीं या विषयाची सिद्धता करून त्याची पूर्तता केली आहे. हा सर्व मजकूर देवरुखे समाजास अत्यंत असंबद्ध, निर्भर्त्सनायुक्त, व उद्वेगजनक असा वाटणें हें अगदीं साहजिक आहे.

संशोधकांचा सदर लेख व ज्ञानकोशकारांचा देवरुखे या सदराखालील मजकूर यांचा खरा प्रकाश इतर समाजांच्या हृदयांत झटकन व स्पष्टपणें पडणें म्हणजे मुद्दाम बाजूच्या आडवळणीच्या गांवीं जाऊन पुनः आपल्या पुढच्या सरळ मार्गाला लागण्यासारखें आहे. कारण दुसरा मनुष्य हा मजकूर मुद्दाम काढून कोण कशाला पहात बसतो ? इंग्रजींत एक म्हण आहे कीं, जोडा ( बूट ) कोठें चांवा घेत असतो हें तो घालणारालाच बरोबर कळत असतें. त्याची यथार्थ कल्पना इतरांना येऊंच शकत नाहीं. मोठमोठे लोक म्हणजे विशेषतः कवी, गवई, चित्रकार, मुत्सद्दी किंवा एकाच विषयाला ज्यांनीं वाहून घेतलेलें आहे असे मोठमोठे लोक हे एकदा

आपल्या विवेकलहरींत आले म्हणजे पुष्कळ वेळ त्या त्यांच्या कल्पना व ते त्यांचे तर्क मोठे मुद्देसूद व उपकारक असतात. पण कित्येक वेळ तर असे प्रसंग येतात कीं त्यांना अगदीं दुसऱ्या टोंकाला नेऊन बसवावें लागतें. आणि त्यांतहि अशा वेळीं त्यांच्यामध्यें एखाद्या विकाराचा प्रादुर्भाव झालेला असला म्हणजे कांहीं विचारूंच नका. इतिहाससंशोधकांनीं आपल्या लेखाला "देवरुखे यांची मूलोत्पत्ति" असा जो मथळा दिला आहे त्यापेक्षां "देवरुखे यांचें मूलस्थान" अगर 'आद्यस्थान' निदान 'पूर्व-स्थान' असा मथळा दिला असता तर त्यांच्या लेखांतील मजकुराच्या दृष्टीनें तें यथार्थ झालें असतें. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुण-कर्मविभागशः।" या न्यायानें स्वतः परमेश्वरानेंच प्रथम चार वर्ण निर्माण केले. पुढें याच चार जाती मुख्य राहून त्या आरंभापासून सिद्धच आहेत. त्यांना अन्य कोणीं उत्पन्न केलेलें नाहीं. अगर अन्य कांहीं बाह्य कारणामुळें त्या उत्पन्नहि झालेल्या नाहींत. याच चार जातींपासून पुढें अनेक जाति उत्पन्न झाल्या आहेत. जाति अगर जातिवाचक शब्द याच्या षष्ठयंत रूपाच्या पुढें उत्पत्ति या शब्दाची योजना केली म्हणजे त्या शब्दयोजनेवरून बीज अगर क्षेत्र यांच्यांत बदल होऊन अगर अन्य कांहीं कारणामुळें म्हणा, पूर्वींच्या सिद्ध असलेल्या जातींत या एका नवीन जातीची उत्पत्ति होऊन नवीन भर पडलेली आहे असा बोध अगर गर्भितार्थ निघत असतो. संस्कृतांत व सह्याद्रिखंडासारख्या पौराणिक ग्रंथांत देव-रुखे यांना 'देवर्षि' म्हणून म्हटलें आहे. या ग्रंथांनंतरच्या भाषें-तहि देवरुखे यांना 'देवर्षि' या नांवानेंच संबोधिलें आहे. या ग्रंथांत इतर कित्येक पोट जातींच्या उत्पत्तीचीं प्रकरणें दिलेलीं आहेत. पण त्याप्रमाणें "देवरुखे" या पोट जातीचें प्रकरण कोठेंहि

आढळून येत नाहीं. यावरून असें ठरतें कीं, 'देवर्षि' ऊर्फ देवरुखे ही जात मागाहून अन्य कारणानिमत्त उत्पन्न झालेली नसून वर निर्देश केल्याप्रमाणें मूलभूत चार जातीपैकींच ब्राह्मण जात होय.

इस्लामपुरचे रा. मुंडले यानीं शिरोळें येथील एका देशपांड्याचे कांहीं कागद आमच्या इतिहाससंशोधकांच्या स्वाधीन सहजगत्या केले असें ते म्हणतात. त्यानंतर संशोधकाचें पुढें असें म्हणणें आहे कीं "त्या कागदांत एक पंक्तिपावनत्वाबद्दल कागद सांपडला. देवरुखे हे पंक्तिपावन ब्राह्मण आहेत किंवा नाहींत या बाबीसंबधींचा ज्यांत ऊहापोह आहे असा हा कागद आहे." याच कागदाला पुढें ते निर्णयपत्र म्हणत असून "या निर्णयपत्रांत देवरुखे हे पंक्तिपावन ब्राह्मण नाहींत असा निकाल दिला आहे," असा त्यांतील सिद्धान्त निवेदन करीत आहेत.

या त्यांच्या निर्णयपत्राच्या (?) कागदाचे दोन भाग पडतात. एक पत्राचा मुख्य मजकूर व दुसरा भाग म्हणजे त्याच्यापुढें लिहिलेले पुराणांतील श्लोक. पत्राच्या मुख्य मजकुरांत फक्त "देवरुखे" हा एकच शब्द उपयोगांत आणिला आहे. त्यांत 'देवराष्ट्राः' किंवा 'देवराष्ट्रीयाः' हा शब्द मुळीं आलेला नाहीं. 'देवर्षि' या शब्दाचा उपयोगहि मुद्दाम टाळलेला दिसतो. पण या सोपारें येथील पत्राच्या शेवटीं केवळ कांहीं श्लोक लिहून काढले म्हणजे तेवढयावरून त्या श्लोकांतील 'देवराष्ट्राः' व 'देवराष्ट्रीयाः' म्हणजेच 'वरुखे' असें ठरवितां येईल काय? फार तर तेवढयावरून सोपारें येथील चार ब्राह्मणांचीं कल्पना तशी असावी असें अनुमान करतां येण्यासारखें आहे. पण कोठेंहि सारासार विचार असतोच कीं नाहीं ?

त्या त्यांच्या सोपारें येथील निर्णयपत्राच्या कागदांतून संशोधकांनीं संस्कृत श्लोक आपल्या लेखांत उद्धरून घेतले आहेत. त्यांत "देवराष्ट्रीयाः" हे अपांक्त आहेत व "देवराष्ट्राः" हे पंक्तिदूषक आहेत असें म्हटलें आहे. व त्यावरून या निर्णयपत्राच्या कागदामधील पत्रव्यवहार करणाऱ्या ब्राम्हणांप्रमाणेंच "देवराष्ट्रीयाः" व "देवराष्ट्राः" म्हणजेच आधुनिक मराठींत ज्यांना देवरुखे म्हणतात तेच हे लोक होत असें त्यांच्याविषयीं संशोधक राजवाडे यांनींहि आपले मनाशीं ठरविलें आहे. या पंक्तिपावनत्वाशीं आपल्याला सध्यां कांहीं कर्तव्य नाहीं, ( पण मग पुनः केव्हांतरी कर्तव्य होईल वाटतें ? ) असा मध्येंच एक शेरा मारून—पण देवरुख्यांविषयीं शक्य त्या विरुद्ध गोष्टी सांगून व "पाटीलबुवा गवताच्या गंजीमागें लपून राहिले आहेत पण आपल्याला नाहींरे बुवा ठाऊक" या गोष्टीची आठवण करून देऊन–संशोधक सदर निर्णयपत्रांतील मजकुराच्या साहाय्यानें त्यांत अलाहाबाद येथील स्तंभलेखाची भर घालून ऐतिहासिक बाबी काय काय निष्पन्न होतात तें पहाण्याकडे वळलेले आहेत. शेवटीं त्यांच्या निर्णयपत्राच्या कागदालाच बळकटी देऊन "देवराष्ट्र" या शब्दापासून देवरुखे किंवा देवरखे हा शब्द कसा काढतां येतो याची उपपत्ति दाखविण्याचा प्रयत्न करून संशोधकांनीं आपला लेख संपूर्ण केला आहे. याच्याचपुढें त्यांनीं सोपारें येथील त्यांच्या निर्णयपत्राचा कागदहि जोडलेला आहे.

सदरहु निर्णयपत्राच्या आधारें संशोधक राजवाडे यांनीं जे कित्येक ऐतिहासिक मुद्दे काढून इतिहासाचा कांहीं भाग जुळवून दाखविलेला आहे त्या सर्व मुद्यांविषयीं येथें आम्हांला ऊहापोह करावयाचा नसून केवळ 'देवरुखे' यांच्या विषयीं त्यांनीं जे सिद्धांतरूप तर्क बांधलेले आहेत व सोपारें येथील त्यांच्या निर्ण-

नो. ने ५८८४८

विषयानुक्रम.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. ५... नं. ...

यपत्रांतील जे मुद्दे काढून दाखविले आहेत व जे मुद्दे सहजगत्या निदर्शनास आणिले आहेत तेवढ्यापुरताच येथें विचार करावयाचा आहे. ते मुद्दे हेः--( १ ) शिरोळे येथील कुलकर्णी देशपांड्यांकडील ' देवरुखे ' यांचे संबंधीं सांपडलेल्या कागदाला संशोधक निर्णयपत्र म्हणून म्हणत आहेत. ( २ ) सोपारें येथील ब्राह्मणांनीं ' देवरुखे ' हे पंक्तिपावन ब्राह्मण नाहींत असा दिलेला निकाल; व त्याच्या पुष्टयर्थ उद्धरून घेतलेलीं वाक्यें व संस्कृत ग्रंथ व पुराणांतून यांना देवराष्ट्रीय म्हणत हें राजवाडे यांचें मत. ( ३ ) 'देवरुखे' ऊर्फ 'देवराष्ट्रीय' किंवा 'देवराष्ट्र' हे कुबेरराजाच्या आश्रयानें राहणारे 'ब्राह्मण' देवराष्ट्र नांवाच्या देशांतून, प्रांतांतून किंवा राष्ट्रांतून परचक्राच्या भयानें कोंकणांत आले. ( ४ ) 'देवराष्ट्र', 'देवरुख', व देवरुखे यांच्या नांवाविषयीं बांधलेले तर्क व उपपत्ति व त्यावरून 'देवराष्ट्र' किंवा 'देवराष्ट्रीय' ब्राह्मण यांनाच सध्यां 'देवरुखे' किंवा 'देवरखे' म्हणतात असा काढलेला सिद्धान्त.

बरें. असो; इंग्रेजींत " कवींची मुभा " ( Poetical license ) म्हणून एक चीज आहे. याच अर्थाची आपल्या संस्कृतांतहि " निरंकुशाः कवयः " म्हणूनहि एक म्हण आहे. कवींच्यावर कोण अंकुश चालविणार ? जवळ जवळ असलाच प्रकार इतिहाससंशोधकांचाहि असतो. त्यांना एखादा जुना कागद सांपडला किंवा कांहीं मोडके तोडके अवशेष सांपडले म्हणजे त्यावरून त्यांना वाटतील ते तर्क बांधून एखादी उभारणी करून दाखविण्याची पूर्ण मुभा असते. तेव्हां वास्तविक याच्यांत कोणाला दोष देण्यासारखें असें कांहीं नसतेंच. आणि दुसरा एखादा विश्वसनीय पुरावा सांपडून त्यांच्या पूर्वतर्कांत अगर

सिद्धान्तांत जरी कांहीं फेरबदल पडला तरी त्याबद्दल त्यांना कमीपणाहि वाटत नसतो. आणि खरोखर त्यांना तसें वाटण्याला कांहीं कारणहि नसतें.

---

## भाग २ रा.

## सोपारें येथील

# निर्णयपत्र कीं चिटोरें ?

आमच्या संशोधकांनीं आपला सर्व भरिभार सोपारें येथील त्यांच्या निर्णयपत्रावर ठेवून असल्या या पोंचट व लेचापेच्या पायावर त्यांनीं आपला डोल्लारा उभारलेला आहे. पण हें सुपारें कोणतें ? मुंबईजवळ एक सोपारें गांव आहे तेंच कीं काय ? आम्ही तेंच धरून चालत आहों. संशोधकाच्या या निर्णयपत्रांत आरंभींच " विद्वद्गृहस्थवृंद शूर्पारकक्षेत्रस्थितेषु " असा उल्लेख असून व त्यांतील मजकुरानंतर कित्येक पुराणवचनें जोडून शेवटीं "इत्यनेन वचनेनापि देवराष्ट्रीयाणां पंक्तिदूषणं निर्णीतमिति दिक् " असा शेरा मारला आहे खरा; परंतु प्रत्यक्ष याच निर्णयपत्रांतील एकंदर मजकूर पहातां, त्याच्या आजूबाजूच्या, मागच्या पुढच्या गोष्टी लक्षांत घेतां व याच विषयावरील उत्पन्न झालेले वाद, उपस्थित झालेले कित्येक निरनिराळे प्रसंग व त्यांचे शेवटीं लागलेले निर्णय वगैरे संबंधीं उपलब्ध असलेले सरळ सरळ पुरावे हे विचारांत घेतां सुपारें येथील ब्राह्मणांनीं जो निर्णय काढला आहे तसा तो निघूं शकत नाहीं. व संशोधकांचें सुपारें येथील निर्णयपत्र हें निर्णय-पत्रही ठरूं शकत नाहीं. फारतर तें म्हणजे सोपारें येथील दक्षिण

कोंकणांतील चितळेभट्टाच्या पक्षाच्या किंवा त्या पक्षाबद्दल सहानु-भूति बाळगणाऱ्या कांही ब्राह्मणांचे " मागितलेलीं शास्त्रींचीं वचनें लिहोन पाठवून दिलेलें 'समत्तपत्र'अगर चिटोरें होऊं शकेल.याशिवाय त्याची जास्त किंमत होणें शक्य नाहीं. हा चित्पावन चितळेभट्ट म्हणजे ' देवरुखे ' यांच्याबद्दलच्या द्वेषाचा आद्य प्रवर्तक, उत्पादक अथवा जनक होय. याच्या मस्तकापासून द्वेषाचा एक प्रवाह वाहूं लागला. या प्रवाहांत ज्यांनीं आपले स्नानतर्पणादिविधि उर-कून घेतले ते याचे अनुयायी बनले; व त्यांचा जो एक पक्ष निर्माण झाला तो हा चितळेभट्टपक्ष होय.

निर्णयपत्राचा निर्णय आणि त्यांतून प्रस्तुतचें म्हणजे तर जातिनिर्णयपत्र आणि त्याचा निर्णय म्हणजे तो तर जेथें सर्व बाजूचे सर्व विषयांत पारंगत झालेले विद्वान विप्र, यतिं, परमहंस परिव्राजक संन्यासी व सकल ज्ञातीय विद्वद्गृहस्थ यांचा सदैव वास असतो अशा पुण्य क्षेत्रांच्या ठिकाणींच होत असतो. त्या वेळचीं असल्या प्रकारचीं प्रसिद्ध क्षेत्रें म्हणजे नाशिक, पैठण, त्र्यंबक, पुण्यस्तंभ ( पुणतांबें ) व श्रीक्षेत्र काशी हीं होत. त्यावेळीं सोपारें म्हणजे एक सुक्षेत्रस्थान होतें असें इतिहासांतरीं आढळून येत नाहीं. निदान प्रस्तुत निर्णयपत्राच्या काळीं सुपारें म्हणजे एक क्षेत्रस्थान होतें अगर आहे असें कोठें ऐकिवांतही नाहीं. प्रस्तुत निर्णयपत्रकाळीं सोपारें हें प्रसिद्ध क्षेत्र होतें अगर तेथें वादग्रस्त प्रश्नावर अधिकारयुक्त वाणीनें निर्णय देण्याजोगी विद्वद्वस्ति होती असें इतिहाससंशोधक पुराव्यानिशीं दाखवूं शकतील काय ? तेथें फार तर सोपारें हें गांव समुद्रांतून कोंकणाला थोडें लागत असल्यामुळें चित्पावन ब्राह्मणांचीं चार घरें असतील इतकेंच. दुसरें असें कीं निर्णय म्हटला, आणि तोहि पुनः एखाद्या संबंध

जातीविषयींचा निर्णय म्हटला म्हणजे तेथें दोन्ही पक्षांच्या लोकांकडून त्यांचे काय म्हणणें आहे हें ऐकून घेऊन व त्यांचा शास्त्रीय दृष्ट्या सांगोपांग विचार होऊन मग त्यांतून काय निष्पन्न म्हणून निघेल तो निर्णय; आणि मग हा निर्णय एका कागदावर लिहून काढला म्हणजे तें निर्णयपत्र होऊं शकतें. व त्यांचे खालीं विद्रृगृहस्थांचीं नांवनिशीवार संमतें असावीं लागतात. तसला प्रकार सोपारें येथें मुळींच झालेला नाहीं. तिसरें असें कीं हा म्हणजे देशस्थ, देवरुखे, कऱ्हाडे आणि चित्पावन ऊर्फ कोकणस्थ या महाराष्ट्रीय ब्राह्मणांतील एका पोटजातीचा निर्णय आहे. तेव्हां अशा प्रसंगीं हा निर्णय म्हणजे या ब्राह्मणांतील इतर पोटजातींतील गृहस्थांचाहि त्यांत समावेश झालेला असावयास पाहिजे. सोपारें गांवाच्या बाजूला कऱ्हाडे किंवा ऋग्वेदी अगर यजुर्वेदी देशस्थ किंवा देवरुखे यांची म्हणण्यासारखी वस्ति कोणेएके काळीं होती किंवा हल्लीं आहे असेंहि आढळून येत नाहीं. म्हणून सुपारें येथें चितळेभट्टाच्या पक्षाचीं अगर त्याला सहानुभूति दाखविणारीं चार ब्राह्मणांचीं घरें होतीं एवढाच कायतो निर्णय फार तर त्यांतून निघूं शकेल. पण याविषयींहि जबरदस्त शंकाच आहे. कारण आज या गांवीं जाऊन तपास करतां तेथें गेल्या शंभर वर्षांत तरी देवरुखे, ऋग्वेदि अगर यजुर्वेदि देशस्थ, चित्पावन अगर कऱ्हाडे ब्राम्हणांची वस्ति नव्हती व नाहीं असें तेथील वृद्ध मंडळीकडून समजतें. येथें आज विषेष वस्ति म्हणजे पळशे ब्राम्हणांची आहे. या संशोधकांच्या सुपारें येथील नकलेवर जर तेथील ब्रह्मवृंदाच्या सह्या असत्या तरी त्याविषयीं कांहीं चौकशी करितां आली असती. "त्यांचे खालीं सह्या होत्या हें उघड आहे" असें संशोधकांचें म्हणणें आहे. पण नक्कल करून घेणारा इसमहि बिचारा एवढं लांबलचक पत्र उतरून घेऊनहि

त्यांतील सह्या उतरून घेण्यास शेवटीं गारठून गेलेला दिसतो. म्हणून तो एक मार्ग बंद झाल्यासारखें झालें आहे. सारांश नाशिक, पैठण, त्र्यंबक व श्रीक्षेत्र काशी या क्षेत्रांत आपली डाळ शिजणें शक्य नाहीं अशी चितळेभट्टाच्या पक्षांतील कांहीं लोकांची पूर्ण खात्री असल्यामुळें त्यांनीं सोपारें हें एक खेडेगांव त्याला क्षेत्र म्हणून तें शोधून तिकडे कांहीं कुमक मिळविण्याच्या हेतूनें स्वतः कोणी न जातां एखादा कागदी घोडा फेकलेला आहे इतकेंच.

संशोधकांच्या या निर्णयपत्रांतीलच प्रत्यक्ष मजकूर पहातां त्यांतील पहिलेंच वाक्य असें आहे कीं, "तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान विदित झालें." म्हणजे चितळेभट्टपक्षाची कोणी मंडळी तेथें गेली नव्हती हें तर निर्विवाद ठरतें. या पत्रावरूनच दुसरें असें उघड दिसून येतें कीं चितळेभट्टाच्या पक्षाचा हा तंटा "अजमशिद्दि" याचे पर्यंत गेला होता. राजेश्री मुद्गलभट्ट पंडित-राय श्रौति मु. पैठण यांनीं 'अजमशिदी' (जंजिरा) याजकडे अनेक पत्रें लिहिलीं असून त्यांतील मजकूर असा आहे कीं, "जे हे देवरुखे उत्तम ब्राह्मण अन्नव्यवहारा योग्य आहेत आम्ही देशस्थ तों यांचे घरीं जेवितच आहों तरी तुम्हीहि ते प्रांतीचे सारे ब्राह्मण मिळऊन यांचे घरीं जेवणें." व याप्रमाणें 'अजमशिद्दी' यानें चितळेभट्टपक्षाला आपलें मत स्पष्टपणें सांगितलेलें असावें. तरीपण जेव्हां या पक्षाचें मन साफ होईना तेव्हां आपण तरी यांचेवर जुलूम कशाला करा हा विचार मनांत आणून व त्याला एक युक्ति काढून त्यानें या पक्षास सांगितलें कीं "अजमशिद्दि ब्राह्मणांस बोलिले ऐसे जे आम्ही तुम्हांस जेववावें तरी हाकिमीच्या बळें जेविलें असें दिसोन येतें. पंडितराय तों लिहितात जे ब्राह्मण उत्तम अन्नव्यवहारा योग्य आहेत आशियांशीं (यास्तव) हा मुक-

दमा हिंदु महजबा (शास्त्र) करून फसल ( निकाल ) होईल तर तुम्ही सारे ब्राह्मण सातेरेयास महाराज राजेश्री छत्रपतीपाशीं जाऊन कजा चुकउन येणें नाहीं तरी देशांतून जागजागांचीं संमतपत्रें घेऊन येणें." तेव्हां ' अजमशिदि ' यांनीं पंडितरायप्रमाणें आपला निकाल कायम ठेवून पण हा निकाल बदलावा असा या पक्षाचा आग्रहच दिसल्यावरून एका दृष्टीनें म्हणजे अपीलाप्रमाणें " अजमशिदि " यानें या पक्षाला सातेरेयास महाराज छत्रपतीकडे व वाटल्यास ( नाहीं तरी ) जागजागांचिं संमतपत्रें आणण्यास पिटाळून लाविलें.

यानंतर हा पक्ष महाराजाकडे जाऊन त्यानें " वेदमूर्ति मुद्गलभट्ट पंडितराय यांहीं पत्रें पाठवून आमास श्रमी केलें तनिमित्य येथें आलों " अशी विनंति केली महाराजांनीं ताबडतोब " मुद्गलभटिं पत्रें लिहिलीं तीं बाष्कळ रद्द असेत " असें बोलून त्या ब्राह्मणांना मार्गाला लाविलें. " तो वेडा आहे. तूं कां उगाच त्याच्या नादीं लागतोस ? जा. उगाच भांडणतंटे करीत जाऊं नका. पुनः नीट रीतीनें वागत जा." असें सांगून ज्याप्रमाणें आपण लहान मुलांचा तंटा मिटवितों तसलाच प्रकार महाराजांनीं येथें केला आणि स्पष्ट असा कांहींच निकाल न देतां " तुम्हीं आपले क्षेत्रीं जाऊन पूर्वापार व्यवहार चालत असेल त्याप्रमाणें चालविणें " असें बोलून या पक्षाला निरोप दिला. तेव्हां अशी हकीगत झाल्यानंतर हे ब्राह्मण परत घरीं जाण्यास निघाले. आतां नुस्तेंच घरीं परत कसें जाणार ? तेव्हां अशा वेळीं निदान एखादुसरें संमतपत्र तरी दुसऱ्यांना दाखविण्याकरितां आपले पाशीं असणें हें बरें असें वाटून " असें बोलोन आम्हांस निरोप दिला यानंतर आम्हीं आपल्या क्षेत्रास जाणार तरी संमत्तपत्रें घेऊन गेलें पाहिजे यास्तव

तुम्हांस ( सोपारें येथील ब्राह्मणास ) पत्र लिहिलें असे तरी स्वामिनी शास्त्रावलोकन करून धर्मशास्त्रींचीं वचनें लिहून संमत्त-पत्र पाठविणें " असें पत्र लिहून या चिंतनेंत असतां, व अशा प्रसंगीं श्रीक्षेत्र काशीसारख्या क्षेत्रांत आश्रय मिळणें शक्य नसल्या-कारणानें चितळेभट्टपक्षाच्या कांहीं ब्राह्मणांनीं ' सुपारें ' हें गांव एक क्षेत्र म्हणून शोधून काढिलें आहे.

याच निर्णयपत्रांत दोन वाक्यें आहेत तीं अशीं:—" तुम्हीं आपले क्षेत्रीं ( म्हणजे आपल्या गांवाला ) जाऊन पूर्वापार व्यवहार चालत असेल त्याप्रमाणें चालविणें " व " आम्हांस निरोप दिला यानंतर आम्ही आपल्या क्षेत्रास ( म्हणजे आमच्या गांवास ) जाणार तरी संमत्तपत्रें घेऊन गेलें पाहिजे. वास्तव तुम्हांस पत्र लिहिलें असे " या दोन वाक्यांवरून एक गोष्ट सहज सिद्ध होते आहे कीं, चार ब्राह्मणांच्या कोणत्याहि एखाद्या खेडेगांवाला बहु-मानार्थी ' क्षेत्र ' असें म्हणण्याचा त्या काळीं प्रघात असे. याव-रून " सुपारें " म्हणजे नाशिक, पैठण, त्र्यंबक, श्रीक्षेत्र काशी या क्षेत्रांच्या तोडीचें व जातीचें एखादें क्षेत्र नसून त्या खेडे गांवांत चार चित्पावनांचीं चार घरें असतील, असें म्हणतां येईल. इतकेंच नव्हे, तर फिरून या विषयींहि एक मोठी शंकाच आहे. तेव्हां जो आम्ही या 'सुपारें' क्षेत्राचा अर्थ समजत आहोंत त्याची सत्यता सहज कोणालाही पटण्यासारखी आहे. आमच्या इतिहास संशोध-कांच्या सुपारें येथील निर्णयपत्रांत शेवटीं " तुम्ही लिहिलें जे शास्त्रीचीं वचनें लिहोन समत्तपत्र पाठवून देणें त्याजवरून अनेक पुस्तकें पाहोन धर्मशास्त्रीचीं वचनें लिहिलीं असत " असें एक वाक्य आहे. या वाक्यावरून आमचे संशोधक, ज्याला 'निर्णयपत्र' म्हणून म्हणत आहेत तें खरें अस्सल जातीचें निर्णयपत्र नसून

एखाद्या ब्राह्मणानें शास्त्रींचीं कशींवशीं चार वचनें लिहोन पाठवून दिलेलें साधारण-अगदीं साधारण प्रतीचें पत्रोत्तरादाखल म्हणून एक चिमुकलेंसें " चिटोरें " आहे हें एखाद्या लहान मुलालाहि सहज समजण्यासारखें आहे. जणुंकाय साताऱ्यानजीकच असलेलीं वाई, कालें इ० क्षेत्रें त्यावेळीं अस्तित्वांतच नव्हतीं म्हणून या ब्राम्हणांनीं सोपाऱ्याकडे धांव घेतली.

तेव्हां आतां येथेपर्यंत सांगितलेल्या गोष्टीचा सारांश किंवा इत्यर्थ म्हणजे एवढाच कीं, आमचे इतिहाससंशोधक ज्याला " जातिनिर्णयपत्र " म्हणून म्हणत आहेत तें खरें अस्सल जातीचें " जातिनिर्णयपत्र " नसून चितळेभट्टाच्या पक्षांतील अगदीं साधारण प्रतीच्या चार गृहस्थांनीं आपलें झालेलें वर्तमान सोपारें नांवाच्या खेडेगांवांत राहणाऱ्या आपल्या एखाद्या दोस्ताला पत्र पाठवून निवेदन केलें व त्यानें उलट या गृहस्थांना त्याच्या बुद्धय-नुसार शास्त्रीचीं चार वचनें लिहोन पत्राचें उत्तर म्हणून पाठवून दिलेलें एक अगदीं साधारण प्रतीचें असें फारतर पत्रोत्तर असूं शकेल. कारण हें पत्र म्हणजे एक साधी नक्कल असून त्यावर कोणाच्या सह्याही नाहींत. आणि या बिगरसहीच्या चिटोऱ्यावर आमचे संशोधक तर इतके तल्लीन होऊन गेलेले आहेत कीं त्यांत " जे वेदमूर्ति मुद्गलभट्ट पंडितराय यांहीं पत्रें पाठवून आम्हांस श्रमी केलें तन्निमित्य येथें आलों" असें चितळेभट्टाच्या सदर पक्षाच्या पत्रांतील एक नमूद केलेलें वाक्य आहे तेथें "आमास श्रमी केलें" या वाक्याच्या पुढें आपल्या बुद्धिमत्तेची भर घालून कौंसांत (धर्मास श्रमी केलें ) असें वाक्य त्यांनीं घातलें आहे. व तेणेंकरून हे चार चित्पावन ब्राह्मण म्हणजे अधर्म सहन न झाल्यामुळें धर्मास श्रमी म्हणजे कष्टी केलें म्हणून धर्माचा कैवार घेऊन त्याकरितां लढणारे व

जणुं मरावयासहि तयार असणारे परमेश्वराचे अवतारच होत असें दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

---

## भाग ३ रा.

# चितळेभट्टपक्ष.

या चितळेभट्टप्रकरणाचा थोडक्यांत इतिवृत्तान्त म्हणजे असा. हांक मारावयाची म्हटलें म्हणजे ' देवऋषि ' या शब्दाचें संबोधन ' देवऋषे ' असें होतें. याच शब्दांतील ' ष ' चा ' ख ' होऊन ' देवऋखे ' असा शब्द निर्माण झाला. प्राकृतांतल्या मराठी भाषेंत व समाजांच्या प्रचारांत या समाजाला जरी ' देवरुखे ' म्हणत असले तरी पौराणिक ग्रंथांतून व संस्कृतांत ह्या लोकांना 'देवर्षि' व ' देवर्षयः ' या नांवानें संबोधण्यांत आलेले आहे. अनंतभट्ट चितळे म्हणा किंवा वासुदेवभट्ट चितळे म्हणा पण या नांवाचा विद्यासंपन्न व धनधान्यसंपन्न, मौजे वसणी येथें राहणारा असा, एक चित्पावन ब्राह्मण होता. त्यानें रस्त्यावरील एक बुजालेलें तळें तेथें पाणी काढावें या हेतूनें खणण्यास घेतलें होतें. त्या वेळीं त्यानें असा नित्यक्रम आरंभिला किं जो कोणी रस्त्यानें जाणारा भेटेल त्याला तळ्यांतील मातीच्या चार पाट्या वाहण्यास सांगावें. चांगले कार्य आहे असें पाहून व त्याचा नांवलौकिकहि ऐकण्यांत आलेला असल्या कारणानें विशेष काहीं आडकाठी न घेतां कोणीहि त्याप्रमाणें करीत असे. पुढें एके दिवशीं असें झालें कीं, त्याच रस्त्यानें कांहीं पांच दहा ब्राह्मण, वेदशास्त्रविशारद, इष्टापूर्तादि करणारे, व तर्कशास्त्रांत कुशल असे ब्राह्मण, येत होते. त्यांना ह्या चितळेभट्टानें वरील प्रमाणेंच सांगितलें. पण ती गोष्ट या ब्राह्म-

गांना पसंत पडेना. ब्राह्मणांकडून पाव्या वाहवून घेणें चांगलें नाहीं असें परोपरीनें त्या ब्राम्हणांनीं सांगून पाहिलें; परंतु या भट्टाचें समाधान होईना. शेवटीं त्या ब्राम्हणांनीं याचेपाशीं शास्त्राधारें वादहि केला. तरी पण चितळेभट्ट कांहीं केल्या ऐकेना. आणि ते ब्राह्मणहि पाव्या वाहण्यास तयार होईनात. हें पाहून शेवटीं चितळेभट्टाच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन व "तुमच्या पंक्तीला कोणी हि जेवावयास बसूं नये व जे बसतील त्यांना दारिद्र्य प्राप्त होईल" असें म्हणून त्यानें आपला क्रोधाग्नि बाहेर फेंकला. किंवा शतप्रश्नकल्पलताकर्त्यांच्या भाषेंत म्हणावयाचें म्हणजे शाप दिला. परंतु शेवटीं या चितळेभट्टाची वेड्यांत व मूर्खांत गणना करून त्याला तसाच तेथें सोडून देऊन त्याची पर्वा न करितां ते सद्ब्राह्मण आपल्या इष्ट स्थळीं निघून गेले. झालें; हळु हळु ही बातमी सर्वत्र पसरूं लागली व चितळेभट्टहि आपल्याला कांहीं अनुयायी गोळा करूं लागला. समाजाची नेहमींच अशी स्थिति असते कीं कोणी कांहींहि नवीन गोष्ट सुरू करीना, त्याला कांहीं अनुयायी हे मिळावयाचेच. याच नियमाला अनुसरून या चितळे भट्टालाहि कांहीं अनुयायी मिळाले व तसा कोणाला सहज तर्क करितां येण्यासारखाहि आहे. याप्रमाणें चितळेभट्टाला कांहीं अनुयायी मिळून एक नवीन चितळेभट्टपक्ष अस्तित्वांत आला. शतप्रश्न कल्पलताकाराच्या म्हणण्याप्रमाणें म्हणजे हा तळ्याच्या पाळीवरी-वृत्तांत शके १४१९ ( सन १४९७ ) मध्यें घडला. व तेव्हांपासून चितळेभट्टाचा एक पक्ष उत्पन्न होऊन या चितळेभट्टप्रकरणाला सुरवात झालेली आहे.

एव्हांपासून हा चितळेभट्टपक्ष त्या पांच दहा ब्राह्मणांचा व त्यांच्या ज्ञातीचा अत्यंत द्वेष करूं लागला. हा पक्ष म्हणजे कोणे एकेकाळीं सर्व-

मान्य झालेला होता असा प्रकार मुळींच कधीं घडलेला नाहीं. इतकेंच नव्हे तर या पक्षाला फारसा कोठें आश्रय मिळलेला आहे असेंहि घडून आलेलें मुळींच आढळून येत नाहीं. पण एवढें मात्र दिसून येतें खरें, कीं या पक्षाचा द्वेषाग्नि कोठें कोठें धुमसत राहून मधुन मधुन त्यानें पेट घेतलेला आहे. साधारण इतिहास पाहतां असें म्हणतां येईल कीं पाऊणशें-शंभर वर्षांनीं किंवा एखादे वेळीं पन्नास वर्षांनींहि या चितळेभट्टप्रकरणाच्या वणव्याची आग लागत आलेली आहे. अशा वेळीं जेव्हां जेव्हां या द्वेषाच्या लहान लहान ठिणग्या हवेंत अंतर्धान पावून त्याला मोठ्या तंट्याचें स्वरूप प्राप्त झालें तेव्हां तेव्हां हा वाद नाशिक पैठणसारख्या क्षेत्रीं व प्रत्यक्ष श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन त्या ठिकाणीं परमहंस परिव्राजक यति यांच्यामध्यें महाराष्ट्र, कार्णाटक कौंकण, तैलंग, द्राविडादि सकल प्रांतीय व सकल ज्ञातीय विद्वद्गृहस्थांकडून त्यांच्या संमतीनें वेद-शास्त्रपुराणेतिहासांचें अवलोकन होऊन व पूर्ण विचार होऊन त्याचा निर्णय लागलेला आहे. व याप्रमाणें अशा वेळीं या चित-ळेभट्टपक्षाचा पराजय होऊन व त्याची अत्यंत निर्भर्त्सना होऊन त्या प्रत्येक वेळीं त्याला अर्धा अर्धा चंद्र बक्षिस मिळालेला आहे.

---

भाग ४ था.

# देवरुख्यांची प्रखर तेजस्विता.

## १. मुक्तिमंडपांतील निर्णय.

शक १५०५ ( सन १५८३ )

हल्लीं आमच्या हातीं असलेल्या कागदपत्रांच्या पुराव्यावरून इतकें सिद्ध होत आहे कीं, तळ्यावरील प्रकार शक १४१९ मध्यें घडल्यानंतर-मग हें प्रकरण कोंकणांतील काहीं लोकांच्या प्रयत्नानें

म्हणा अगर प्रत्यक्ष श्रीक्षेत्र काशी येथेंच उपस्थित झालें म्हणून म्हणा पण-हें प्रकरण शक १५०५ मध्यें म्हणजे आणखी ८६ वर्षांनीं थेट प्रत्यक्ष श्रीकाशीक्षेत्रापर्यंत जाऊन त्याचा एकदां निर्णय लागलेला आहे. हा निर्णय श्रीक्षेत्र काशी येथील प्रसिद्ध मुक्तिमंडपांत लागलेला आहे. या मुक्तिमंडपांत ब्रह्मवृंदापुढें आलेल्या वादविषयक विषयांची चर्चा होऊन त्यांचा निर्णय लागत असे. तेथून जें निर्णयपत्र इकडे कोंकणांत पाठविण्यांत आलेलें आहे त्यांत या सर्व प्रकरणाचा स्पष्ट उल्लेख असून त्यावर श्रीक्षेत्र काशी येथील निरनिराळ्या ज्ञातींच्या प्रमुखांनीं आपली संमति दिलेली आहे. इतकेंच नव्हे तर या निर्णयाचीं तेथील मुक्तिमंडपांतून दोन ताम्रपटेंहि पाठविलेलीं आहेत असा त्यांत उल्लेख आहे. पण हीं ताम्रपटें अद्याप हातीं आलेलीं नसल्या कारणानें त्यांचा शोध लावणें अत्यंत जरूर आहे.

या निर्णयपत्रांत व ताम्रपटांत ‘ देवरुखे ’ ब्राह्मणांना ‘ देवर्षि ’ ब्राह्मण म्हणून संबोधिलें असून त्यांत चितळेप्रकरण हें केवळ द्वेषमूलक आहे व तसा द्वेष कोणीं करूं नये असें स्पष्ट सांगितलेलें आहे. हा निर्णय ठरल्यानंतर जें पत्र इकडे कोंकणांत आलेलें आहे तें “ औदार्य, स्थैर्य, गांभीर्य, धनैकोपार्जित यशःपुंजमहामेरू राजश्री महाभाग्योदय राजमान्य गणेश प्रभु भडसवळे तथा हरदे प्रभु तेरे तथा विश्वनाथ प्रभु चाफेकर तथा बाळ प्रभु खालगांवकर तथा आरेकर महाजन;–प्रमुख समस्त कोंकणस्थ देवर्षि ब्राह्मण मध्यमोत्तमेषु वृद्धवृद्धेषु सर्वेषां ” यांचे प्रति म्हणजे या मंडळीला उद्देशून असून काशीस्थ कांझरेकर गणेश भट्ट यांचे नांवानें आलेलें आहे. त्यांत जी हकीगत लिहून आली आहे ती अशी:—“ कोळसूरचे विठ्ठल ज्योतिषि वर्षें आठ काशीवास करीत असतां ये वर्षी

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. २ नं.

त्यांचे पुत्र कृष्णज्योतिषी आल्यानंतर सत्संगति करून अग्निहोत्राचा विचारू केला. दोघेहि पुत्र आपणहि प्रयोगीं अभ्यासु केला. उपरि समस्त काशिकर ब्राह्मण बैसवुनि आम्ही अग्निहोत्र करविलें. विठ्ठल ज्योतिषी अग्निहोत्री जाहले तेथें ऋत्विज्य अभयंकर ( अभ्यंकर ) विश्वेश्वर भट्ट; भावये ( भावे ) हरिभट्ट; गोडबोले; गोविंदभट्ट, अभयंकर केशवभट्ट आम्ही सर्व अंगिकार करुनि समस्त ब्राह्मणांचें संमतें करविलें जाणिजे " या हकीगतीवरून ' देवर्षि ' ब्राह्मण हे यज्ञयाग करणारे असून अभयंकर, भावये, गोडबोले, वगैरे सारखे चितपावन ब्राह्मण यांनीं विठ्ठल ज्योतिषी यांचेबरोबर यज्ञांत ऋत्विज्य पत्करिलें होतें हें सिद्धच होत आहे.

श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपांत शके १५०५ मध्यें झालेल्या निर्णयपत्रांतील मजकुरामधून एक अत्यंत महत्वाची अशी गोष्ट बाहेर पडत आहे. व ती या चितळेभट्टानें शेवटीं माफी मागितली अशाविषयीं फार क्वचित् पण परंपरागत चालत आलेल्या दंतकथेला पुष्टी देत आहे. चितळेभट्ट हयात असतांनाच हा वाद श्रीशंकराचार्यांकडे गेलेला असावा व त्यावरून या चितळेभट्टानें आपले घरीं कांहीं मजकुराचें एक पत्र लिहून ठेवलेलें असावें. या चितळेभट्टाचाच कोणीतरी जनार्दनभट्ट या नांवाचा नातु अगर पणतु या वेळीं काशीस आलेला होता. त्यानें हें अनंतभट्ट चितळे यानें लिहिलेलें पत्र मुक्तिमंडपांत भरलेल्या सभेमुढें वाचून दाखविलें. त्यानंतर सभेनें सर्व गोष्टींचा विचार करून निर्णय दिलेला आहे. या मुक्तिमंडपांतील सभेंत " अनंतभट्टाचे अमात्य अभयंकर गोविंदभट्ट धोंड ज्योतिषी, पुराणिक रामकृष्णभट्ट अनंत भट्टा ( चितळे ) चा पक्ष बोलत होते." " तेथें चितळे जनार्दन भट्टें" म्हणजे चितळे जनार्दन भट्टानें असें सांगितलें कीं,

" आमचे घरीं देवर्षि ब्राह्मणांचे अनंतभट्टिं ( म्हणजे अनंतभट्ट चितळ्यानें ) उद्धार पत्र लिहिलें तें आहे." म्हणजे देवर्षि ब्राम्हणांना कोणत्याहि प्रकारचा दोष नाहीं अशाबद्दल स्वतः अनंतभट्ट चितळ्यानें लिहिलेलें हें पत्र होय. " तें पत्र सभासदिं वाचून पाहिलें." त्यांत अनंतभट्ट चितळ्यानें लिहिलें आहे तें असें. "अनंत भट्टिं ( म्हणजे अनंतभट्टानें ) लिहिलें देवर्षि ब्राम्हणांसांगातें द्वेषु केला होता जो तो शास्त्रविरुद्ध त्यास आम्हांस अन्नसंबंध आहे जे न म्हणति त्यास विश्वेश्वराची आण." याप्रमाणें स्वतः अनंतभट्ट चितळे यानें लिहुन ठेविलेलें आहे, हें एकून घेऊन म्हणजे "इतुकें आईकोन तेथें सभासदीं विचारू केला " हाच विचार पुढें दिला आहे. आतां यावरून कोणती शका उरण्यासारखी आहे ? इतकेंही पाहून जर कोणाचें समाधान झालें नाहीं तर त्या मनुष्याचें स्वतः, ब्रह्मदेवदेखील शांतवन करूं शकणार नाहीं आणखी काय ?

या पत्रांतील पुढील मजकूर असा आहे कीं, " इतुकें आईकोन तेथें सभासदि विचारू केला जो अनंतभट्टिं देवर्षी ब्राम्हणां सांघातें द्वेषु केला तो शास्त्रविरुद्ध या कारणे चिपळुणे, कऱ्हाडे, देवर्षि, महाराष्ट्र हे समस्त ब्राह्मण समान वैदिक कर्मि वा अन्नसंबंधीं समस्तांशि अधिकार ऐसा निश्चय जाहाला यांहिं ब्राह्मणीं परस्पर द्वेषु करूं नये." या मजकुरावरून चितळेभट्टाचा पक्ष म्हणजे देवर्षि ब्राह्मणांचा केवळ द्वेष करणारा पक्ष असून त्याला प्रत्यक्ष चिपळुणे म्हणजे चित्पावन, कऱ्हाडे, महाराष्ट्र वगैरे ज्ञातींतील ब्राह्मणांना तो केव्हांहि मान्य न झालेला व त्यांच्याकडून आश्रय न मिळालेला शास्त्रविरुद्ध असा एक पक्ष आहे. या वचनावरून देवर्षि ब्राह्मणांना पंक्तिपावनत्वाचा वगैरे कोणत्याहि प्रकारचा दोष

नाहीं याची सत्यता एखाद्या लहान मुलालाहि सहज पटण्यासारखी आहे.

याच निर्णयपत्रावर " तत्र संमतिः " असें म्हणून पुढें " भावये गणेशभट्ट दीक्षित प्रमुख चिपोळणे; बखले कृष्णभट्ट प्रमुख कऱ्हाडे; शेष कृष्णभट्ट पंडित प्रमुख महाराष्ट्र; गोपीभट्ट प्रमुख गुर्जर; विद्यानिवास भट्टाचार्य प्रमुख गौड; रघुपति उपाध्याय प्रमुख तैलभुक्त समस्त ब्राह्मणांचे समत्ति करून" अशी निरनिराळ्या प्रांतांतल्या निरनिराळ्या ज्ञातींच्या प्रमुखांची संमति लिहिलेली आहे. इतकेंच नव्हे तर पुढें "खरे गणेशभट्ट, चितळे जानभट्ट, सावरकर विठोबा, केशव नाईक प्रमुखांपाशीं देवर्षि ब्राह्मणाचे ताम्रपटे पाठविले असति" असा स्पष्ट उल्लेख असून त्या ताम्रपटावर पुढें " देवर्षि ब्राह्मणांस आम्हास पूर्वी अन्नसंबंध होता मध्यें अनंतभट्टिं नाहीं म्हणितलें होतें तें गोविंदभट्ट आदि करून देवर्षि ब्राह्मण विठ्ठल अग्निहोत्री याचे घरीं आम्ही अन्नसंबंध केला तुम्ही सकळ क ( अ ? ) रितसा कोणी अन्नसंबंध न म्हणति त्याशि श्रीविश्वेश्वराची आण ते अति पाषांड मत करिती ............इति मुक्तिमंडपमध्ये निर्णयः ॥" हा मजकूर लिहिलेला आहे हे सिद्ध होत आहे; आणि हा निर्णय श्रीक्षेत्रकाशी येथील प्रसिद्ध " मुक्तमंडपामध्यें " झालेला असल्याकारणानें त्याला किती सर्वमान्य महत्व आहे हें निराळें सांगावयास पाहिजे असें मुळींच नव्हे.

## २ मुक्तिमंडपांतील निर्णय.

शके १५७९. (सन १६५७)

तलावाजवळील रस्त्यावर शके १४१९ मध्यें उपस्थित झालेला हा चितळेभट्टाचा वाद थोड्या फार प्रमाणात कोंकणच्या भूमींत

यावरतच होता असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण या चितळेभट्टाच्या प्रथम वादानंतर सुमारें ८०।८५ वर्षांनीं म्हणजे शक १५०५ मध्यें या चितळेभट्टाच्या पक्षाच्या द्वेषाचा भडका उडून त्या वादानें श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपांत आपला प्रवेश करून घेतला होता हें आपण वर पाहिलेंच आहे. मुक्तिमंडपांत या पक्षाला थप्पड व गचांडी मिळाल्यापासून हा पक्ष कांहींसा दगावला व त्यामुळें दबला व नरमहि पडला. पण पीळ पडलेला द्वेष म्हणजे ही अशी कांहीं चीज आहे कीं विरुद्ध पक्षाकडून त्याच्या शेंपटीवर पाय देण्यांत येऊं लागला व त्याला अनुकूल अशी परिस्थिति प्राप्त होऊं लागली म्हणजे शंभर वर्षांपूर्वींचेंहि आपलें स्वरूप तो प्रगट करूं लागतो. तसलाच प्रकार कांहींसा येथेंहि झाला. शक १५०५ मध्यें श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपांत एवढें जरी झालें तरी हा वाद मधुन मधुन दृग्गोचर होत होता असें म्हणावें लागतें.

यानंतर सुमारें ७५ वर्षांनीं म्हणजे शक १५७९ (सन १६५७) मध्यें या वादानें आपलें वेताळ स्वरूप पुनः प्रगट केलें. पण यावेळेसहि श्रीगंगातीर्थीं श्रीक्षेत्र काशी येथील पूर्वींच्याच मुक्तिमंडपामध्यें अनेक थोर थोर व महान मांत्रिकांच्या हस्तें या वेताळाला कायमची मुक्ति देण्यांत आली. यावेळीं श्रीक्षेत्र काशी ' येथील मुक्तिमंडप महाराष्ट्र, कार्णाटक, कौंकण, तैलंग, द्राविड इत्यादि निरनिराळ्या प्रांतांतील सकलज्ञातीय अनेक विद्वद्गृहस्थ, यति व परमहंस परिव्राजक यांनीं मंडित व विभूषित केलेला होता. अशा वेळीं तेथें देवर्षिविप्रांच्या सद्ब्राह्मण्याचें विवेचन करण्यांत आलें. या सर्व थोर थोर व महान महान विद्वद्रत्नांनीं सकल वेदशास्त्रें यांचें अवलोकन पूर्ण करून विचारांतीं

असें सिद्ध केलें कीं, देवर्षिब्राह्मण यांना वेदशास्त्रपुराणेतिहास यांतील परमार्थ पूर्णपणें अवगत असून ते क्रतुयजनयाजनादि सदाचरणशील, पंक्तिपावन, व शरीरान्वयार्ह असे अत्युत्तम ब्राह्मण आहेत. यांविषयीं तेथील निर्णयपत्रांतील व समपत्रांतील प्रत्यक्ष आधार पहावयाची असल्यास ती येणेंप्रमाणें आहे. " अथ देवर्षिविप्राणां काश्यां श्रीमुक्तिमंडपे । यतिमिश्रविपश्चिद्भिः सद्ब्राह्मण्यं विविच्यते ॥ १ ॥ तत्र तावत्पूज्यपादपरमहंसपरिव्राजक महाराष्ट्र कार्णाटक कौंकण तैलंग-द्राविडादि सकल ज्ञातोय विद्वद्गृहस्थनिचयसंमत्या वेदशास्त्रलोकतः-विमृश्य देवर्षिब्राह्मणा वेदशास्त्रपुराणेतिहासेभ्योधिगतपरमार्थाः । क्रतुयजनयाजनादि सदाचरणशीलाः पंक्तिपावनाः शरीरान्वयार्हा अत्युत्तमब्राह्मण्यशालिनः ॥ इ० इ०

यांतील प्रौढ व श्रेष्ठ भाषा, मुक्तिमंडपांतील श्रेष्ठ पुरुष व त्यांनीं केलेला श्रेष्ठ सिद्धान्त व श्रेष्ठ निर्णय यांवरून आमचें जें काय म्हणणें आहे त्याची श्रेष्टता सहजच सिद्ध होत आहे व ती कोणालाहि सहज पटण्यासारखी आहे. इतकेंच नव्हे, तर या श्रेष्ठ पुरुषांनीं शेवटीं असा शेरा मारला आहे व अशी शपथ घालून ठेविली आहे कीं यांविषयीं ( देवर्षि ब्राह्मणांच्या सद्ब्राम्हण्या विषयीं ) विद्वानांकडून परिशोधन झालें असतां ( देवर्षि ब्राह्मणांना ) दोष आहे म्हणून जे म्हणतील " ब्रुवाणा दोषमत्रार्थे ( दोषम् अत्रार्थे ) विद्वद्भिः परिशोधिते" ते विश्वेश्वराचा द्रोह करणारे व ब्रह्मघातकी असे होतील. "विश्वेशद्रोहिणो ब्रह्मघातिनश्च भवन्ति ते" येथें हेंहि सांगून ठेवितों कीं, मुक्तिमंडपांतील या निर्णयाच्या खालीं ज्या कित्येक यति, परिव्राजक व अनेक विद्वानांच्या संमतिदर्शक सह्या आहेत त्यांत श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांना अभिषेक करणारे प्रसिद्ध गागाभट्ट यांचीहि सही आहे. या सह्यांचा नमुना

असाः–"संमतोयं पुर्णेंद्रसरस्वतीयतेः, संमतार्थो गागाभट्टस्य, अस्मि-न्नर्थे संमतिः साम्राज्य पंडितस्य ( दिल्लीदरबारामधील ). याप्रमाणें सदर निर्णयपत्रावर–समपत्रावर एकंदर ७५ सह्या झालेल्या आहेत.

## ३ श्रीक्षेत्र काशी येथील ब्राह्मणभोजन.

शक १६०५ (सन १६८३.)

याप्रमाणें चितळेभट्ट–पक्षाच्या द्वेषाच्या वेताळाला गंगातीर्थी श्रीक्षेत्र काशी येथील मुक्तिमंडपांत जरी कायमची मुक्ति देण्यांत आली तरी त्या वेताळाची आठवण साफ एकदम बुजून न जातां मधून मधून होतच होती; व केव्हां केव्हां मध्येंच कोठेंतरी त्या वेताळाचा भास झालेला असल्याचें आढळून येतें. परंतु भास हा केव्हां झाला तरी तो भासच. थोडक्याच क्षणांत त्याचें निरसनहि होऊन गेलेलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे यापुढील म्हणजे मोठीं तुंबळ युद्धें अगर मोठमोठ्या धुमश्चक्र्या नसून क्षणिक काळ टिकणारे साधारण झटकेच होत. असलाच एक प्रकार शक १६०५ मध्यें घडला आहे. परंतु यावेळीं थोड्या वर्षांपूर्वी म्हणजे २०।२५ वर्षांपूर्वींच मुक्तिमंडपांत शक १५७९ मधील होऊन गेलेला प्रकार अगदीं ताजा असल्या कारणानें त्याला विशेष महत्त्व प्राप्त न होऊन ताबडतोब त्याचा निकाल होऊन गेला. यावेळचें ह्मणजे शक १६०५ मधील हरि दीक्षित यांचें वाराणसीस आल्यानंतर तेथून नारायण दीक्षित यांना इकडे कोकणांत आलेलें एक पत्र उपलब्ध आहे; व त्यांत ते लिहितात कीं, "जे कोणी स्पर्धा करीत होते ते ब्राह्मण पंडित वैदिक आम्हांपाशीं येऊन बोलिले जे तुम्हांआह्मांमध्यें द्वेष करीत होते, आजपर्यंत स्पर्धा होती ते

संग्रहालय स्थळ प्रत

स्पर्धा मोडावी जर तुह्मीं शेंदोनशें ब्राह्मणभोजन कराल तर स्पर्धा मोडेल. ह्या उपर आम्हीं ब्राह्मणभोजन केलें." याप्रमाणें नांवाला ब्राम्हणभोजन होऊन सदर प्रकारचें व क्षणिक टिकणारें भांडण तिक-च्याठिकाणीं थांबलें. या पत्राच्या शेवटीं कोणकोण ब्राह्मण जेवा-वयास आले होते त्यांचीं नांवें दिलेलीं असून त्यांत शंकरभट्ट आंबेकर, रामभट्ट ठोसर, शामभट्ट रामडोहकर, गणेशपंत दशपुत्र, श्रीपतभट्ट कर्वे, शामभट्ट काळे वगैरे इसमांचीं नांवें आहेत.

## ४ सोपारें येथील चिटोरें.

शक १६४६. ( सन १७२४. )

इतिहास संशोधक राजवाडे यांना जी एक सोपारें येथील बिगर-सह्यांची साधी नक्कल सांपडली आहे ती या वरील पत्रानंतर ४०-४१ वर्षांची ह्मणजे शक १३४६ सन १७२४ मधील होय. या पत्राविषयीं आरंभीं जें काय सांगावयाचें आहे तें सांगितलें असल्याकारणानें त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. या पत्रांतील आणखी एक विशेष गोष्ट सांगून ठेवण्यासारखी अशी आहे कीं, चितळेभट्टाच्या पक्षानें ह्या पत्रांत ‘ देवरुखे ’ यांचा निर्देश करतांना पूर्वीच्या वर सांगितलेल्या पत्रांप्रमाणें ‘ देवर्षि ’ हा शब्द चुकूनसुद्धां उपयोगांत आणिलेला नसून उलट शेवटीं पुराणांतील प्रस्तुत विषयाशीं संबंध नसलेले असे श्लोक देऊन ‘ देवरुखे ’ म्हणजेच ‘ देवरा-ष्ट्रीय ’ किंवा देवराष्ट्र’ असें भासवून सदर दोन शब्दांचा मुद्दाम अपलाप केलेला आहे. आणि नंतर त्या दोन शब्दांवरून पुढें ‘ देवरुखे’ ‘ देवराष्ट्रीय’ व ‘देवराष्ट्र’ या शब्दांची सांखळी घालून ती सांखळी स्कंदपुराणांत व पद्मपुराणांत ज्या श्लोकांत हे दोन शब्द आलेले आहेत त्या श्लोकांशीं गमतींत जोडून

दिलेली आहे. व त्यालाच भर म्हणून नस्त्या बादरायण संबंधाची कल्पना करून अन्य ग्रंथांतीलहि कांहीं वचनें उद्धरून दिलेलीं आहेत. तेव्हां हा प्रकार पाहिला व श्रीक्षेत्र काशी येथील आतां पर्यंत घडलेल्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे आमचे संशोधक ज्याला सोपारें येथील निर्णयपत्र म्हणत आहेत त्या अगदीं सामान्य दर्जाच्या चिटोऱ्याची काय अवस्था होत आहे व त्या चिटोऱ्यासंबंधीं आमचें जें मत आरंभीं आम्ही स्पष्टकरून सांगितलें आहे तें किती यथार्थ होत आहे हें आतां निराळें सांगण्याची आवश्यकता उरत नाहीं. या पत्राचा काळ म्हणजे शाहूमहाराजांचा काळ असून या वेळीं नाशिक, पैठण, त्र्यंबक वगैरे क्षेत्रीं बराच वादविवाद व पत्रव्यवहार होऊन पूर्वीप्रमाणेंच त्याचा निर्णय लागला असल्याचें पैठण येथील शक १६९६ मधील जें दुसरें एक पत्र उपलब्ध झालें आहे त्यावरून सिद्ध होत आहे.

## ५ पैठण येथील पत्र.

शक १६९६, ( सन १७७४ )

हें पत्र या सुपारें येथील पत्रानंतर ५० वर्षांचें म्हणजे शक १६९६, अर्थात् इसवी सन १७७४ मधील असून त्याचे खालीं " गागाभट्ट दीक्षित व्यास पैटणकर--हस्ताक्षर खुद " अशी सही केलेली आहे. या पत्रांत शामलाभट्टजी गिद्रे ( गिजरे ) वांईकर यांचे वेळीं वांईस उपस्थित झालेल्या वादाचा निर्देष केलेला असून त्यांतील मुख्य मजकूर आहे तो येणेंप्रमाणें. "आम्ही तुमच्या लिहिण्यावरून व शास्त्रसंमतेंकरून पत्राचें उत्तर पाठविलें आहे. देवरुखे यांचा शास्त्रीं पुरावा आहे किंवा नाहीं म्हणून लिहिलेत तर तुमची कैशी समजूत असेल ती असो. परंतु 'देवरुखे' यांस दोष नाहीं. ते सर्व कर्मात अधिकारी आहेत व दोन्हीं वेदीं

अध्ययन करितात व श्रौतस्मार्तादि कर्मे करीत आहेत, याविषयीं आपण शंका केली त्यास या शंकेचें कारण नाहीं. यास समस्त क्षेत्रांचे विप्रवृंद, शास्त्रीपंडित, दीक्षित, महाजन, थोर थोर यांचीं शास्त्रावरून संमतें आहेत. याबद्दल मागें तुमचें पत्र आम्हांस आलें होतें. त्याचा विचार काशीक्षेत्रीं व नाशिक त्र्यंबक वगैरे क्षेत्रांत सभा होऊन सर्वांचे मतें देवरुखे ब्राम्हण यांस दोष नाहीं असें ठरलें. चित्तपावन ब्राम्हण हेच उत्तम म्हणून लिहितां परंतु राजपरत्वें करून तुम्हांस भासलें असेल, तरी ग्रंथावलोकन विचारपूर्वक करावें म्हणजे ध्यानांत येईल. देवरुखे ब्राह्मण यासीं दोन्ही वेदीं अध्ययन व यागादि उत्तर क्रतुपावेतों अधिकार आहे. व हे शरीरसंबंधास पवित्र व पंक्तिपावन आहेत संशय धरूं नये. त्याचे घरीं अन्नव्यवहार व षट्कर्मास हे अधिकारी आहेत. वासुदेवभट्ट चितळे यांणीं याजला तळ्याचे मृत्तिकेकरितां शाप दिला असें ते ( चिपोळणे ) म्हणतात परंतु शास्त्रसंमतेंकरून दोष नाहीं. कऱ्हाडे ब्राह्मण यांमध्यें त्रिपादे यांजला दोष आहे. या खेरीज जे कऱ्हाडे ब्राह्मण व देशस्थ ब्राह्मण व देवरुखे ब्राह्मण याचे परस्परें शरीरसंबंधास विरोध नाहीं. व चित्तपावन हेच अलाइदा आहेत" याच अर्थाला धरून पूर्वीच्या कागदपत्रांतून खालील श्लोक आढळून येतो.

**उदीच्याः कान्यकुब्जाश्च नागराश्चित्तपावनाः ।**
**पयोष्णीतीरसंस्थाश्च सर्वे ते पंक्तिवर्जिताः ॥**

याप्रमाणें सदर पत्रांतील मुख्य मजकूर असून शेवटीं कोणत्या ग्रंथाच्या आधारें हें म्हणणें बरोबर आहे त्या ग्रंथांचीं नावेंहि दिलेलीं आहेत. या वर दिलेल्या पत्रांतील मजकूर पहावा म्हणजे आणखीहि खात्री होऊं शकेल. आम्ही आणखी निराळें कोठवर

किती वेळ सांगत बसावें ? यावरून आम्हीं वर काय म्हटलें आहे याची सत्यता सहज कोणालाहि पटण्यासारखी आहे.

## ६. पंडित विष्णु परशुराम शास्त्री यांनीं केलेलें खंडन.

### शक १७९६, (सन १८७४)

पैठणक्षेत्रांतील हा जो वर नमूद करून ठेविलेला निर्णय आहे तो शक १६९६ मध्यें झाला. तेव्हांपासून हें प्रकरण पार मिटून व निजून गेलेलें असून पुढें शंभर वर्षेपर्यंत त्यानें आपलें डोकें वर उचललेलें दिसत नाहीं. यानंतर शक १७९६ मध्यें म्हणजे इ. स. १८७४ मध्यें विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांनीं " पंचद्राविडांतर्गत महाराष्ट्र ब्राह्मणांतील देवरुख्यांविषयीं शास्त्रसंमत विचार आणि त्यांजविषयींच्या खोट्या प्रवादांचें खंडन " या नांवाचा एक ग्रथ प्रसिद्ध केलेला आहे. इतका ग्रंथ प्रसिद्ध करण्यापर्यंत पाळी कां यावी याविषयीं कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. पण ग्रंथांतील विषय पहातां त्याच सुमारास जोतीबा गोविंद फुले यांनीं "जातिभेदविवेकसार" नांवाचा जो एक ग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे त्यांत देवरुख्यांविषयीं त्यानें आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यानुरुप अज्ञानानें भरलेला, सर्वथा निर्मूळ व असंगत असा कांहीं मजकूर छापून प्रसिद्ध केलेला आहे. याचवेळीं धारवाड येथील चिकित्सक पत्रांतहि अशाच प्रकारचा कांहीं मजकूर आल्याचें समजतें. शास्त्रीबुवांना ग्रंथ लिहिण्यास विशेष कारण हेंच झालें असावें.

विष्णुशास्त्री यांनीं आपल्या ग्रंथांत आपल्या अधिकारयुक्त लेखणीनें या सर्व मजकुरांतील सर्व मुद्यांचें साधार खंडन केलेलें आहे. या खंडनाला सुरवात करण्याच्या पूर्वी शास्त्रीबुवांनीं असें

नमूद करून ठेविलें आहे कीं, " या जातिभेदविवेकसारांत वरील ( देवरुख्यांविषयींच्या ) हकिगतीच्या पूर्वी कऱ्हाडे व चित्पावन यांच्या उत्पत्तीविषयीं सह्याद्रिखंडाचाच आधार दिला आहे. तेथें ८२ व ८१ हे अध्याय प्रमाण आहेत असें लिहिलें आहे. तसें या देवरुख्यांच्या उत्पत्तीविषयीं सह्याद्रिखंडाचा अध्याय कोणता हें लिहिलें नाहीं. तरी या खंडांत आम्ही पुष्कळ शोधून पाहतां आम्हांस वरील कथा मुळींच उपलब्ध झाली नाहीं. जातिभेद-विवेवसारकर्ता वरील अर्थाचे जे पुराणांतील संस्कृत श्लोक ते उतरून घेता तर फार बरें झालें असतें; परंतु तसें त्यानें मुळींच केलेलें नाहीं. याचें कारण जसें आम्हांस हे श्लोक आढळले नाहींत तसेंच त्यासहि आढळले नसावे. अर्थात् त्यानें या गोष्टी फक्त ऐकींव लिहिल्या असाव्या असें वाटतें. "

"जातिभेदविवेकसार"कर्ता व त्याचा ग्रंथ यांच्या बरोबरच शास्त्रीबुवांनीं आपल्या ग्रंथांत "माधवशतप्रश्नकल्पलता" हा ग्रंथ, त्याचा कर्ता कोणी "माधव" व द्वेषमूलक पक्षाचा उत्पादक चितळेभट्ट यांची साधार मुद्देसूद आणि अत्यंत स्पष्ट व मार्मिक शब्दांत चांगली उजळणी केलेली आहे. 'माधव शतप्रश्नकल्पलता" हा बहुतेक पद्यात्मक ग्रंथ असून त्यांत देवरुख्यांसंबंधीं कांही असंगत प्रकार आढळतो. या ग्रंथाच्या लेखाच्या सरणीवरून, भाषेवरून, विचारांवरून व दुसऱ्या अनेक पुराव्यांवरून 'शतप्रश्नकल्पलता' हा ग्रंथ कित्येकांची समजूत आहे त्याप्रमाणें प्रसिद्ध माधवाचार्यांचा नसून 'माधव' नांवाच्या कोणा एका सामान्य मनुष्याचा आहे; आणि तोहि मनुष्य अव्युत्पन्न, इतिहासानाभिज्ञ, वृथा जात्यभिमानी व दुरभिमानी कोणी तरी 'माध्व' पौराणिक होता, असें शास्त्रीबुवांनीं साधार सप्रमाण सिद्ध केलें आहे.

या 'कल्पलते'च्या ७ व्या प्रश्नांत कऱ्हाडे ब्राह्मणांची व ८ व्या प्रश्नांत चित्पावनांची अत्यंत निंदायुक्त अशी उत्पत्ति दिलेली असून त्याच्याचपुढें ९ व्या प्रश्नांत कल्पलताकारानें देवरुख्यां-विषयींची चितळेभट्टाची कथा दिलेली आहे. या कथेंतील कांहीं मुद्यावर शास्त्रीबुवांनीं जी मांडणी अगर टीका केली आहे ती त्यांच्याच शब्दांत द्यावयाची म्हणजे अशीः—

"वासुदेव ( चितळेभट्ट ) हा धनधान्य होता. यास्तव त्याला तलाव करणें होता तर त्यानें पाट्या वहाण्याचें काम करणारे शूद्र वगैरे लोक त्या कामावर ठेविणेंच योग्य होतें. विशेषतः तो विद्वान, यज्ञयाग करणारा, तपस्वी असा ब्राह्मण होता; यास्तव तर त्यास असें करणेंच धर्मशास्त्राप्रमाणें प्राप्त होतें. तसें न करण्यामुळें तो अनेक प्रकारच्या दोषांस शास्त्राप्रमाणेंच प्राप्त झाला. सामान्य-प्रकारच्या माणसासहि माती वाहण्यासारखें हलक्या प्रतीचें काम सांगण्यांत मोठे पातक आहे. मग विद्वान ब्राह्मणांस सांगितल्यास अत्यंत मोठें पातक लागेल यांत काय संशय आहे? या म्हण-ण्याला श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंदांत आधार आहे तो असाः—

**ब्राह्मणस्य च देहोऽयं क्षुद्रकार्याय नेष्यते ।**
**कृच्छ्राय तपसे चह प्रेत्यानंतसुखायच ॥**

भावार्थः— हा ब्राम्हणाचा देह हलक्या कामाकरितां केला नाहीं तर इहलोकीं कष्टसाध्य धर्मकर्म व तपश्चर्या हीं करण्याकरितां आणि परलोलीं अनंत सुख भोगण्याकरितां केला आहे."

"वस्तुतः पूर्वीं लिहिल्याप्रमाणें वासुदेव चितळे याच्या योग्य. तेप्रमाणें पहातां त्यानें आपण होऊनच माती वाहण्यास खुशी असे शूद्रादिक लावावयाचे होते. बरें तसें न केलें तर त्या परोपकारी विद्वान कऱ्हाडे ब्राह्मणांनीं कानउघाडणी केल्यानंतर तरी करावयाचें

होतें तसेंही केलें नाहीं. विशेष विचार होण्याकरितां वादविवादहि त्यांनीं केला, परंतु त्याचा विचार करून तदनुसार वर्तन न करितां उलटा त्या कऱ्हाडे ब्राह्मणांसच शाप दिला; ( कल्पलतेंत देवरुखे हे पहिले कऱ्हाडेच होत असें ह्मटलें आहे. ) तेव्हां आतां त्या चित्पावन ब्राह्मणांस काय म्हणावें बरें? या ठिकाणीं वास्तविक विचारानें पहातां वासुदेव चितळे यानें त्या कऱ्हाडे ब्राह्मणांस शाप देण्याचें कारण नसून त्या कऱ्हाडे ब्राह्मणांनींच त्यास शाप देणें रास्त झालें असतें. त्यांनीं त्यास जी सूचना केली ती केवळ धर्मशास्त्रास अनुसरूनच होती व ती त्याच्या मनांत चांगल्या प्रकारें भरून देण्याकरितां वादविवादही केला; परंतु तोहि त्यांचा व्यर्थ गेला. अखेरीस तो ब्राह्मण दुराग्रही व तामसी आहे असें पाहून ते त्याच्याकडे लक्ष न देतां चालते झाले. तेव्हां तेच खरे धर्मज्ञ व क्षमा, दया इत्यादि- ब्राह्मण्यास आवश्यक अशा गुणांनीं संपन्न असे ब्राह्मण होते असें म्हणणें प्राप्त आहे. आतां वासुदेव चितळे याचें आचरण किती निंद्य आहे तें समजण्याकरितां मनूंतील कांहीं वचनें लिहितोंः—

**क्षत्रियं चैव वैश्यं च ब्राह्मणो वृत्तिकर्षितौ।**
**बिभृयादानृशंस्येन स्वानि कर्माणि कारयन्॥ ८-४११॥**
**दास्यं तु कारयँल्लोभाद् ब्राह्मणः संस्कृतान् द्विजान्।**
**अनिच्छतः प्राभवत्वाद्राज्ञा दंड्यः शतानि षट्॥ ८४१२॥**

**भावार्थः**—क्षत्रिय व वैश्य हे उपजीविकेच्या अडचणीमुळें ब्राह्मणांकडे आले असतां त्यानें भलेपणानें त्यांजकडून जीं त्यांचीं स्वकीय कर्में तींच करवून त्यांचें पोषण करावें. मौंजीच्या संस्कारानें संस्कृत झालेल्या द्विजाकडून त्यांच्या इच्छेविरुद्ध ( ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्यांकडून ) जो ब्राह्मण आपल्या सामर्थ्यानें लोभामुळें

हलकीं कामें करवील त्यास राजानें सहाशें पण म्हणजे सुमारें १० रुपये दंड करावा. ”

“ यावरून मुंज झालेल्या क्षत्रिय-वैश्यांकडूनहि हलकीं कामें करवूं नयेत असें साक्षात् मनु म्हणतो; व लोभानें करविणारास राजानें दंड करावा अशी आज्ञा करतो. मग ब्राह्मणांकडून व त्यांतूनहि विद्वान, यज्ञयाग करणाऱ्या ब्राह्मणांकडून द्रव्य-लोभामुळें हलकीं कामें करविणारा केवढ्या पापास व दंडास पात्र होईल याचा विचार सहज मनांत येण्यासारखा आहे. पुनः हीं कामें करविणारा वासुदेव चितळेहि स्वतः धनधान्यसंपन्न व विद्वान असा होता. तेव्हां त्यानें माती वाहण्याचें काम ब्राह्मणांकडून करविण्याची जी इच्छा केली ती लोभमूलकच होती; आणि त्याच्या विद्वत्तेमुळें तो अधिक दोषास व अधिक दंडास पात्र झाला यांत संशय नाहीं. कारण जे अपराध किंवा अधर्म दरिद्री व अज्ञानी मनुष्याच्या हातून घडतात तेच संपन्न व ज्ञानी मनुष्याच्या हातून घडले असतां तो धर्मशास्त्राप्रमाणेंच अधिक दंडास पात्र होतो, आणि त्यास तूं हें असें करूं नकोस असें चांगल्या मनुष्यानें सांगितलें असतां जर तो करील तर त्यांहीपेक्षां विशेष दंडास पात्र होईल, आणि तोच जर त्या सांगणारास उलटा शिव्या व शाप देईल तर धर्मशास्त्राप्रमाणेंच तो अत्यंत मोठा गुन्हेगार व पाप वृद्धिंगत करणाऱ्या जितक्या लहानमोठ्या गोष्टी वर सांगितल्या तितक्या सर्व निःसंशयपणें त्याला लागू आहेत. यास्तव हा विचार पूर्णपणें मनांत आणला असतां या चितळ्यास महापापी व अधमाधम असें म्हणण्यास कोणासहि शंका वाटणार नाहीं.”

“ आतां हा निर्जल मार्गावर धर्मबुद्धीनें पांथस्थांच्या सोईकरतांच तलाव बांधीत होता ही गोष्ट स्तुत्य आहे खरी; पण तो

धनधान्यसंपन्न असल्यामुळें त्यास पदरचें द्रव्य खर्चून तें करण्याची अनुकूलता होती; व ती नसती तर तशा कामांत हात न घालणें हेंच योग्य झालें असतें. यास्तव या कारणामुळें त्याचा गुन्हा व पाप यत्किंचितहि कमी होण्यास रस्ता नाहीं हें उघडच आहे. कांहीं गरीब लोकांस धन वांटण्याकरितांच जरी एकाद्यानें दुसऱ्या श्रीमानाच्या घरावर दरोडा घातला तरी तो शास्त्र व व्यवहार यां दोहोंच्याहि दृष्टीनें कमी गुन्हेगार अथवा कमी पापी होतो असें बिलकुल घडत नाहीं. आणि तोही दरोडा घालणारा जर आपण स्वतः श्रीमान असून आपली संपत्ति तशीच कायम ठेवील तर तो खचितच मोठा गुन्हेगार मानला जाईल यांत संशय नाहीं.

शतप्रश्नकल्पलतेच्या ९ व्या प्रश्नांतील ९ व्या श्लोकांत कल्पलताकार म्हणतो कीं, " देवरुखाहून वेदशास्त्रांत निपुण अशा कऱ्हाडे ब्राह्मणांचाच समुदाय आला " आणि तच पुढें वासुदेव चितळ्याच्या शापानें दग्ध असे देवरुखे झाले. लताकाराचा सर्व ग्रंथच अगदीं असंगत, अप्रमाण व पोरकट आहे असें पूर्वीच आम्हीं प्रमाणांवरून सिद्ध केलें आहे " ( पान २६ ते ३५ )

इसवी सन १८७४ मध्यें विष्णु शास्त्री हा आपला ग्रंथ लिहित होते. त्यावेळीं या कामीं चौकशी करण्याच्या हेतूनें त्यांनीं आपल्या मित्राला पत्र लिहिलें होतें. त्या पत्राचे उत्तरांतील कांहीं भाग येणें प्रमाणें आहे:—

" देवरुख्यांचा अन्नादि व्यवहार तर सर्वांकडे आहेच; परंतु किती एक अविचारी लोक मनांतून देवरुखे हे अपांक्त असें मोजतात व तें कपट मनांत ठेवून वाह्वाट करितात त्यास आधार रोज कोण विचारतो ? कदाचित् कोणी विचारल्यास आधार वगैरे मा-

हितीची जरुर काय ? वडील जसे चालत आले त्याप्रमाणें आपण चालूं म्हणजे झालें. त्याचेंहि निराकरण झाल्यानंतर आमची मर्जी हें दुसरें कारण उभें करितात इतकेंच. कांहीं पंडित, शास्त्री किंवा श्रीस्वामी यांतून कोणीहि देवरुखे हे अमुक ग्रंथावरून अमुक कारणास्तव निंद्य किंवा यांचा अमुक वृत्तांत आहे असें सांगत नाहीं. द्वेषानें देवरुखे म्हणून म्हणण्याचा पाठ पडला; तें अलीकडील प्रचारांतील नांव ग्रंथांतरीं मिळेल असें दिसत नाहीं. आतां महाराष्ट्र ब्राह्मण व वासुदेव चितळे यांच्या तंट्याच्या योगानें हे महाराष्ट्र ब्राह्मण देशांतून म्हणजे सातारा, कोल्हापुर वगैरे प्रांतांतून खोतगी मिळविण्याकरितां जातांना देवरुखगांव हल्लीं संगमेश्वर तालुक्यापैकीं आहे त्या गांवीं कांहीं दिवस राहिले, पुढें त्यांच्या पक्षाच्या व त्यांच्या ज्ञातीच्या लोकांस देवरुख नांव देऊन माधवकृत ( शतप्रश्नकल्पलता ) खोटा ग्रंथ तयार करून खोटा इतिहास बनविला. हें नांव चित्पावनांच्या राजसत्तेनें व द्वेषानें पडलें आहे असें बहुतेक मोठमोठे सांगतात. हा इतिहास मोठ्या ग्रंथांतून असण्यास मुळींच कारण दिसत नाहीं. महाराष्ट्र ऊर्फ देशस्थ यांसच देवरुखे म्हणून नांव वरील योगानें पडलें आहे असें पुष्कळ शोधांतीं मजला समजलें आहे. मग यांत खरें काय असेल त्याचा उलगडा आपणच करावा." ( पान १७-१८ )

एवढें झाल्यानंतर विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांनीं सरते शेवटीं लहानसा समारोप करून आपला ग्रंथ संपविला आहे. हा समारोप असा:—

"देवरुखे ऊर्फ महाराष्ट्र ब्राह्मण हे पंचद्रविडांतर्गत असून हे अन्नव्यवहार, कन्याव्यवहार इत्यादि सर्व ज्ञातिव्यवहारास निर्विवाद योग्य आहेत, ते योग्य नाहींत असें प्रतिपादन करणारें

एकहि वचन कोठें आढळत नाहीं. फक्त कल्पलतिकाकार माध्व माधव यानेंच त्यांविषयीं कांहीं पोरकट प्रस्ताव लिहिला आहे. पण तें प्रकरण सविस्तर लिहून ती केवळ बडबड आहे असें आम्ही पूर्वी स्पष्टरीतीनें सिद्ध केलें आहे. आणि ते सर्व प्रकारच्या व्यवहारास योग्य आहेत अशाविषयीं आद्य छत्रपतिराजा शिवाजी यांच्या राज्यांतहि पहिल्या प्रतीचे नामांकित विद्वान जे गागाभट्टजी त्यांच्यापासून तों आज पावेतोंच्या सर्व विद्वानांचें संमत एकसारखेंच आहे, हेंहि वर आम्ही स्पष्ट रीतीनें सिद्ध केलें आहे. यास्तव आतां हा लेख वाचल्यावरहि जर कोणी देवरुखे लोकांस व्यर्थ दूषण देतील तर ते जाणूनबुजून अनृतवाद करणारे यास्तव विशेष दोषी होतील आणि सर्व ब्राह्मणांस समत्व सांगणाऱ्या आपल्या धर्मशास्त्राचेहि ते अपराधी होतील; यास्तव व्यर्थ असें करून दोषांत पडूं नये. अशी आमची सर्व लोकांस सूचना आहे.'' (पान ५७-५८)

**७ इ. सं. राजवाडे** शक १८३६ (सन १९१४)

**ज्ञानकोशकार** शक १८४७ (सन १९२५)

इतकें झाल्यानंतर आमचे संशोधक ज्याला निर्णयपत्र म्हणतात अशा सुपारेंगांव येथील साधारण इसमांनीं पाठविलेल्या अगदीं साधारण प्रतीच्या अशा पत्रोत्तराला काय किंमत द्यावयाची अगर त्याची काय वाट लावावयाची तें आमच्या समंजस वाचकांना निराळें सांगण्याची कांहीं अवश्यकता आहे असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. या सोपारें येथील पत्रांत देवरुख्यांसंबंधीं जे आक्षेपार्ह विचार आहेत त्यांचेंहि यथार्थ निरसन झालेंच आहे. या पत्रांतील कल्पनेची बाधा आमचे संशोधक यांना झालेली दिसत आहे. तीहि आतां दूर होईल यांत कांहीं शंका नाहीं. तेव्हां या सोपारें येथील पत्राच्या आधारें संशोधकांनीं जो संशोधनात्मक लेख लिहिला

आहे ह्यांत सदर सोपारें येथील पत्रांतील कल्पनेची बाधा होऊन " मुंबईटापूंत तरी पंक्तिपावनत्वाचा प्रश्न राहिलेला नाहीं. कोंकणांतहि बहुतेक लोक या जातींशीं अन्नव्यवहार करितात.......... ह्या घाटावरील भिन्नाचाराच्या व भिन्नव्यवहाराच्या ब्राह्मणांपासून यज्ञयाग करणारे चित्पावन ब्राह्मण अर्थातच अलिप्त राहिले....... असल्या ह्या जातिनिर्णयपत्राच्या नकला गांवगन्नाचे लोक प्रमाणाचा दाखला म्हणून करून घेत असतात. त्यापैकींच शिरोळे येथील कोण्या गृहस्थाकडून तेथील देशपांड्यांनीं ही नक्कल त्या काळीं उपयोगार्थ व व्यवहारार्थ करून घेतलेली आहे " अशा सारखीं त्यांच्या लेखणींतून उतरलेलीं कित्येक वाक्यें व त्यांतील भावार्थ हींहि शुष्क होऊन वरचेवर हवेंत अंतर्धान पावतील हें निराळें सांगावयास नकोच.

पंडित विष्णु परशुराम शास्त्री यांनीं आपला ग्रंथ सन १८७४ मध्यें लिहिला. त्यांत या प्रकरणाचा निकाल लाविल्यानंतर ४० वर्षांनीं म्हणजे शके १८३६ ( सन १९१४ ) मध्यें इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं सोपारें येथील चिटोरें प्रसिद्ध केलें असून त्याच्या आधारें "देवरुखे यांची मूलोत्पत्ति" यावर एक संशोधनात्मक लेखहि लिहिला आहे. यानंतर १०।११ वर्षांनीं ज्ञानकोषकारांनीं आपल्या ज्ञानाच्या कोशांत " देवरुखे " असें एक सदरहि घालून त्याचे खालीं कांहीं असंबद्ध, अज्ञानमूलक व भ्रामक असा मजकूर छापलेला आहे. याविषयीं ' देवरुखे ' समाजांत हल्लीं चर्चा सुरूच आहे. यामुळें प्रस्तुतचा ग्रंथ हा सदर लेखांना उत्तर देण्याकरितां म्हणूनच प्रवृत्त झालेला आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

भाग ५ वा.सं. नं.

## देवरुखे आले कोठून ?

### ( राजवाड्यांचें मत )

संशोधक राजवाडे असे म्हणतात कीं, "देवरुखे" हें देवराष्ट्रांतून प्रांतांतून देशांतून कोंकणांत आले. त्यांना पुराणांतून व संस्कृतांत देवराष्ट्रीय व देवराष्ट्र म्हणत." कोणताहि समाज, लोक अगर जात ही अमुक एका ठिकाणीं कोठून आली हें निश्चित ठरविणें ही गोष्ट कांहीं सहज नसते. हिंदुस्थानांतील आर्य लोक हे येथीलच मूळचे रहिवासी होत अगर ते बाहेरून कोठून आले हा एक मोठा वाद आहे. युरोपियन लोक म्हणतात कीं हे कॉकेशसपर्वतामधून हिंदुस्थानांत आले. लो. टिळकांनीं असा शोध लाविला आहे कीं हिंदुस्तानांतील आर्य लोकांचें मूल वसतिस्थान अर्टिक महासागरांत असून तेथून ते इकडे आले. यानंतर रा. नानासाहेब पावगी यांनीं असें साधार दाखविलें आहे कीं, हे आर्य लोक मुळचे हिमालयांतील. येथूनच ते दिग्विजय करीत उत्तरेकडे जाऊन पुनः आपल्या मूळच्या ठिकाणीं परत आले. भूस्तरशास्त्रवेत्ते असें म्हणतात कीं, येथील आर्य लोक हे अत्यंत प्राचीन असल्याकारणानें काश्मीर पठारावरच यांची प्रथम वस्ति असली पाहिजे. कारण पृथ्वीचा गोल थंड होतां होतां या पठारावरच मनुष्यप्राण्याची प्रथम वस्ति होणें शक्य होतें. कोणत्याहि एकाद्या लोकांविषयीं अगर जातीविषयीं निरनिराळ्या विद्वानांची अशींच भिन्न भिन्न मतें असल्याचें आढळून येतें.

अलाहाबाद येथील स्तंभलेखांत असा उल्लेख आहे कीं शक २७२ मध्यें समुद्रगुप्तानें दिग्विजय केला त्यावेळीं त्यानें

दक्षिणेंतील देवराष्ट्राच्या कुबेर राजालाहि जिंकलें आहे. ही गोष्ट ध्यानांत असतांच आमच्या संशोधकाच्या हातीं सोपारें येथील पत्र हातीं आलें. त्यांत "अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः" असा श्लोक आहे. त्यावरून 'देवराष्ट्रीय' लोक हे देवराष्ट्रांतून कोंकणांत आले व हेच देवरुखे होत असें त्याच पत्रावरून त्यांचें म्हणणें आहे. यानंतर कऱ्हाडपासून चार कोसांवर 'देवराष्ट्र' नांवाचें एक गांवहि त्यांना आढळून आलें. त्यामुळें तर त्यांचें वरील मत कायमच झालें. पण दुसरें असें कीं साताऱ्यापासून आठ कोसांवर देवर व अष्टें अशीं दोन खेडीं असून त्यांच्या मधून वसनेचा प्रवाह गेलेला आहे. या दोन खेडेगांवांस एकत्र मिळून देवराष्ट्रें म्हणतात. तिसरें असे कीं, कोल्हापुरच्या उत्तरेस पांच कोसांवर जोतीबाचा डोंगर म्हणून एक डोंगर आहे व त्याच्या पायथ्याला 'देवर' नांवाचें एक गांव आहे. तेव्हां देवाचा डोंगर आणि त्याच्या पायथ्याचे गांव मिळून 'देवराष्ट्र' अशीहि एक समजूत आहे. तेव्हां 'देवरुखे' ज्या देवराष्ट्रांतून कोकणांत आले म्हणून समजूत आहे तें यांपैकीं कोणतें 'देवराष्ट्र' घ्यावयाचें ? संशोधक कऱ्हाडजवळच्या 'देवराष्ट्रां' तून आले म्हणून म्हणतात. पण त्याला आधार काय ?. या गांवाभोंवती व आसपास प्राचीन अवशेष व देवालयें फार आहेत, यावरून हें स्थळ पूर्वी केव्हांतरी मोठें वैभवाचें स्थल असावें, असें फार तर अनुमान करतां येईल. किंवा त्याच्याहून फार तर तें एक पूर्वी एके काळीं राजधानीचें शहर असावें असाहि एखाद्याला तर्क करितां येईल. पण तेवढ्यावरूनच 'देवरुखे' हे ज्या देवराष्ट्रापासून आले असतील तें हेंच स्थान होय अगर असावें असा तर्क बांधण्यास त्याला काय पुरावा आहे ? या टापूंत असलेल्या राष्ट्राच्या राजधानींत कुबेर नांवाचा राजा राज्य करीत असू

शकेल. पण तेवढ्यावरून संशोधक जें आणखी म्हणत आहेत कीं, "'देवराष्ट्राच्या कुबेरराजाच्या आश्रयानें राहणारे जे ब्राह्मण ते 'देवराष्ट्' किंवा 'देवराष्ट्रीय' किंवा 'देवरुखे' ब्रह्मण होत हें कशावरून ? वसनानदीच्या तीर्थांच्या ठिकाणीं राहणारे किंवा कोल्हापुरजवळच्या देवराष्ट्रांतील जे ब्राह्मण ते हे होत असें जर कोणीं म्हटलें तर त्याला काय उत्तर देतां येईल ?

बरें; संशोधक याचेही पुढें जाऊन असें म्हणत आहेत कीं, "देवराष्ट्र येथील राजांचें राज्य शक सुमारें ४०० च्या सुमारास चालुक्यांच्या अंकित झालें असावें. हा काळ जर शक ४५० धरला तर त्या कालीं हे देवराष्ट्रीय ब्राह्मण राजाश्रय सुटल्यामुळें संगमेश्वरच्या व फुणगुसच्या आसपास आश्रयाला येऊन कायमचे राहिले असावे. हे परचक्राच्या भयानें घांटावरून कोंकणांत येऊन गिरिगव्हरांत लपून राहिले," व "कोंकणचा हा टापू त्या काळीं देवराष्ट्र येथील राजांच्या अंमलाखालीं होता व चालुक्यांच्या जुलमापासून दूर होता असें दिसतें" असें म्हणून हें त्यांनीं देवराष्ट्रीय ब्राह्मण कोंकणांत येण्याला कारण दर्शविलें आहे. पण हीं सर्व विधानें म्हणजे "असावें, धरला तर, दिसतें," आशाभाषेनें व्यक्त होणारे हे सर्व सशोधकांचे कल्पनातरंगच असल्या कारणानें त्याविषयीं विशेष काय बोलणार ?

रा. राजवाडे म्हणतात कीं हे ब्राम्हण राजाश्रय सुटल्यामुळें परचक्राच्या भयानें कोकणांत येऊन गिरिगव्हरांत लपून राहिले पण राजाश्रय सुटल्यामुळें पळून आले असें म्हणण्यास त्यांनीं त्या वेळच्या प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा याहून जास्त स्पष्ट रीतीनें खुलासा केला असता म्हणजे या मुद्यावर जास्त विचार करण्यास सोईचें झालें असतें. रा. राजवाडे यांच्या म्हणण्याप्रमाणें जरी घटकाभर

धरून चाललें तरी राजाश्रय सुटल्यामुळें पळूनच जावें लागतें असें कोठें आहे? हें परचक्राचें भय म्हणजे होतें तरी कोणत्या प्रकारचें? आणि त्यामुळें सबंध समाजावर गिरिगव्हरांत लपून राहण्याइतकी पाळी तरी येण्याला विशेष कारण काय झालें, हें त्यांनीं स्पष्ट करून कां सांगूं नये? रा. राजवाडे शेवटीं असेंही एक विधान करीत आहेत कीं, "या घांटावरील भिन्न आचाराच्या व भिन्न व्यवहाराच्या ब्राम्हणांपासून यज्ञयाग करणारे चित्पावन ब्राम्हण अर्थातच अलिप्त राहिले." पण हा अर्थ कोठला? या विषयावर आतांपर्यंत पूर्वींच्या भागांत श्रीकाशीक्षेत्रापर्यंत गेलेल्या वादांच्या प्रसंगीं घडलेल्या गोष्टींचा जो विचार केलेला आहे त्यावरून रा. राजवाडे यांच्या या विधानांत कांहींच अर्थ नाहीं, हें सहज सिद्ध होण्यासारखें आहे. शिवाय दुसरें असें कीं हे देवरुखे म्हणजे 'देवर्षि' ब्राह्मण. यांची वस्ती चित्पावनांच्या पूर्वींचीच जर आहे तर मग हें रा. राजवाडे यांचें विधान कसें टिकूं शकेल? पुढील भाग ६ व भाग ८ हे वाचून पाहिले म्हणजे याविषयींची अधिक स्पष्ट कल्पना सहज येण्यासारखी आहे. वास्तविक देवरुखे म्हणजे देवराष्ट्रीय व कुबेरराजाच्या आश्रयानें राहाणारे असे ब्राम्हण नव्हतच असें आम्हीं म्हणतों. सारांश सोपारें येथील पत्रांतील मुख्य मजकूर व त्याच्यापुढें लिहून काढलेले श्लोक यांचा कसा तरी बादरायण संबंध जुळविण्याचें कार्य रा. राजवाडे यांचे हातून झालेलें आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. रा. राजवाडे म्हणतात कीं, शक ४५० च्या सुवारास हे ब्राह्मण देवराष्ट्रांतून कोकणांत आले. तेव्हां शक ४५० मध्यें घडलेली गोष्ट व्यासप्रणीत स्कंद पुराणांत आली कशी या मुद्यावरहि विचार करावयास पाहिजे आहे.

---

## भाग ६ वा.

# देवराष्ट्रीय कीं देवर्षि ?

इतिहाससंशोधक राजवाडे यांचा सारा आधार व सर्व भिस्त काय ती सोपारें येथील चिटोऱ्यावर आहे. हें चिटोरें देवरुख्यांसंबंधीं आहे. या प्रत्यक्ष चिटोऱ्यांत देवरुख्यांना उद्देशून म्हणून देवराष्ट्रीय अगर देवराष्ट्र या शब्दांचा उल्लेख मुळींच कोठें केलेला नाहीं. देवरुखे म्हणजेच देवराष्ट्रीय अगर देवराष्ट्र लोक असा आधार अगर उल्लेख जनांत किंवा ग्रंथांत कोठेंहि आढळून येत नाहीं. आतांपर्यंत जे कागदपत्र आमच्या हातीं आले आहेत त्यांत देवरुख्यांना उद्देशून सर्वत्र देवर्षि हाच एकीएक शब्द सांपडतो. देवरुखे अगर देवर्षि म्हणजेच देवराष्ट्रीय अगर देवराष्ट्र लोक अशी कल्पना यण्याला जर कोठें धागा सांपडत असेल तर तो या संशोधकांच्या सोपारें येथील चिटोऱ्यांत. कारण देवरुख्यांसंबंधीं पत्र आणि त्याच्याच शेवटीं ज्या श्लोकांत देवराष्ट्रीय व देवराष्ट्र हे शब्द आलेले आहेत असे स्कंद व पद्मपुराणांतील श्लोक व याशिवाय असंगत व वडाची साल पिंपळाला या म्हणींप्रमाणें दुसरेहि कांहीं श्लोक या पत्रांत उद्धरून घेतलेले आहेत, ते अगदीं असंबद्ध व पोरकट आहेत हें आतांपर्यंत वर सांगितलेला इतिहास ज्यानें लक्षांत घेतला आहे अशा कोणालाहि सहज समजण्यासारखें आहे. पण केवळ देवरुख्यांसंबंधीं पत्र व त्याचे शेवटीं देवराष्ट्रीय व देवराष्ट्र हे शब्द ज्या श्लोकांत आहेत असे जे श्लोक लिहून ठेविलेले आहेत त्याची वाट कशी काय लावावयाची ? हा बादरायण संबंध जुळवावयाचा कसा ? बरें देवरुख्यांनाच उद्देशून ते श्लोक उद्धरून घेतले आहेत म्हणावें तर हा संबंध

जोडावयाचा कोठून? पुराणांतून व संस्कृतांतून तर 'देवर्षि' या नांवानेंच 'देवरुखे' यांना संबोधिलें आहे. परंपरागत चालत आलेली समजूत पाहावी तर तीहिं तशीच आहे. कारण अनेक प्रसंग उपस्थित होऊन मोठमोठ्या क्षेत्रांच्या ठिकाणीं कागदोपत्रीं देवरुख्यांच्या विषयीं निर्देश करतांना त्यांना 'देवर्षि' असेंच म्हटलेलें आहे. असें असतां ही बर्फांतील आग आली कोठून ? तर या संशोधकांच्या या सोपारें येथील चिटोऱ्यांतून, असें म्हणणें भाग आहे. केवळ एखाद्यानें देवरुख्यांसंबंधीं एक पत्र लिहून त्याच्या शेवटीं त्याच्या बुद्धीप्रमाणें त्यानें इकडचीं तिकडचीं कांहीं वाक्यें लिहून घेतलीं एवढ्यावरून इतका अनर्थ! देवरुख्यांना देवराष्ट्रीय अगर देवराष्ट्र बनवण्याचा प्रसंग!! याच पत्राची कोणी आणखी एक नक्कल घेऊन जर तिच्यांत यवनासंबंधीं एकादा श्लोक आढळून आला असता तर देवरुख्यांना यवनहि होण्याचा प्रसंग आला असता!!! आणि असल्या या चिटोऱ्याच्या नादीं लागून त्याचे पायावर आमचे संशोधक एक एक मजला चढवीत आहेत. असल्या या चिटोऱ्याचा शेवटीं आढावा काढून संशोधक म्हणतात कीं "या ब्राह्मणांचीं तीन नांवें या निर्णयपत्रांत आलीं (१) देवरुखे, (२) देवराष्ट्रिय, (३) देवराष्ट्र." सोपारें येथील पत्रांतील "अन्येपि देवराष्ट्रीकाः" हा श्लोक म्हणजे त्याला ना शेंडा ना बुडखा. आणि देवर्षि अगर देवरुखे यांच्याशीं त्याचा कोणत्याहि प्रकारें संबंधहि येऊं शकत नाहीं.

रामायण व महाभारत हे दोन ग्रंथ व त्याचप्रमाणें दुसरीं पुराणें यांच्यामध्यें कांहीं भाग व कित्येक श्लोक प्रक्षिप्त म्हणजे मागाहून घुसडलेले असे श्लोक आहेत असें अलीकडील अनेक विद्वानांचें मत आहे. पण हे प्रक्षिप्त श्लोक कोणते ते निराळे

काढून अद्याप कोणी हि दाखविलेले नाहींत. अलीकडेहि नवीन श्लोक करून ते जुन्या ग्रंथांत घुसडून देण्याची युक्ति अस्तित्वांत आहे किंवा कसें या गोष्टीचाहि विचार विद्वान् मंडळी करितच असतील. ‘जातिभेदविवेकसार’ या ग्रंथांत पुढील वर्तमान सांपडतें. ग्रंथकार म्हणतात कीं, “कृष्णशास्त्री साठे यांनीं वृद्धपराशर स्मृति नामें ग्रंथ छापविला. त्यांत त्या शास्त्रीबुवांनीं आपल्या पदरचे तीन श्लोक नवीन करून आपल्या जातीचें नीचत्व झांकण्याविषयीं प्रयत्न केला होता तो स्वर्गवासी विष्णुशास्त्री पंडित यांनीं उघडकीस आणून इंदुप्रकाश वर्तमानपत्रद्वारें साठ्यांना फजीत केलें. हे नवीन श्लोक येणेंप्रमाणेः—

कोंकणाश्चित्तपूर्णास्ते चित्तपावनसंज्ञकाः ।
ब्राह्मणेषु च सर्वेषु यतस्ते उत्तमा मताः ॥ १ ॥
एतेषां वंशजाः सर्वे विज्ञेया ब्राह्मणाः खलु ।
माध्यंदिनाश्च देशस्था गौडद्रविडगुर्जराः ॥ २ ॥
कर्णाटतैलंगाद्याश्च चित्तपूर्णस्य वंशजाः ।
अतश्चित्तस्य पूर्णो यो निंद्यात्तस्य क्षयो भवेत् ॥ ३ ॥”

सोपारें येथील चिटोऱ्यांत शेवटीं पद्मपुराणांतील म्हणून कांहीं श्लोक दिलेले आहेत. या यादीरूप श्लोकांत ज्या कित्येक लोकांचा समावेश केलेला आहे त्यांत “देवराष्ट्राः” असा एक शब्द आलेला असून शेवटच्या चरणांत “सर्वे ते पंक्तिदूषकाः” असें म्हटलें आहे. पुण्याच्या आनंदाश्रमानें छापलेली पद्मपुराणाची प्रत आम्ही चाळून पाहिली. पण तिच्यांत हे श्लोक सांपडलेच नाहींत. मग नजरचुकीनें कोठें राहून गेले असल्यास न कळे. पण आमच्याच प्रमाणें आमच्या दुसऱ्या एका मित्रालाहि हे पंक्तिदूषकांचे श्लोक पद्मपुराणांत आढळून आले नाहींत. या पद्मपुराणांत जंबू-

द्वीपाचें वर्णन दिलेलें आहे. तेथें पर्वत व नद्या यांची यादी संपल्यावर त्याच्याच पुढें कांहीं लोकांच्या नांवांचीहि एक यादी दिलेली आहे. तींत सोपारें येथील चिटोऱ्यांत पद्मपुराणांतील म्हणून दिलेल्या श्लोकांतील कांहीं नांवें सांपडतात. पण या स्वरूपांतील प्रत्यक्ष श्लोक व त्यांतील पंक्तिदूषकत्वाचा शेरा आढळून आला नाहीं. मग खरा प्रकार काय असेल तो असो.

सोपारें येथील चिटोऱ्यांत स्कंदपुराणांतील म्हणूनहि एक श्लोक दिलेला आहे, तो असाः- अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः। अपांक्तेया अयाज्याश्च गिरिकांतारवासिनः ॥ पण अशा स्वरूपांतला हा श्लोक व विशेषतः त्यांतील दुसरा चरण तर प्रक्षिप्त म्हणजे मागाहून घुसडलेला असावा अशी आमची ठाम समजूत आहे. कारण या श्लोकाच्या आरंभी "अन्येपि" हा शब्द आहे. यावरून याच्या पूर्वी कांहीं लोकांची यादी आलेली असली पाहिजे. या दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे आमच्या एका स्नेह्याला पूर्वीच्या एका जुन्या स्कंदपुराणाच्या प्रतींत श्लोक सांपडले आहेत. ते येणेंप्रमाणें:—

> आर्यावर्तादागताश्च विप्रा आर्या इति स्मृताः ॥
> त्रैविद्याः सत्यसंकल्पाः श्रौतस्मार्तक्रियापराः ॥ १ ॥
> यमलादागता विप्रा यमलाः परिकीर्तिताः ॥
> अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः ॥ २ ॥
> मरुदेशादगता ये मारवा इति विश्रुताः ॥
> सारस्वतादागता ये कोंकणस्थाः प्रकीर्तिताः ॥ ३ ॥

या यादींत सोपारें येथील चिटोऱ्यांतील दुसरा म्हणजे "अंपांक्तेयाः" हा चरण सांपडत नाहीं. बरें "अन्येपि याचा विशेष संबंध 'अंपाक्तेया' या शब्दाकडे ध्यावयाचा म्हटलें तर सोपारें

येथील चिटोऱ्यांत ज्याप्रमाणें पद्मपुराणांतील म्हणून जसे दोन श्लोक उतरून घेतले आहेत तसेच " अन्येपि " या श्लोकाबरोबर आणखीहि एक दोन मागचे पुढचे श्लोक दाखल केले असते तर त्यावर विचार करण्यास सोपें गेलें असतें. त्यांतूनहि कांहींहि असलें तरी निदान "देवराष्ट्राः" व "देवराष्ट्रीयाः" म्हणजे 'देवर्षि, किंवा 'देवरुखे' नव्हेत इतकें तरी अगदीं सिद्धच आहे.

स्कंदपुराणांत उत्तररहस्ये सह्याद्रिखंडे संग्रहसारे बाम्हणविचारो नाम पंचमोध्यायांत जी एक यादी दिलेली आहे तो अशीः—

शौल्का हैवाः पार्वताश्च पद्याः शैब्याश्च राष्ट्रगाः ।
अवन्त्या कांचिगाश्चैव गोमाततिरवासिनः ॥ १ ॥
वादराः सिंधुजाश्चापि तथा वैभांडका द्विजाः ।
देवर्षयश्चिताजातास्तथा संकरजातयः ॥ २ ॥

या पांचव्या अध्यायांत ब्राह्मणांचा विचार करतांना जी यादी दिली आहे तींत 'देवर्षयः' असें म्हणून 'देवर्षि' ब्राह्मणांचा अगदीं स्पष्ट भाषेंत उल्लेख केलेला आहे, यावरून 'देवर्षि' म्हणजे 'देवराष्ट्र' अगर 'देवराष्ट्रीय' ब्राह्मण असणें हें यत्किंचितहि शक्य नाहीं हें सहज सिद्ध होत आहे.

तसेंच एका क्षेत्रोपाध्यायाजवळचे लेखांत उल्लेख आहे तो असा. "देवर्षीणां देवराष्ट्राणांचाभेदं केचिदुदाहरन्ति तद्यालीकमेव"। यतः स्कांदे नागरखंडोद्धृतमिदं श्लोकद्वयम् । "

मागधाः कान्यकुब्जाश्च देवराष्ट्राश्च माथुराः ।
सौराष्ट्रा यमलावन्त्याः पाशाशाः सालवसौपराः ।
देवर्षयो महाराष्ट्राः काराष्ट्राः खरपृष्ठजाः ।
चिताजाः कौंकणाविप्राः सर्वकर्माधिकारिणः ॥२॥

या स्कंदपुराणांतल्या नागरखंडांतील श्लोकांत 'देवराष्ट्राः' व 'देवर्षयः' हे दोन लोक अगदीं भिन्न असून सोपारें येथील चिटो-ऱ्यांत दर्शविल्याप्रमाणें अगर त्याचा अनुवाद करणाऱ्या संशोधक राजवाडे यांच्या मताप्रमाणें कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं हें अगदीं सहज स्पष्ट होत आहे. या वरील श्लोकांतील 'देवर्षयः' हेच सांप्रतचे "देवरुखे" होत, हें आतां निराळें सांगण्याची आवश्यकता रहात नाहीं. एकंदरींत पद्मपुराणांतील 'देवराष्ट्राः' हेच 'देवराष्ट्रीय' म्हणजेच 'देवरुखे' असें गृहीत धरून त्याचा श्लेषार्थ काढण्याविषयींचा अव्यापारेषु व्यापार मोठा गमतीचा तर खराच.

चितळेभट्टपक्षानें हा काळपावेतों पुष्कळ प्रयत्न करून पाहिले. पण कांहीं केल्या कोणत्याहि बाजूनें त्यांना यश येईना. प्रत्येक प्रसंगीं सर्व विद्वद्गृहस्थांनीं उलट चितळेभट्टपक्षाला वेड्यांत काढिलें आहे. त्यामुळें या पक्षास कोणत्याहि प्रकारचा आधार अगर पुरावा नसल्याकारणानें हा त्यानें अन्य मार्ग शोधून काढिला आहे कीं काय असें वाटूं लागतें. या पक्षाच्या म्हणण्याला कोणत्याहि प्रकारच्या शास्त्राचा आधार नाहीं असें थेट श्रीक्षेत्रकाशीपर्यंतच्या आजपर्यंतच्या सर्व विद्वद्गृहस्थांनीं सिद्ध केलें आहे. या कारणानें पद्मपुराणांतून व स्कंदपुराणांतून ज्यांत देवराष्ट्र व देवराष्ट्रीय हे शब्द आले आहेत असे श्लोक शोधून काढून व ते देवरुखे यांच्या माथीं मारून त्यांना सदर श्लोकांच्या आधारें अपांक्तपणाचा कमी-पणा आणण्याचा सोपारें येथील हा कदाचित् एक नवीन धर्तीचा प्रयत्नहि असूं शकेल. पद्मपुराण अगर स्कंदपुराण हें नाशीक, पैठण व श्रीक्षेत्र काशी येथील विद्वद्गृस्थांना काय माहीतच नव्हतें? युक्ति मोठी अजब तर खरीज.

---

## भाग ७ वा.

# देवरुखे शब्दाची उपपत्ति.

देवरुखे लोक आणि देवरुख गांव या दोन्ही नांवाच्या उच्चारांमध्यें जवळ जवळ पूर्ण साम्यच आहे हें अगदीं स्पष्ट आहे. या दोहोंचा परस्परसंबंध असलाच तर तो खरोखरच काय असेल याविषयीं कोणीं काय सांगावें ? देवरुखच्या आसमंतांतल्या प्रांतांतून येऊन देवरुखे हे प्रथम येथें राहिले म्हणून त्या गांवाला देवरुख म्हणतात असें कित्येक सांगतात. पण अगदीं सरळ दृष्टीनें पहावयाचें म्हणजे अशी उपपत्ति लावितां येईल. "देवरुखे या प्राकृत शब्दाचें संस्कृत रूप देवऋषि व्हावें." असें रा. राजवाडे प्रांजळपणें सांगून ठेवित आहेत. तेव्हां हांक मारावयाची म्हटली म्हणजे 'देवऋषि' या शब्दाचें संबोधन 'देवऋषे' असें होतें. 'ष' चा 'ख' होतो या नियमानें 'देवरुखे' होणें अगदीं सरळ आहे. आणि त्याचप्रमाणें ' देवरुख ' हें गांवाचें नांव होणेंहि तितकेंच शक्य आहे. आज बरींच वर्षे झालीं. कलकत्त्यास कॉलेजमध्यें असतांना एक इंग्रजी ग्रंथ पाहण्यांत आला होता. त्यांत कित्येक उपपत्तीकारांनीं लढविलेल्या अशा कांहीं मौजेच्या कोट्या दिलेल्या होत्या कीं हांसून हांसून मुरकुंडी वळाव्यात. किंबहुना कित्येक विलक्षण रीतीनें उपपत्ति लावणाऱ्या उपपत्तिकारांची टर उडविण्याच्या हेतूनेंच तो ग्रंथ लिहिलेला होता असें म्हटलें तरी चालेल. त्यांतील एक उपपत्ति स्मरत आहे. तो म्हणतो ' राम '–अर्थात् दाशरथी राम–हा शब्द इटलीची राजधानी जी रोम त्या ' रोम ' शब्द पासून आलेला आहे. आणि हा राम ' रोम ' येथेंच राज्य करीत होता.

पण हा प्रकार निराळा. आमच्या इतिहाससंशोधकांना कोठून-तरी ‘ देवरुखे ’ हा शब्द ‘ देवराष्ट्र किंवा ‘ देवरक्षित ’ म्हणजे देवांनीं रक्षण केलेले या शब्दांपासून निघालेला आहे व ‘ देवरुख ’ हा शब्द वरील आर्थानेंच ‘ देवरक्षित ’ या शब्दापासून आलेला आहे असें सिद्ध करावयाचें आहे, असें दिसतें. कारण त्यांच्या लेखांतील सर्व रोख काय आहे हें पाहिलें म्हणजे कोणालाहि तसें वाटण्यासारखेंहि आहे. एवढ्या-करितां संशोधकांनीं आपल्या तर्कांच्या ज्या एकावर एक कमानी चढविल्या आहेत त्या मोठ्या प्रेक्षणीय होत. संशोधकांची प्रथम सुरवात अशी. “संगमेश्वराजवळ देवरुख नांवाचें गांव आहे. परंतु त्याचें जुनें नांव ‘देवरख’ असावें असा तर्क आहे.” ही झाली त्यांच्या केवळ तर्कांची पहिली पायाभूत कमान. अपभ्रंशाचा सामान्य नियम तर असा आहे कीं त्यांत दीर्घ अक्षराचें ऱ्हस्व होतें व कठीण रूपाचें उच्चाराला सोपें असें रूप होत असतें. या न्यायानें पहातां एकवेळ ‘देवरुख’ चें ‘देवरख’ होणें शक्य आहे. पण देवरुख’चें ‘देवरख’ होऊं शकणार नाहीं. मग म्हणतात “ हा तर्क जर खरा असेल तर देवरुखे या शब्दाचें शुद्ध स्वरूप देवरखे असलें पाहिजे.” ही कमान एका हातानें धरून ठेवून त्यावर तिसरी कमान चढवीत आहेत. ती कमान म्हणजे “देवरखे ह्या प्राकृत शब्दाचें मूळ संस्कृत नांव देवरक्षित असावें” ही यालाच समांतर असें सांगत आहेत कीं ‘देवरख’ गांवचें मूळ संस्कृत नांव ‘देवरक्षित’ असावें. यानंतर थोडा विसावा खाऊन व मागें वळून ‘देवराष्ट्र’ शब्द पुढें आणीत आहेत. आतां संशोधक म्हणतात कीं, “देवरख ब्राह्मण देवरट्ठ किंवा देवराष्ट्र देशांतील होत.” याला कारण पाहिजे तर त्यांनीं याच व्याख्याच्या आरंभीं “ देवराष्ट्र या शब्दाचा प्राकृत

अपभ्रंश देवरट्ट व्हावा देवरुख होऊं नये" असें जें एक वाक्य घालून ठेविलें आहे तें घेतां येईल. नाहींपेक्षां ते म्हणतात "किंवा देवराष्ट्र या शब्दाचें शुद्ध रूप (पण तें पूर्वीचें किंवा नंतरचें ?) देवरक्षित किंवा देवरक्ष असें असावें." याच्याच पुढचें त्यांचें वाक्य असें आहे. "देवरक्षित नामक राजाचें नांव पुराणांतून येतें. जसा देवत्रात, देवरात हा शब्द तसाच देवरक्षित हा शब्द." मग यावेळीं आमच्या संशोधकांना पुराणांतल्या 'देवरक्षित' राजाचें नांव एकाएकीं आठवलें त्यावरूनच 'देवरुखे' शब्दाची उपपत्ती त्यांनीं याप्रमाणें लावून टाकली कीं काय नकळे ? हा प्रकार झाल्यानंतर आमचे संशोधक "तें कांहीं असो, देवराष्ट्र हें रट्टांचें सध्यां ज्याला मराठा देश म्हणतात त्यांपैकीं शक २७२ च्या सुमारास एक संस्थान होतें. आणि तेथील ब्राम्हणांना देवराष्ट्र किंवा देवराष्ट्रीय ब्राम्हण म्हणत. आणि ह्याच देवराष्ट्रीय ब्राम्हणांना सध्यां देवरुखे किंवा देवरखे म्हणतात" याप्रमाणें सडकेवरचा रोलर सरसकट फिरवून टाकीत आहेत. मग याला विचित्रपणा म्हणा अगर विक्षिप्तपणा म्हणा !

---

भाग ८ वा.

## देवरुखे यांचें वसतिस्थान.

येथवर सुपारें गांवची कहाणी सांगून झाल्यानंतर देवर्षि ऊर्फ देवरुखे ब्राह्मण यांच्याविषयीं स्वतंत्र रीतीनें काय विचार करतां येण्यासारखा आहे, तें पाहूं. हल्लींच्या काळीं महाराष्ट्रीय ब्राह्मण म्हटलें म्हणजे त्यांच्यांत देवरुखे, देशस्थ, कऱ्हाडे व चित्पावन ऊर्फ कोंकणस्थ यांचा समावेश होतो. त्याशिवाय कण्व व माध्यं-

दिन याहि शाखा आहेत. पण पुष्कळ वेळ यांना देशस्थ म्हणूनहि गणतात. सह्याद्रिखंडांत कऱ्हाडे व चित्पावन यांच्याविषयीं जशीं स्वतंत्र प्रकरणें आहेत त्याप्रमाणें दशस्थ व देवर्षि ऊर्फ देवरुखे यांच्या उत्पत्तीविषयीं स्वतंत्र प्रकरणें आढळून येत नाहींत. देशस्थ, कोंकणस्थ वगैरे हीं नावें तरी काय, जेव्हां निरनिराळ्या जातींचा संबंध दाखवावयाचा असतो तेव्हां त्यांचे उल्लेख करणें भाग पडतें. कऱ्हाडे, चित्पावन किंवा कोंकणस्थ यांच्या नांवाचा प्रचार वाढल्यामुळेंच देशस्थांनां देशस्थ हें नांव अधिक ठळकपणें प्राप्त झालें आहे. याचे पूर्वीं देशस्थ हे महाराष्ट्रीय ब्राह्मण या नांवानेंच संबोधिले जात असत. किंवा देशस्थांची आपसांतली भाषा म्हणजे ऋग्वेदी व यजुर्वेदी अशी होती. व हल्लींहि इतर पोटजातींचा विचार जेव्हां करावयाचा नसतो त्यावेळीं ते आपसांत आपल्याला ऋग्वेदी व यजुर्वेदी या भाषेनेंच समजत असतात. देवरुख्यांमध्यें ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी हिरण्यकेशी अशा दोन्ही शाखा आहेत. ह्या गोष्टींचाहि विचार करणें जरूर आहे.

या जगाच्या चक्रांत आर्यभूमीच्या इतिहासाचे फेरे कैक झालेले आहेत. ब्राह्मणयुगानंतर क्षत्रिय युगहि झालेलें आहे. जगाची हल्लींची वृत्ति वैश्य अगर व्यापारी बनलेली असून पुष्कळ ठिकाणीं ती शूद्रवृत्तीकडे झुकलेली दिसते. रामायणकाळीं श्रीराम जेव्हां वनवासाला गेले होते त्यावेळीं या दण्डकारण्यांत अनेक ऋषींचे किती तरी आश्रम होते असें आपण पहातों. महाभारतकाळीं तरी पांडवांना जेव्हां वनवास पत्करावा लागला त्या वेळींहि या दण्डकारण्यांत म्हणजे हल्लीं ज्याला आपण देश म्हणतों त्या भागांत किती तरी ऋषींचे आश्रम असल्याचें आपल्याला आढळून येतें. दिवसेंदिवस हें सर्व अरण्य तुटून पार नाहीसें झालें आहे. पण काय, या अरण्यांत वास करणारे

ते सर्व ऋषी व त्यांचे ते आश्रम सर्व नाहींसे झाले काय? नाहींसे झाले म्हणजे गेले तरी कोठें? त्यांचे पुष्कळ वंशज म्हणजे त्यांच्या गोत्रांचे पुष्कळ ब्राह्मण शेती करीत असलेले, व्यापार करित असलेले, नोकरी करीत असलेले आपण पहातों; पण त्यांच्यापैकीं सर्वच ऋषींचा हळुहळु अन्य वृत्ती स्वीकारल्यामुळें लोप झाला काय? पण आर्यभूमीचा इतिहास पाहिला म्हणजे तसं म्हणतां येणें शक्य नाहीं. कारण अजूनहि हिमालयासारख्या ठिकाणीं व सह्याद्रि–सातपुड्यासारख्या पर्वतांत, नर्मदा, गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी अशां सारख्या पवित्र नद्यांच्या ठिकाणीं त्यांचा अद्यापहि निवास असल्याचें आपण ऐकतों. आपली तशी समजूत आहे, व तें खरेंहि आहे. नाहींतर ही आर्यभूमी—पाश्चात्य कल्पनेनें पछाडलेले लोक कांहीं म्हणोत—पण ही आर्यभूमी तिचें सत्याचें–अध्यात्माचें–तपश्चर्येचें अधिष्ठान पार ढासळून जाऊन एका विलक्षण अवस्थेंत जाऊन तिचा लय झाला असता. 'सत्ये सर्व प्रतिष्ठितम्' सत्याच्या आधारामुळेंच हें जग अद्याप जिवंत टिकून राहिलें आहे.

सध्याचे देवरुख खेड्याची भौगोलिक स्थिति पाहतां तें संगमेश्वरच्या दक्षिणेस सह्याद्रीचे पश्चिम भागाला आहे. तेथून दक्षिणेकडे गेलें असतां सह्याद्रीच्या मस्तकावरील विशाळगड किल्ला लागतो. विशाळगडापासूनच एक फांटा थेट पूर्वेकडे लांबवर गेलेला आहे. या पर्वतशाखेनेंच करवीर संस्थानची उत्तर सीमा बनविलेली आहे. संगमेश्वरपासून विशाळगडपर्यंतच्या पर्वतप्रदेशांतील सृष्टिसौंदर्य अपूर्व असून तेथें वनश्री अद्यापहि नांदत आहे. या पर्वतप्रदेशांतील रानांमधून नाना प्रकारच्या औषधी आहेत. विशाळगडजवळ तर दुर्गम अरण्य आहे व यांतील गिरिगह्वरांत अद्यापहि ऋषींचा वास आहे असें वृद्ध लोक सांगत असतात. आमच्या मतें हाच टापू देवर्षींच्या वसतिस्था-

भाचा प्रांत होय; व पुढें पुढें त्यांच्या पुत्रपौत्रांचें ऋषिपणाचें व तपश्चर्येचें मान हळुहळु उतरूं लागून ते खालीं कोंकणच्या त्यांच्या हल्लींच्या वसतिस्थानांत उतरलेले असावेत. हल्लीं या देवर्षींच्या वंशजांची म्हणजे देवरुख्यांची जी वस्ति आहे त्यांत विशेष हा आहे कीं, जेथें पाण्याची उत्तम मुबलक सोय आहे अशा पाटाच्या पाण्याच्या सानिध्यांतच ते आपली वस्ति करून राहिले आहेत. आजपर्यंत कैक शतकें व कैक पिढया तेथें शेतीवर आपली उपजीविका करीत आले आहेत. यानंतर अनुकूळ कालीं त्यांनीं खोतीहि संपादन केलेल्या आहेत. इतकेंच नव्हे, तर जनाच्या कल्पनांचे व समजुतींचे मोडके तोडके अवशेष देवर्षि अगर देवऋषि-देवरुखे अशी जी एक प्रकारची त्यांची परंपरा आढळून येते, व इतर जातींतील कित्येक जनांच्या अस्पष्ट कल्पनांचे व समजुतींचें मोडके तोडके अवशेष दिसून येतात त्यांनाहि हीच वरील पीठिका अगर इतिहास मिळून असल्याकारणानें अनेक भ्रमांचें व शंकांचें निरसन होत आहे.

ऋषि सदैव अरण्यांत, गिरिकंदरीं अगर पवित्र नद्यांच्या तटाकीं राहून तपश्चर्येंत आपलें आयुष्य खर्च करीत असतात. ज्यांना ब्रह्मज्ञान झालेलें असतें, अशांना ब्राह्मण म्हणण्याचा प्रघात पडलेला होता. परंतु पुराणग्रंथांतून ऋषि व ब्राह्मण हे शब्द अनेक ठिकाणीं समानार्थी उपयोगांत आणलेले दिसून येतें. हल्लीं मात्र हा ब्राह्मण शब्द इतका सार्थ उरलेला नाहीं. त्याचप्रमाणें देव हा शब्द देवांच्या गुणांचा श्रेष्ठपणा अगर श्रेष्ठ या अर्थानें उपयोगांत आणलेला आढळून येतो. प्रघातहि तसाच आहे. पूज्य अशा नारदमुनींना देवर्षि म्हणून म्हटलेलें आहे. भूलोकांत ब्राह्मण हे श्रेष्ठ गणले गेले म्हणून त्यांनाहि भूदेव म्हणूं लागले. समर्थांनीं म्हटलें आहे कीं,

३९३७

"भूदेव संतांसि सदा लवावें." अगदीं रोजच्या व्यवहारांत तरी "मनुष्य किती सज्जन म्हणून सांगूं? अगदीं देवमाणूस बुवा" असले प्रयोग सहज कोणाच्याहि तोंडून निघत असतात ना? पण हाच त्याचा अर्थ. पंडित विष्णु परशुराम शास्त्री आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं, "डोंगरासमीप डोंगरामध्यें अथवा डोंगरावर दरि-कंदरींतून राहणाऱ्या ब्राह्मणांस शूद्रादिकांचा स्पर्शहि होत नसल्या-मुळें इतर ब्राह्मण लोक त्यांस प्राचीन काळापासून मोठे व पवित्र मानीत आणि त्यांस सामान्यतः "ऋषि" असें म्हणत आले आहेत; तेव्हां या गोष्टीवरूनहि त्यांस 'देवर्षि' (देवरुखे) ही संज्ञा प्राप्त झाली असावी असें दिसतें." कोषांत 'देवर्षि' म्हणजे देवतुल्य ऋषि असा अर्थ सांपडतो.

सह्याद्रिखंडांत जीं कित्येक हृदयंगम वर्णनें आढळून येतात त्यांवरून हींच सह्याद्रीपर्वतांतील पुण्य तपोवनें आर्यवृत्तींच्या ऋषींनीं व ब्राह्मणांनीं अगदीं फुलून गेलेलीं होतीं असें दिसून येतें. सह्याद्रिखंडांत नाग लोकांचें वर्णन आहे. तें सह्याद्रिपर्वतांतील याच तपोभूमीला उद्देशून आहे. तें वर्णन असें:—

तत्र सिद्धा मुनिगणा भरताद्याः प्रकीर्तिताः ।
परस्त्रियोऽभिलाषो न स्वदारनिरताः सदा ॥
हृष्टपुष्टजनाकीर्णाः तपोलोकाः प्रकीर्तिताः ।
नाद्वेगो न च कोपस्तु ईर्ष्यासूयाविवर्जिताः ॥

अहाहा! किती पुण्य भूमि!! म्हणूनच हिला 'आर्य' म्हणजे सज्जन, संस्कृत लोकांची श्रेष्ठ भूमि म्हणून म्हटलें आहे. परशुराम सह्याद्रीजवळ आला तेव्हां तेथील वनभूमि व वनशोभा त्याला कशी दिसली तिचें असें वर्णन आहे:—

टाकिलेला होता. पुढें कालांतरानें ही वृत्ति कमी कमी होऊं लागली व हें अरण्य तुटलें जाऊन हळुहळु त्याला हल्लींचें स्वरूप प्राप्त होऊं लागलें. ऋषींची व सार्थ ब्राह्मणांची परंपरा कायम ठेवण्याची वृत्ति अद्याप ज्यांची कायम राहिली त्यांनीं पुढें पुढें संगमेश्वर–विशाळगडचा हा प्रांत धरिला. तेथें राहून ऋषीपणाची व ब्राम्हणत्वाची व अस्सल आर्यवृत्तीची ज्यांनीं शेवटपर्यंत आघाडी धरिली ते ऋषीच हल्लींच्या देवरुख्यांचे पूर्वज होत. या यांच्या वृत्तीमुळेंच इतर देशावरचे ब्राह्मण त्यांना पूज्य मानीत असत व म्हणूनच त्यांना देवऋषि समजण्याची–म्हणण्याची परंपरा कायम राहिली. यांचेच पुत्रपौत्रप्रपौत्रादि वंशज हळुहळु कालानुसार खालीं उतरून या प्रांताच्या आसपास पाण्याचा व सुपीक भूमीचा आश्रय करून राहूं लागले तेच हल्लींचे देवर्षि किंवा देवऋषि ऊर्फ देवरुखे होत. पुरणांतून व संस्कृतांत त्यांना देवर्षि या नांवानेंच संबोधिलें आहे. पूर्वीं दाखविल्याप्रमाणें श्रीकाशीक्षेत्रापर्यंत यांच्याविषयीं बोलण्याचे जितके जितके प्रसंग प्राप्त झाले त्या सर्व प्रसंगीं त्यांच्या समजुतीला–परंपरागत चालत आलेल्या समजुतीला व ज्ञानाला अनुसरून सर्व प्रांतांतील सकल ज्ञातीय ब्रह्मवृंदानें त्यांना 'देवर्षि' या बहुमानाच्या नामाभिधानानेंच संबोधिलें आहे. यांनाच सांप्रतच्या मराठीं भाषेंत 'देवऋषि' ऊर्फ 'देवरुखे' म्हणण्याचा परिपाठ पडलेला आहे.

" देवराष्ट्रांत राहणारे जे ब्राह्मण ते हे देवरुखे होत व ते शक ४५० च्या सुमारास कोंकणांत आले" असें जें रा. राजवाडे यांचें मत आहे त्याला त्यांचेपाशीं दुसरा कांहीं आधार आहे काय? या प्रांतांत आमच्या एकाहि कुलदेवतेचें स्थान नाहीं हीहि गोष्ट या ठिकाणीं विचारांत घेण्यासारखी आहे. परशुराम गोमांतकांत

स्थळ प्रत

जात असतां त्याला वाटेंत कांहीं ऋषींचे आश्रम लागले. या ऋषींच्या नांवावरून अलीकडील कित्येक आडनांवें कशीं बनलीं आहेत, हें संशोधक राजवाडे यांनींच एके ठिकाणीं काढून दाखविलें आहे. तो प्रकार थोडक्यांत म्हणजे असाः- सांकलेयाः पासून सांकले, किंवा साल्ये. बाहुलिः पासून भोळे. कालेयाः पासून काळे. मौसल्याः पासून मुसळे. क्रोडाः पासून करोडे. असो; याप्रमाणें पुष्कळ आडनांवें आहेत. तरी यावरूनहि आमच्या म्हणण्यालाच अधिक पुष्टी कशी मिळत आहे हें ध्यानांत येण्यासारखें आहे.

आर्यभूमि ही तपोभूमि आहे, ऋषींची भूमि आहे, ब्राह्मणांची भूमि आहे. यांचें स्थान जोंपर्यंत ढळलेलें नसतें तोंपर्यंत क्षत्रिय, वैश्य, शूद्रादि अन्य वर्ण व जाति हे ऐश्वर्यांत व सुखासमाधानांत नांदत असतात. यांचा सर्वत्रच हळुहळु लोप होऊं लागल्यामुळें हें सांप्रतचें जग केवळ व्यापारी व म्हणूनच सामान्यतः अत्यंत घातकी असें वळण त्याला लागलेलें आहे. जगन्नियंत्यानें एकदां जें हें जगाचें चक्र फिरवून दिलेलें आहे तेंच अशा प्रकारचें आहे कीं काय असें म्हणावें लागतें. बर्लिन, न्यूयार्क, लंडन पॅरिस, टोकिओ अशांसारखीं किती तरी शहरें या आर्यभूमींत एकेकाळीं विद्यमान होतीं. सर्व जगानें अनेक प्रकारचें ज्ञान प्रथम या आर्यभूमींतूनच मिळवून नेलेलें आहे. पण पाश्चात्य चढाओढीच्या शहरांत सर्वत्र स्वार्थच दिसून येतो त्याला परम म्हणजे श्रेष्ठ म्हणजे या जगाचा आदि, मध्य व अंत या तिहींचा विचार करणाऱ्या व सर्व प्राण्यांना पोटांत घेणाऱ्या परमार्थाचें अधिष्ठान नसल्याकारणानें सर्व जग कासावीस होऊन गेलेलें आहे. पण आर्यभूमींतील सर्व शहरांत व सर्व व्यवहारांत या परमार्थाचें पूर्ण अधिष्ठान असे. कित्येक वेळ या जगन्नियंत्याच्या चक्राची अशी स्थिति दिसून येते कीं, रहा-

टाच्या माळेंतील जें गाडगें अगदीं वर गेलेलें असतें तेंच पुनः कालांतरानें अगदीं खालीं गेल्यासारखें दिसतें. पुनः तें वर येतें. दुसरेहि प्रकार तत्तत्कालानुसार आढळून येतात. पूर्वीं आशिया व यूरोपचा जहाजामधील सर्व प्रवास आफ्रिकेला वळसा घालून होत होता त्यामुळें आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील व अन्यहि कितीतरी बंदरें भरभराटीस आलीं होतीं. पण सुवेझचा कालवा सुरू झाल्यापासून तीं सर्व बंदरें निस्तेज होऊन भूमध्यसमुद्रांतील बंदरांना फारच महत्व चढलें. आगगाडी घाटावर चढून पुण्याकडे येऊं लागली म्हणजे तिचे पुढचे डबे मागें पडतात व मागचे डबे पुढें होत असतात. नागव्यांच्या गांवांत भरजरीच्या उंची पोषाखाला किंमत येणें शक्य नसतें. त्याचप्रमाणें पाश्चात्य जग, पाश्चात्य भावना व विचार यांनीं घेरलेल्या व झपाटलेल्या जगांत आर्यसद्गुणांना व वृत्तीला भाव येईनासा झाला आहे. इतकेंच नव्हे तर उलट या सद्गुणांना व वृत्तीला त्यांचें दास्यत्व पत्करून राहण्याची पाळी आलेली आहे. अमावास्येच्या रात्रीं अंधार किती जरी गाढ असला तरी दिवस हा उजाडावयाचाच. उन्हाळ्यांत झिरझिरीत वस्त्रांचें प्राबल्य व स्तोम किती जरी वाढलें असलें तरी जबरदस्त थंडीचा कडाका एकदां सुरू झाला म्हणजे झिरझिरीत वस्त्रें फेंकून देण्यांत येतात. अशा वेळीं पेटाऱ्याच्या तळाशीं खालीं पडलेले जड पण ऊबदार कपडे पुढें येऊन लोक त्यांना आपल्या अंगावर व डोक्यावर घेत असतात व त्यामुळेंच जगाचें संरक्षण होत असतें.

देवरुखे समाजाविषयीं विशेष गोष्टी ध्यानांत घ्यावयाच्या म्हणजे ते कोठेंहि गेले तरी तेथें थोडीबहुत जमीन संपादन करून शेतीवाडी करून रहाण्याकडे त्यांची प्रवृत्ति विशेष. उत्तम शेती, मध्यम

व्यापार व कनिष्ठ नोकरी ही म्हण जुनीच. पण अलीकडे जशी ती लोकांना जास्त पटूं लागली आहे, तशी ही वृत्ति त्यांना पूर्वीपासून फार प्रिय असल्याचें दिसून येतें. ते अत्यंत प्रेमळ, श्रद्धावान, व भक्तिमान असून प्रामाणिकपणा यांच्यांत विशेष प्रमाणांत आढळून येतो. कोणतीहि गोष्ट त्यांना एकदां पटली आणि करण्याचें त्यांनीं ठरविलें म्हणजे कितीहि संकटें आलीं अगर त्यांच्या स्थितीचें कांहींहि झालें तरी ते आपल्या कार्यापासून पराङ्मुख न होतां सारखी चिकाटी धरून असतात. त्यांनीं हातीं घेतलेल्या कार्यांत त्यांचा कोणी हात धरूं शकत नाहीं सत्यप्रियता व खोट्याची चीड ही त्यांना जास्त असल्यामुळें ज्या गोष्टी करणें आवश्यक असतील अगर ठरतील त्या करण्यांत कोणाचीहि-मग तो कितीहि मोठा असेना-मुर्वत अगर भीडभाड न ठेवितां ते आपला मार्ग आक्रमीत असतात. त्यामुळें त्यांना जरी त्रास पोंचूं लागला अगर हालअपेष्टा काढाव्या लागल्या तरी ते त्याची पर्वा करून रहात नाहींत. असल्या त्यांच्या करारी व सत्याग्रही स्वभावामुळें व अनेक प्रसंगीं खरा मूळचा प्रकार काय आहे हें इतरांच्या ध्यानांत न येतां हे लोक म्हणजे मोठे उरमट, तापट व दुराग्रही आहेत असा त्यांच्याविषयींचा ग्रह करून दिलेला असल्याचेंहि मधुन मधुन आढळून येतें. कांहीं झालें तरी त्यांनीं आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें योग्य असें जें एकदां आपलें कार्यक्षेत्र आंखून घेतलें असेल त्यांत ते कोणालाहि हार जावयाचे नाहींत. या लोकांचा बहुतेक कल शेतीकडेच असल्याकारणानें ते अन्य मार्गाला फारसे जात नाहींत. तरी पण जे कित्येक अन्य ध्येयाच्यामागें लागले आहेत त्यांत त्यांनीं पुष्कळच अग्रस्थान पटकावून नांव लौकिकच संपादन केलेला आहे. ते नेहमीं आपल्या स्वाभिमानाला संभाळून फार जपून रहात अस-

तात. नीच वृत्तीचा अंगीकार अगर लांगूलचालन करून जरी मोठें ऐश्वर्य प्राप्त होण्यासारखें असलें तरी तें त्यांना गोड वाटत नाहीं. तिकडे ते वळतच नाहींत. त्याच्यापेक्षां त्यांना आपली साधी रहाणी व गरीब मठीच अधिक प्रिय होते. सरळ प्रेमानें व भक्तीनें जो कोणी त्यांच्याशीं वागेल त्याचा वेळेला दासहि होऊन राहण्याची व दुष्टाव्यानें किंवा विश्वासघातानें वागणाऱ्याची होईतोंपर्यंत उपेक्षा करण्याची व वेळीं-प्रसंगीं त्याला हार न जातां 'मी तुझा बाप आहें' हें त्याला पटवून देण्याची आर्यवृत्ति यांच्यामध्यें फारच मनोरंजक रीतीनें पहावयास मिळते. हे लोक स्नेहाला फारच उत्तम व जीवाला जीव देणारे आहेत. पण लबाडीनें त्यांच्याशीं आंतबाहेर जर कोणीं केलें तर एका क्षणांत त्याचा संबंध सोडण्यास त्यांना कांहींच वाटत नाहीं. पण कोणतीहि गोष्ट साहजिक झाली असें त्यांना आढळून आलें किंवा समोरच्या मनुष्यानें दिलगिरी दर्शविल्यानंतर आतां या मनुष्याला स्वतःच्या वागण्याविषयींचा पश्चात्ताप झालेला आहे व पुनः तरी तो आपलें वर्तन सुधारील अशी त्यांची खात्री झाली म्हणजे सर्व गोष्टी पोटांत घालून पुनः ते त्याच्याशीं तितक्याच प्रेमभावानें वागत असतात.

---

## भाग ९ वा.

# ज्ञानकोश.

आतां ज्ञानकोशाकडे वळूं. ज्ञानकोशकारांनीं 'द' या सदरांत 'देवरुखे' या मथळ्याखालीं मोठा मौजेचा असा एक लेख प्रसिद्ध केला आहे. या लेखाच्या पंचायतनांतील मुख्य देवता अगर केंद्र

अगर इंग्रजींत 'बॅक्‌बोन्,' किंवा 'न्युक्लीअस्' या शब्दानें जें व्यक्त होतें तें म्हणजे सोपारें गांवच्या इसमाच्या एका पत्राची बिन सह्यांची नक्कल व त्यावर मल्लिनाथी चढवून इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं छापलेला लेख होय. पण ज्ञानकोशकारांनीं त्याच्यापेक्षां और एक मजा केलेली आहे. भिल्ल, कोळी, आफ्रिकेंतील किंवा दूर सरहद्दीवर असलेल्या कांहीं विचित्र अशा विशिष्ट जाति यांचें कित्येक ठिकाणीं कुतूहलानें वर्णन केलेलें आढळून येतें. नुकतेंच कांहीं महिन्यांपूर्वी 'मॉडर्न रिव्ह्यु' नांवाच्या इंग्रजी मासिक पुस्तकांत नागालोकांचें वर्णन आलें आहे. त्यांत संपादकांनीं त्यांचे स्त्रीपुरुष व त्यांनीं धारण केलेलीं हाडांचीं व शिंगांचीं आभूषणें यांचे फोटो नावीन्याच्या औत्सुकतेनें दिलेले आहेत, त्याची आठवण होते. ज्ञानकोशकारांनीं 'द' या अक्षराखालीं हिंदुस्थानचा इतिहास या विभागांत त्यांना देणें शक्य झालीं इतकीं कांहीं विशिष्ट जातींचीं वर्णनें दिलीं आहेत. त्या जाती ह्याः—दनु, दरद, दरवेशी, दर्जी, दसनामी, दहाइत, दांगट, दास, दुबळे, देवांग, देवार, दैवज्ञ. याच जातींच्या मालिकेंत ज्ञानकोशकारांनीं 'देवरुखे' याहि जातीचा समावेश करून तिचें वर्णन दिलेलें आहे. इतिहाससंशोधक राजवाडे यांच्या लेखाबरोबरच ज्ञानकोशकारांनीं विपरीत भासणाऱ्या आणखी वाईट गोष्टी मिळविल्या आहेत. हा मजकुर एखाद्या चवथी इयत्तेतल्या मुलानें लिहिला आहे कीं काय असें वाटूं लागतें. किंवा एखाद्या फाटक्यातुटक्या पाद्र्यानें आमच्या इकडल्या कांहीं वारक्यासारक्या गोष्टींसंबंधीं अमेरिकेंत किंवा इग्लंडांत वर्णन करून सांगावें तसलाच हा प्रकार आहे कीं काय असा भास होतो. एवंच ज्ञानकोशकारांनीं संशोधकांच्याहि आणखी पुढें दोन पावलें जाऊन देवरुखे

समाजाचें स्वरूप चीड व संताप येण्यासारखें विद्रुप व हिडिस करून दाखविलें आहे. आमच्या मतें 'देवरुखे' समाजाचा हा राजरोस अपमान व धडधडीत उपमर्द होय.

आम्ही वर नमूद केलेल्या जातींचें ज्ञानकोशांतील वर्णन या नमुन्याचें आहे. ( १ ) **दनु**:—ब्रह्मदेश व शानसंस्थानें यांमधील प्रदेशांत राहाणारे मिश्र शान ब्रह्मी लोक. हे थोडथोडे बौद्धलोकांसारखेहि आहेत. ( २ ) **दरद्**:—गिलजित भोंवतालच्या प्रदेशांत काश्मीर व हिंदुकूश यामध्यें दरद लोक राहतात, संस्कृत ग्रंथांतून ज्यांना पिशाची लोक म्हटलें आहे त्यांचेच हे वंशज असावेत असें ग्रीयर्सनचें म्हणणें आहे. संस्कृत ग्रंथकार ' दरदाः ' असा उल्लेख करितात. आजचे बहुतेक दरद मुसलमान आहेत. मुसलमानी दरदांत कित्येक हिंदु चाली सांपडतात. या लोकांत पुरुष व बायका एका ठिकाणीं जेवावयास बसतात. लग्न जमविण्याचे वेळीं मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे जाऊन १॥ फूट लांब चाकू, ४ वार कापड आणि एक भोपळा ( कमंडलू ) भर दारू नजर करतो. मुलीच्या बापानें तिचा स्वीकार केल्यास वाङ्निश्चय झाला असें समजतात. हे प्रेतयात्रेच्या वेळीं प्रेताभोंवती बसून द्राक्षें वगैरे खातात आणि मद्य पितात. मरणानंतर तीन दिवसांनीं तूपभाकर वांटतात. प्रेत जमिनींत पुरतात. दरदांना गाईचा मोठा तिटकारा आहे. इ० इ० ( ३ ) **दरवेशी**:—हा परशियन शब्द असून त्याचा अर्थ भिक्षेकरी आहे. हे मुसलमान व कांहीं ख्रिश्चन जातीचे असून काम न करतां भिक्षावृत्तीवर चरितार्थ चालविणें हा त्यांचा धदा असतो. ( ४ ) **दर्जी**:—शिवणकाम करणारी जात. यांच्यांत कांहीं ब्राह्मणसंतती पैकीं आहेत. ही संतति सर्वांत उच्च मानली जाते. यांच्यांत चमरिया म्हणून एक चांभारांची

संतति आहे. पंचमहालांतील दर्जी लोकांचा दर्जा धेड लोकांहून खालचा आहे. सुवत प्रांतांतील दर्जी कधीं कधीं भारवड लोकांचे उपाध्याय असतात. पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही चाली यांमध्यें आहेत. कुंभार व लोहार यांच्या हातचें जेवण हे जेवतात. हिंगलाज देवीची पूजा करितात. या लोकांपैकीं ५/६ लोक शिंप्याचा व रंगाऱ्याचा धंदा करितात इ० इ० (५) **दहाइतः**—यांचें व खंगारांचे पूर्वज एकच होते अशी एक दंतकथा आहे. सहा रुपये, साखर, हळद, तिळाचें तेल इतकें वराच्या बापानें वधूस दिलें पाहिजे. व्यभिचारांत धरलेल्या स्त्रीस पहिल्यांदा क्षमा करितात पण पुनः केल्यास बहिष्कार घालतात. नवऱ्यास सोडून कोणी स्त्री राहूं लागली तर त्यानें नवऱ्याचा खर्च भरून दिला पाहिजे. जर कुणबी वगैरे माणसानें दहाइत बाईबरोबर व्यभिचार केला तर त्याला जातींत सामील करून घेतात. हे स्थानिक हिंदु देवांची पूजा करितात. इ० इ० (६) **दांगटः**—महाराष्ट्रांतील एक जात. हल्लीं सिंगणापूर गांव ज्या ठिकाणीं आहे तेथें दाट झाडी असे व त्या वेळीं या जंगलांत दांगट लोकांची वस्ति असे. या जातींत जाधव भोंसले यांसारखीं आडनांवें आहेत. कांहीं ठिकाणीं दांगटांना अस्पृश्य समजलें जातें. सध्यां या लोकांचा मुख्य धंदा लावण्या पोवाडे म्हणण्याचा आहे. पुष्कळसे मोलमजुरी करून राहतात. (७) **दासः**—विशेषतः कर्नाटकांत आणि कोल्हापुरसंस्थानांत यांची वस्ति बरीच आहे. हा एक भिकारी वर्ग असून हिंदु आणि लिंगायत धर्माच्या इलक्या दर्जाच्या जातींत यांची गणना होते. म्हैसुरमध्यें हे भिक्षुकीहि करितात, व स्वतःजवळ शंख, घंटा वगैरे बाळगतात. भिक्षावृत्तीशिवाय दास लोक गाणें बजावणें आणि

नाटकी खेळ करून पोट भरतात. दासस्त्रिया बहुधा वेश्यांचा धंदा करितात. कांहीं स्त्रिया वंशपरंपरा देवांच्या देवळांतून राहतात. देवळें झाडसारवण्याचें काम यांच्याकडे सोंपविलेलें असतें. तथापि देवळाच्या गाभाऱ्यांत जाण्यास यांना मज्जाव असतो. ( ८) **दुबळे**:-भडोच, सुरत व ठाणें जिल्ह्यांत मुख्यत्वें-करून आढळतात. कोळयांप्रमाणेंच या जातींत इतर लोकांचे बरेंच मिश्रण आहे. बहुधा शेतकरी मजुर व घरगुती नोकर पुनर्विवाह, घटस्फोट, दिराशीं लग्न अन्य हिंदु, भूत पिशाचाशिवाय हनुमान, शिकोत्री, अगाशी इ० देवतांची पूजा करितात, ब्राह्मणांना मान देतात. विवाह संस्कार व नामसंस्कार त्यांच्याकडून करवितात. इ० ( ९ ) **देवांग**:-हे कोष्टी असून सुती व रेशमी कपडे विणतात. आतेबहीण व मामेबहीण यांच्याशीं लग्न बहुधा करतां येतें. कर्नाटकांत मुलाचा बाप मुलीबद्दल ३० रुपये देतो. पुनर्विवाहाची चाल. पंचांची संमति असल्यास घटस्फोटहि करतां येतो. खंडोबा, बहिरोबा, जोतीबा, नरसोबा यांची पूजा करितात. यांचे उपाध्याय देशस्थ ब्राह्मण आहेत. यांच्यांत कांहीं जंगमपंथी आहेत. विवाहादि संस्कार यांच्या जातीचे उपाध्याय करितात. (१०) **देवार**:-गाणारे व भिक्षा मागणारे द्रवीड जातीचे. वधू प्रौढ असल्यास गर्भाधान निराळें करावें लागत नाहीं. नवऱ्याजवळून पळून दुसऱ्याबरोबर राहूं लागल्यास विधवाविवाहाच्या दुप्पट दंड द्यावा लागतो. न परवडेल तर १० रुपयांसकट परत नवऱ्याकडे त्यानें पाठवावी. हे लोक प्रेतें पुरतात. ब्राह्मणांच्या हातचें जेवीत नाहींत. पण गोंडांच्या हातचें खातात. हे लोक डुकरें पाळतात. सुत काढणें, वानरें शिकवणें, अस्वलें व वाघ पाळणें, शिसें व कथलाचे दागिने विकणें हे धंदे करतात. इ० ( ११ ) **दैवज्ञ**:-सुवर्णकारांची एक

जात. प्रत्येक तालुक्यांतून एक दोन देवळें व जमीन उत्पन्नें. या जातीमध्यें विवाहादि संस्कार बहुतेक स्वज्ञातीय उपाध्यायांकडून. न मिळाल्यास इतर ब्राह्मणांकडून करविण्यांत येतात. ही जात आपल्याला ब्राह्मण म्हणविते. ज्ञातीसंबंधीं उपलब्ध असलेली बहुतेक माहिती, आज्ञापत्रें, निवाडे वगैरे कै. वे. शा. सं. नारायण रावजी शास्त्री क्षीरसागर यांनीं " विश्वब्रह्मकुलोत्साह " या ग्रंथांत संकलित केलेली आहे. विधवाविवाहाची चाल केव्हांहि प्रचलित नाहीं. रखेल्या स्त्रियांपासून अगर अधर्म व्यवहारापासून झालेल्या संततीची गणना ज्ञातींत होत नसून तिची स्वतंत्रहि जात बनलेली पहाण्यांत नाहीं. ' दैवज्ञ समाजोन्नति परिषद ' सारख्या संस्था व " दैवज्ञ प्रबोधिनी " एक पाक्षिकहि यांच्यांत आहे. इ० इ० या व त्यांच्यांत भर म्हणजे ' देवरुखे '. इतक्याच काय त्या जाती ज्ञानकोशाच्या पंधराव्या विभागांत दिलेल्या आहेत. याहून जास्ती नाहींत.

इतर जातींचीं हीं वर दिलेली वर्णनें वाचून झालीं म्हणजे लागलींच कोशांतील ' देवरुखे ' या मथळ्याखालीं दिलेला मजकुर वाचून पहावा म्हणजे आम्ही जीं वर विधानें केलेलीं आहेत त्यांची सत्यता व त्यांतील मर्म हीं सहज कोणालाहि पटण्यासारखीं आहेत. याच विभागांत शोधून पहातां ' देशस्थ ' हा मथळा सांपडलाच नाहीं. चित्पावन, उर्फ कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे यांचींहि वर्णनें दिली असतीं म्हणजें त्यांचीहि वर्णनें कशीं दिलीं आहेत हें ताडून पहातां आलें असतें. पण मग ज्ञानकोशकारांनीं तसें कां केलें नाहीं हें काय सांगावें? कीं त्यांच्या मतें हे महाराष्ट्रीय ब्राह्मणच नव्हेत ?

निदान प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं तरी देवरुखे समाजांतील सज्जन, शहाणे व सुशिक्षित असे कमींत कमी चारदोन

लोक सहज आहेत. ज्या ज्ञानकोशकारांनीं आपला इतका ज्ञानाचा कोश बनविण्याकरितां अनेक ठिकाणांहून अनेक प्रकारांनीं माहिती मिळविली त्यांनां या लोकांची गांठ घेऊन हा ' देवरुखे ' मथळ्याखालील लेख प्रथम दाखवून, त्यांचा अभिप्राय घेऊन मग तो छापतां आला नसता काय ? हे करणें त्यांना काय अशक्य होतें ? कीं जाणून बुजून त्यांनीं हें कृत्य मुद्दाम केलें ? मागाहून आम्हांला असें कळलें कीं पुण्यांतील श्रीयुत भिकाजी मोरेश्वर मांदुस्कर हे त्यांच्याकडे स्वतः गेले होते. त्यांनीं आपले जवळचे सर्व कागदपत्र ज्ञानकोशाच्या संपादकांना दाखविले. त्यांच्याशीं या विषयाची चर्चाहि केली. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं असेंच शेवटीं सिद्ध झालें. केवळ " हे ( देवरुखे ) अपांक्त नाहींत याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या धर्मसभेचीं व अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रें ( नकला ) पाहण्यांत येतात " एवढेंच वाक्य कौंसांत ' नकला ' हा शब्द घालून अगदीं मोघमपणें छापून व दोन्ही हात आपल्या दोन्ही कानांवर ठेवून ज्ञानकोशकार मोकळे झाले आहेत. संशोधक राजवाडे यांना सोपारें येथील सांपडलेलें पत्र हेंहि नकलच. किंबहुना नकलेची नकल. पुनः त्यावर सह्या कोणाच्याच नाहींत. तेव्हां यांतील सर्व हकीगत निवेदन करून, त्यांतील श्लोकच्या श्लोक आपल्या कोशांत उद्धारून घेऊन त्यावरील रा. राजवाडे यांचें जें एक लांबलचक चऱ्हाट लावीत बसले आहेत, तें त्यांना टाळतां आलें नसतें काय ? तें राहिलें त्यांची मर्जी. पण हें राजवाड्यांचें चऱ्हाट संपल्यावर तरी शके १५०५ मध्यें श्रीक्षेत्र काशी येथील प्रसिद्ध मुक्तिमंडपांत सर्व जातींतील विद्वानांनीं निर्णय लाविलेल्या सह्यांनिशीं असलेल्या निर्णयपत्रांतील अर्थात् मांदुस्कर यांनीं

दिलेल्या पत्रांतील आणखी पांच चार ओळी त्यांना देतां आल्या नसत्या काय ? " सभासदिं विचारू केला जो अनंत भट्टि देवर्षि ब्राह्मणांसंघानें द्वेषु केला तो शास्त्रविरुद्ध याकारणें चिपळुणे, कऱ्हाडे, देवर्षि, महाराष्ट्र हे समस्त ब्राह्मण समान वैदिक कर्मी व अन्नसंबंधीं समस्तांशीं अधिकार ऐसा निश्चय जाहला यांहिं ब्राह्मणिं परस्पर द्वेषु करू नये. देवर्षि ब्राह्मणास आम्हांस पूर्वी अन्नसंबंध होता मध्यें अनंतभाट्ट नाहीं म्हणितलें होतें. तुम्ही सकळ करितसा कोणी अन्नसंबंध न म्हणति त्याशी विश्वेश्वराची आण जे अति पाषांड मत्त करिती " हीं रा. मांदुस्कर यांनीं दिलेल्या पत्रांतील दोन वाक्यें रा. राजवाडे यांच्या मजकुराप्रमाणेंच दिलीं असतीं तर काय बिघडलें असतें ? हीं वाक्यें तर प्रत्यक्ष श्री काशीक्षेत्रांतील प्रसिद्ध मुक्तिमंडपांत शक १५०५ मध्यें झालेल्या निर्णयपत्रांतील होत. त्यावेळीं चिपोळणे, कऱ्हाडे, महाराष्ट्र, गुर्जर, तैलभुक्त वगैरे अनेक जातींचे प्रमुख हजर होतो. त्याचप्रमाणें " अथ देवर्षीविप्राणां काश्यां श्री मुक्तिमंडपे । यतिमिश्रविपश्चिद्भिः सद्ब्राह्मण्यं विविच्यते ॥ १ ॥ तत्र तावपूज्यपाद परमहंस परिव्राजक महाराष्ट्र कर्णाटक कोंकणतैलंगद्रविडादि सकल ज्ञातीय विद्वद्गृहस्थ-निचयसंमत्या वेदशास्त्रलोकतो विमृश्य देवर्षिब्राह्मणा वेदशास्त्र-पुराणेतिहासेभ्योधिगतपरमार्थाः । ऋतुयजनयाजनशीलाः पंक्ति-पावनाः शरीरान्वयार्हा अत्युत्तमब्राह्मण्यशालिनः ॥ शिष्टानुष्ठित-शरीरान्वयार्हाश्चेति सिद्धांतितम् ॥ वयंच ते ब्रुवाणा दोषमत्रार्थे (दोषम् अत्रार्थे) विद्वद्भिः परिषोधिते । विश्वेशद्रोहिणो ब्रह्मघाति-नश्च भवंति ते । इतिदिग् ॥" या शेवटच्या शपथेसह या पाच-चार ओळी छापतां आल्या नसत्या काय ? मग ? शाई संपली कीं कागद संपले ? काय झालें तरी काय ? याच्यावर ज्या अनेक ७५

विद्वानांच्या सह्या आहेत, त्यांत "संमतार्थो गागाभट्टस्य अस्मिन्नर्थे संमतं साम्राज्य पंडितस्य" या प्रमाणें श्री शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणाऱ्या प्रत्यक्ष प्रसिद्ध पंडित गागाभट्ट व दिल्लीदरबारांतील साम्राज्यपंडित यांचीही सही आहे.

बरें, असो; ज्ञानकोशाचा पुष्कळसा मजकूर रा. चितळेभट्टपक्षाचें समर्थन करणाऱ्या, राजवाडे यांच्याच लेखाचा अनुवाद आहे. त्याचा यथास्थित ऊहापोह व विवेचन पूर्वी वर केलेंच असल्यामुळें त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. पण त्याशिवाय ज्ञानकोशकारांनीं दुसरी जी कांहीं माहिती गोळा केली आहे तिचाहि तिच्या मानानें सत्कारपूर्वक विचार करणें जरूर आहे. इ. सन १९११ सालच्या सेन्सस रिपोर्टमधीलहि कांहीं वाक्यें ज्ञानकोशकारांनीं दिलेलीं आहेत. पण सेन्सस रिपोर्ट व ग्याझेटिअर्स यांतील मजकुर गोळा करणाऱ्या गृहस्थांवर चितळेभटपक्षाच्या कोठें अवशेष राहिलेल्या लोकांचा परिणाम डलेला आहे असें म्हणावें लागतें. कारण असें जर न म्हणावें तर त्यांना दुसरी बाजू कां दिसली नाहीं? खरी वस्तुस्थिति काय आहे ती द्यावयाची म्हटलें तर त्यांनीं दुसरे बाजूची माहिती कां मिळवूं नये? आतांपर्यंतच्या इतिहासावरून असेंहि दिसून येतें कीं अशा सर्वमान्य ग्रंथांतून त्याला इष्ट असलेली माहिती साहजिकपणा दाखवून नमूद करून अगर करवून ठेवण्यांत चितळेभट्टाचा एखादा अनुयायी कां असेना, पण तो मोठा दक्ष असतो. निदान ज्ञानकोशकारांनीं तरी असें करणें म्हणजे मोठी लाजिरवाणी गोष्ट होय. कारण त्यांना तर दुसरी बाजू पुराव्यानिशीं मांडून दाखवून व समजावूनहि सांगितली होती. असें असूनही त्यांनीं दुसरी बाजू योग्य स्वरूपांत मांडू नये याला काय म्हणावें? किंवा त्यांना जो मजकूर घालून ठेवावा असे वाटलें तो त्यांनीं मुद्दाम

घालून ठेविला ? काय म्हणावें तरी काय ? एखादा युरोपियन साहेबहि आमच्या इकडल्या तिकडल्या गोष्टींविषयीं कांहीं लिहित असतो. पण त्याची घाटणी निराळी. देवरुखे ब्राह्मणांत ऋग्वेद व यजुर्वेद हेच दोन वेद असून आज शतकेंच्या शतकें किंबहुना हजारों वर्षें याच दोन वेदांचें ते अध्ययन करीत आले आहेत. अथर्ववेदाचा त्यांना गंधदेखील नाहीं. पण असें असून ज्ञानकोशकार विल्सन साहेबांचें मत मोठ्या आवडीनें छापून ठेवित आहेत. कोणी कांहीं म्हटलें तरी आपल्याजवळ सारासार विचार पाहिजेच कीं नाहीं ? विल्सन म्हणतो कीं, अथर्ववेदाच्या देवर्षि शाखेचा हा वर्ग असावा. असो; त्याच्या इच्छेस येईल तें म्हणून टाकण्यास त्या बिचाऱ्याला तरी मुभा कां नसावी ?

'ते आपल्यास म्हणतात अगर म्हणवितात' 'त्यांचे म्हणणें कीं,' 'असें असावें' 'सांगतात,' 'म्हणतात' 'पुष्कळ' 'बहुतेक' 'बहुशः' 'मुख्य' असल्या मराठी भाषेंतील शब्दांनीं व शब्दप्रयोगांनीं ज्ञानकोशकारांवर व रा. राजवाड्यांवर फार, नव्हे अनंत उपकार करून ठेविले आहेत असें कोणी म्हटल्यास ती अतिशयोक्ति होऊं शकणार नाहीं. या शब्दांच्या आड जरी ते उभे राहिले आहेत तरी त्यांचें अंतरंग सहजच उघडें पडत आहे. वरील शब्दांनीं युक्त अशीं वाक्यें स्वतंत्रपणें वाचून पहावींतच. त्याशिवाय त्यांतील खरा रसास्वाद प्राप्त होणें शक्य नाहीं. आणखी एक दोन गमती सांगतों. "देशस्थांशीं आपला लग्नव्यवहार २५० वर्षांपासून असल्याचें सांगतात" असें एक वाक्य आहे. म्हणजे काय ? पूर्वीं कधीं नव्हता व हल्लीं सरसकट आहे असें ? ज्ञानकोशकार लिहितात. "यांच्यांत पोटजाती नाहीत" म्हणजे काय ? 'देवरुखे' हे

युरोप आफ्रिकेंतून नुकतीच येथें येऊन तळ देऊन राहिलेली एखादी पाहुणी अशी स्वतंत्रच जात अगर समाज आहे कीं काय? ज्ञानकोशकारांची तरी काय कल्पना झाली आहे? त्याच्याच पुढचें दुसरें वाक्य " हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात " पण हें एकावयास ज्ञानकोशकार कोठें गेले होते ! लिहावयास काय पाहिजे तें लिहून छापतां येतें. किं एकदा वाहवत सुटलें म्हणजे म्हणजे काय पाहिजे तें लिहून टाकावयाचें? प्रत्येक ठिकाणीं सारासार विचार म्हणून कांहीं असतोच कीं नाहीं? "हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोट जात म्हणवितात " या वाक्यानंतर आणखी कांहीं वाक्यें लिहिल्यानंतर ज्ञानकोशकार म्हणतात " ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी तैत्तिरीय शाखांतर्गत हिरण्यकेशी अशा दोन शाखा यांच्यामध्यें आहेत." याप्रमाणें देवरुख्यांमध्यें दोन्ही वेदाच्या शाखेचे लोक आहेत हें जर सिद्ध आहे तर ज्ञानकोशकारांनीं "हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोटजात म्हणवितात " असें जें वाक्य आहे त्याचा अर्थ कसा लावावयाचा? किंवा " हे आपणांस म्हणवितात " यांतील " म्हणवितात " या क्रियापदाचा येथें उपयोग केला असल्यामुळें कोशकार सुटत आहेत? पण कोशकारांपाशीं याप्रमाणें म्हणावयास तरी कोण गेला होता हें कळूं शकेल काय? निदान कोशकारांनीं तरी या वाक्याची संगति कशी लाविली असेल ती त्यांची त्यांनांच ठाऊक? असो; या सर्व गोष्टी ज्ञानकोशाच्या ज्ञानभांडारांतच शोभोत.

ज्ञानकोशकारांनीं 'शतप्रश्नकल्पलते'करितां एक स्वतंत्र प्यारा राखून ठेवून अध्यायप्रश्ननिशीवार तिच्यतील त्याना देवरुखे याच्या दंतकथेचा जो मुद्दा सांगून ठेवावयाचा होता तो त्यांनीं अगदीं स्पष्ट नमूद करून टेविला आहे. त्याचबरोबर कै. पंडित

विष्णुशास्त्री यांनीं लिहिलेल्या ग्रंथाचा उल्लेख करणेंहि त्यांनां भाग पडलें आहे. पण त्या ग्रंथाचें नुस्तें संपूर्ण नांवहि त्यांच्यानें छापवलें नाहीं. " पंचद्रविडांतर्गत महाराष्ट्र ब्राह्मणांतील देवरुख्यां-विषयीं शास्त्रसंमत विचार " एवढेंच नांव दिलें आहे. पण त्याच्या-पुढें " आणि त्यांजविषयीं खोट्यां प्रवादांचें खंडन " हें त्या ग्रंथाचें नांव संपूर्ण दिलें असतें तर मांजर आडवें कां गेलें असतें ? " त्यांत देवरुख्यांना देशस्थ म्हटलें आहे " एवढेंच त्या ग्रंथाविषयीं नमूद करून ठेविलें आहे. पण त्यांतच पंडित विष्णु-शास्त्री यांनीं या 'कल्पलते'चा कर्ता अगदीं सामान्य प्रतीचा, अ-व्युत्पन्न, इतिहासानभिज्ञ, वृथाजात्यभिमानी व दुरभिमानी कोणी तरी माध्व पुराणिक होता हें सिद्ध केलें आहे. तसेंच त्याच कल्प-लतेंतील नायक देवरुख्यांविषयींच्या द्वेषाचा आद्य प्रवर्तक जो चितळेभट्ट त्याच्या कृतीचा पूर्ण निषेध केला आहे. इतकेंच नव्हे, तर श्रीमद्भागवतांतील व मनुस्मृतींतील वगैरे धर्मशास्त्रार्थांप्रमाणें उलट हा चितळेभट्टच दुराग्रही, तामसी, महापापी व अधमाधम व अत्यंत मोठा गुन्हेगार कसा ठरतो व हें त्याचें आचरण किती निंद्य आहे हें साधार सप्रमाण सिद्ध केलें आहे. इतकेंच नव्हे, तर इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांपेक्षां देवरुखे यांचा दर्जा कोणत्याहि प्रकारें यत्किंचितहि कमी नाहीं असें सिद्ध केलें आहे. एवढा हा चार सहा ओळींचा मजकूर जर रा. राजवाडे यांच्या मजकुरापुढें नमूद करून ठेविला असता तर त्यांत काय बिघडलें असतें ? " शतप्रश्नकल्पलतेमध्यें यांच्या ( देवरुख्यांच्या ) उत्पत्तीबद्दल एक कथा आहे; तीच सर्वत्र आढळते " या त्यांच्या हृदयवाक्या-वर या मजकुरानें कायमचें विरजण पडेल अशी ज्ञानकोशकारांना भीति वाटली कीं काय ? कीं या गोष्टी त्यांना उमगल्याच नाहींत ?

" यांचे ( देवरुख्यांचें ) म्हणणें कीं............मग परशुरामानें चित्पावनांना निर्माण केलें व देवर्षि ब्राह्मणांना शाप दिला " असें 'कल्पलते'च्या प्यान्यांतच ज्ञानकोशकारांचें एक वाक्य आहे. पण हें वाक्य कोणाचें ? कोणत्या देवरुखे इसमानें हा त्यांना शोध लावून दिला ?

सह्याद्रिखंडांत परशुरामानें शाप दिल्याची एक कथा आहे. पण हा शाप कोणाला दिला आहे ? देवर्षीना मुळींच शाप दिलेला नाहीं. परशुरामानें परशुराम क्षेत्र निर्माण केलें. त्यानंतर त्यानें चित्पावन ब्राह्मण उत्पन्न केले. शिवाय दुसरीकडून हि त्यानें कांहीं ब्राम्हण आपल्या क्षेत्रांत आणून ठेविले. यांना सोडून परत जातांना परशुरामानें त्यांना सांगितलें कीं "तुमच्यावर जेव्हां एखादें संकट येईल त्यावेळीं मला हांक मारा म्हणजे मी येईन." पण या ब्राम्हणांचा या वचनावर विश्वास न बसून परीक्षा पहाण्याकरितां उगाच खोटेपणानें धांवा केला हा धांवा ऐकून परशुराम तेथें आला आणि पहातो तों निराळाच प्रकार! यावर परशुरामाला क्रोध आला आणि त्यानें उत्पन्न केलेल्या व येथें नवीन आणून ठेविलेल्या ब्राम्हणांना शाप दिला. असा हा शापाचा खरा प्रकार व खरा प्रसंग सह्याद्रिखंडांत वर्णिला आहे. परशुरामानें कोणकोणत्या ब्राम्हणांना शाप दिला त्या ब्राह्मणांची यादी दिली आहे. पण त्यांत देवर्षि ब्राम्हणांचा कोणत्याहि प्रकारचा उल्लेख अगर संबंध आलेला नाहीं. उलट त्याच्या वडिलाच्या श्राद्धास देवर्षि ब्राम्हणांना क्षण दिला असतां ते गेले नाहींत. व अत्यंत पवित्र ब्राम्हण क्षणाला बसूं इच्छित नाहींत ही परंपरा अद्यापहि चालू आहे हें निराळें सांगावयास नकोच. नंतर परशुरामानें चित्पावनांना उत्पन्न केले; पण तो या देवर्षि ब्राम्हणांना शाप देऊं शकला नाहीं असेंच म्हणणें भाग

पडेल. यावरून हेंहि सिद्ध होत आहे कीं, परशुरामानें हे चित्पावन ब्राम्हण उत्पन्न करण्यापूर्वीच सह्याद्रीमध्यें देवर्षींचा निवास होता.

पुराणांतून व संस्कृतांत देवरुखे यांना देवर्षि म्हटलें आहे. त्याचप्रमाणें परंपरागत चालत आलेल्या ज्ञानाला व समजुतीला अनुसरून थेट श्रीकाशीक्षेत्रापर्यंत यांना देवर्षिच म्हणत आलेले आहेत. तर मग असें असतां देवरुखे हे देवराष्ट्रांतून कोंकणांत सुमारें शक ४५० च्या सुमारास आले असें जें रा. रा. राजवाडे म्हणतात त्याचा अन्वयार्थ कसा लावावयाचा ? सोपारें येथील चिटोऱ्याचा धागा धरून रा. राजवाडे या तर्कज्ञानांत शिरत आहेत. पण या चिटोऱ्यांतील श्लोक व 'देवर्षि ऊर्फ देवरुखे यांचा अर्थाअर्थी कोणत्याच प्रकारचा संबंध येत नाहीं हें सिद्ध झाल्यावर रा. राजवाडे यांच्या मताला मुळींच जागा उरत नाहीं हें सिद्धच होत आहे. त्याचप्रमाणें ज्ञानकोशांत एक वाक्य आहे तें असें. "यांचें ( म्हणजे कोणत्या इसमांचें ? ) म्हणणें कीं, या ब्राम्हणांना क्षण दिला असतां हे गेले नाहींत म्हणून मग त्यानें ( परशुरामानें ) चित्पानाना निर्माण केलें, व देवर्षि ब्रह्मणांना शाप दिला" तेव्हां या वाक्यालाहि सह्याद्रिखंडांत मुळींच आधार मिळूं शकत नाहीं व त्यामुळें तें अगदींच विसंगत आहे असें म्हणणें भाग आहे.

रा. राजवाडे यांनीं आपल्या लेखांत जो आवाज काढला आहे त्याचाच प्रतिध्वनि ज्ञानकोशकारांनीं आपल्या कोशांत उमटविलेला आहे. रा. राजवाडे म्हणतात " सध्यां मुंबईतील बहुतेक खाना-वळी देवरुख्यांनीं चालविलेल्या आहेत व त्यांत सर्व तऱ्हेचे ब्राह्मण जेवतात तेव्हां मुंबईपुरतें तरी पंक्तिपावनत्वाचा प्रश्न राहिलेला

नाहीं." म्हणजे काय? मुंबई बाहेरच्या टापूंत सध्यां हा प्रश्न आढळून येतो कीं काय ? मुंबईचा टापू हा कोंकणच्या लगत असल्या कारणानें तेथें कांहीं देवरुख्यांच्या खानावळी असणें साहजिकच आहे. पण खुद्द मुंबईत अगर मुबईबाहेर पुण्यासारख्या शहरांत ज्या खाणावळी अगर जेवणांच्या अन्य मोठमोठ्या संस्था आहेत त्या बहुतेक चित्पावन ऊर्फ कोंकणस्थ यांच्याच आहेत. थोड्या बहुत देशस्थांच्या आहेत त्यांतहि पुष्कळ 'देवरुखे' जेवीत असतात. पण तेथें तरी हा प्रश्न आमच्या संशोधकांना आढळून येतो काय ? शिवाय घांटावर देशांतदेखील अनेक खेड्यापाड्यांत अगर सातारा, नाशिक, धुळें, जळगांव असल्या शहरांत पुष्कळ देवरुखे आहेत तेथून तरी या प्रश्नाचा वास आमच्या संशोधकांना येत आहे काय ? आमचे संशोधक पुढें म्हणतात "कोंकणांतहि ( मागील वाक्यांतील 'सध्यां' ) बहुतेक लोक ह्या जातीशीं अन्न-व्यवहार करितात " म्हणजे पूर्वी करीत नव्हते कीं काय ? किंवा हल्लीं चितळेभट्टाच्या अवशेष राहिलेल्या पक्षांतील उरलेला दहा हजारांत एखादा करीत नसेल तर तो आमच्या संशोधकांच्या मतें शहाणा कीं समंजस ? याच्यापुढें संशोधकांचें दुसरें वाक्य असें. "तेव्हां पंक्तिपावनत्वाच्या प्रश्नांत आतां कांहीं म्हणण्यासारखें तथ्य राहिलें नाहीं." म्हणजे पूर्वी तरी हा प्रश्न संशोधकांच्या 'तथ्यानें' अगदीं थबथबलेला होता कीं काय ? बरें; आतां एक या प्रश्नांत म्हणण्यासारखें तथ्य राहिलें नसेल; पण समजा कीं चितळेभट्टाचा एखादा छोटासा अवतार आज पुनः अवतरला तर त्याच्या बावट्याखालीं आपल्या गणांसह येऊन उभें रहाण्यास संशोधक व त्यांचीच 'री' ओढणारी, ज्ञानकोशसंपादक मंडळी तयार होईल काय ?

" गरीब विद्यार्थ्यांकरितां अलीकडे यांनीं कांहीं फंड काढले आहेत " ही एक गोष्ट कोशांत नमूद करून ठेविलेली आहे. पण यांत कोणतें स्वारस्य कोशकारांना वाटलें ? फंड काढणें, सभा काढणें, अगर संस्था काढणें म्हणजे संघटनेचाच एक प्रकार आहे. भोंवतालच्या लोकांची उपाधी अगर जुलूमवजा त्रास होऊं लागला म्हणजे त्याला प्रत्याघात अगर प्रतिक्रिया अथवा स्वसंरक्षण म्हणून अशा संस्था निघत असतात. ब्राह्मण ब्राह्मणेतर हा वाद उपस्थित होऊन ब्राह्मणांना जेव्हां आंच लागूं लागली तेव्हां ब्राह्मण्यसंरक्षक परिषद् अस्तित्वांत नाहीं काय आली ? पुण्यास ब्राह्मण विद्यार्थी साहाय्यक मंडळ पुणें, अशी एक संस्था सुमारें सन १९१२-१३ सालीं अस्तित्वांत आली होती. तेथेंच ऋग्वेदी देशस्थांच्या गरीब विद्यार्थ्यांना साह्य करण्याकरितां अशीच एक नुकतीच संस्था स्थापन झालेली आहे. अशीं एक ना दोन किती तरी उदाहरणें दाखवून देतां येतील. हल्लीं हिंदुसंघटनाविषयीं आम्ही फार आतुर झालों आहों. सारांश, असल्या संघटनाच्या म्हणून ज्या ज्या संस्था निघतात त्यांची पूर्वपीठिका अगर त्यांविषयीं सर्वसामान्य नियम अशाच प्रकारचा असतो. पुण्यास नुकतीच गेल्या जानेवारींत ब्राह्मणांचें संघटन करण्याच्या उद्देशानें एक महाराष्ट्र-ब्राह्मण-सभा म्हणून निघालेली आहे त्याचा तरी अर्थ काय ? हाच.

" कुलाबा जिल्ह्यांत दहिवली येथील विठ्ठलदेवाचें एक संस्थान या जातीच्या पंचायतीच्या मालकीचें आहे. गरीब विद्यार्थ्यांकरितां अलीकडे यांनीं कांहीं फंड काढले आहेत. पूर्वी यांच्यांत पंचायती होत्या सांप्रत नाहींत. यांच्यांत पोट जाती नाहींत. हे आपणांस ऋग्वेदीय देशस्थांची पोट जात म्हणवितात. आणि देशस्थांशीं

आपला लग्नव्यवहार २५० वर्षांपासून असल्याचें सांगतात. यांचा धर्मविधि देवरुखे भिक्षुकांकरवींच बहुशः होतो. हे आपांक्त नाहींत याबद्दल निरनिराळया ठिकाणच्या धर्मसभेचीं व अधिकाऱ्यांचीं आज्ञापत्रें ( नकला ) पाहण्यांत येतात. तसेंच देशस्थ व देवरुखे या दोघांच्या कुलस्वामीमध्येंही बरेंच साम्य आहे. तुळजापुर व कोल्हापुर येथील देवी, जेजुरीचा खंडोबा हे यांचे मुख्य देव आहेत. " अशीं अनेक वाक्यें ज्ञानकोशकारांनीं लिहिलेलीं आहेत. म्हणजे पण याचा अर्थ काय ? आणि हेतु तरी काय ? म्हणजे ही अगदीं कांहीं तरी आपली एक जात आहे असें ? म्हणजे हिच्यांत उच्च ज्ञान नाहीं, उच्च उपासना नाहीं, उच्च कर्में नाहींत असें ? गणपती, शंकर, राम, विठोबा, श्री दत्त वगैरे देवतांचीं किती तरी मंदिरें आपल्या उपास्याच्या भक्तिप्रेमामुळें या लोकांनीं उभारलेलीं आहेत. याची काय वार्ता ज्ञानकोशकारांना लागलीच नसेल ? नाहीं म्हणावें तर इतर गोष्टी यांना कशा आढळल्या ? व त्या विपरीत स्वरूपांत देतां आल्या ? कीं चांगल्या वार्ता मुद्दाम लावूनच घेतल्या नसतील ? किं लागल्या असून सुद्धां दिल्या नसतील ? यांचा मुख्य देव जेजूरीचा खंडोबा असें आहे ज्ञानकोशकार उल्लेखितात. पण या देवतेचीं कितीशीं देवळें देवरुख्यांनीं बांधलेलीं ज्ञानकोशकारांना आढळलीं आहेत ? अगर जेजूरी येथील देवतेस कितीशा देणग्या भाविक देवरुख्यांनीं दिलेल्या ज्ञानकोशकारांस आढळलेल्या आहेत ? किंवा कितीशा देवरुख्यांनीं येथील यात्रा केलेल्या आहेत ? म्हणूनच आम्ही म्हणतों कीं हा मजकूर लिहून झाल्यावर त्यांना छापावयाचाच होता तर देवरुखे समाजांतील एकदोन सज्जन, शहाण्या व सुशिक्षित गृहस्थांना दाखवून मग तरी छापावयास पाहिजे होता. याकरितांच, आम्ही या लेखाच्या आरंभीं दास, दांगट, दुबळे,

देवांग, दैवज्ञ वगैरेंच्या वर्णनाचे मासले दाखविले आहेत. त्या वर्णनाबरोबरच हें वरील प्रमाणें दिलेलें ' देवरुखे ' यांचें वर्णनहि वाचून पहावें म्हणजे ' ज्ञानकोशकारां'विषयीं लिहितांना प्रारंभीं जो आम्ही एवढा उपोद्घात केला आहे त्यांतील मर्म काय आहे हें ध्यानीं येईल. शेवटचा प्यारा त्यांना लिहावयाचाच होता तर तो पूर्ण करतांना अंताजी दामोदर शितुत कीं ज्याचें वजन व महत्व शिंद्यांच्या दरबारांत इतकें वाढलें कीं त्यांनीं त्याला आपल्या नांवाचें नाणेंहि पाडूं दिलें; इतकेंच नव्हे, तर हा अंतुशाही रुपया अझूनहि प्रचारांत चालू असल्याचें ऐकतों. त्या अंतांजीपंताचें नांव ज्ञानकोशकारांना दिसलेंच नाहीं ? अशा एक कीं दोन किती गोष्टी सांगाव्यात ? त्यांच्या लेखांतील प्रत्येक वाक्य, त्यांतील शब्द, त्यांची जुळवणी यावरून ज्ञानकोशकारांचे अंतरंग उघडें होत आहे. असो; आतां कोठवर लिहावें ? एवढया ऊहापोहावरून व विवेचनावरून संशोधक राजवाडे व ज्ञानकोशकार यांचा रोख, झोंक, कल कसा झुकतो आहे हें सहज कोणालाहि कळून येण्यासारखें आहे. परमेश्वर त्यांचें भलें करो ! ! !

ॐ तत् सत् ॐ

# परिशिष्ट.

## ( १ )

## मुक्तिमंडपांतील निर्णय शके १५०५ सन १५८३

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीविश्वेश्वरायनमः ॥ अथ स्वस्तिश्रीमन्नृप शालिवाहन शके १५०५ ॥ वर्तमाने शुभानुसंवत्सरे ॥ स्वस्तिश्रीमत्सकळगुणगुणाळंकृतानेक विद्वज्जनप्रतिपाळक सौजन्यकल्पतरु परमसिंधु शिरोमणिमेंल्क्ष्मि श्री नारायणचरणेषु निरतांतःकरण औदार्य स्थैर्य गांभिर्याद्यानेकोपार्जित यशः पुंज महामेरू राजश्री महाभाग्योदय राजमान्य गणेशप्रभु भडसवळे तथा हरदेप्रभु तेरे तथा विश्वनाथप्रभु चांफेकर तथा वालप्रभु खालगांवकर तथा आरेकर महाजन प्रमुख समस्त कोंकणस्थ देवर्षि ब्राम्हण मध्यमोत्तमेषु वृद्धवृद्धेषु सर्वेषांप्रति काशीस्थ आश्रित कोझरेकर गणेश भट्ट कृतानेकयथायोग्यनमस्काराः तथाशीर्वादाः शमत्रभवत्कं भावुकमाशास्महे विशेस्तु कोळसुरचे विटल ज्योतिषि वर्षे आठ काशीवास करीत असतां ये वर्षी त्यांचे पुत्र कृष्ण ज्योतिषी आल्यानंतर सत्संगति करून अग्निहोत्राचा विचार केला. दोघहि पुत्र आपणहि प्रयोगिं अभ्यासु केला उपरि समस्त काशिकर ब्राह्मण वैसउनि आम्हि अग्निहोत्र करविलें विठ्ठल ज्योतिषी अग्निहोत्री जाहाले तेथें ऋत्विज्य अभयंकर विरेश्वर भट्ट भावये हरिभट्ट गोडवोले गोविंदभट्ट अभयंकर केशवभट्ट आम्ही सर्व अंगिकार करूनि तुम्हांशि समस्तांशि बरवें व्हावें या कारणें समस्त ब्राह्मणाचे संमतें अग्निहोत्र करविलें जाणिजे उपरि अनंत भट्टांचे अमात्य अभयंकर गोविंदभट्ट धोंड ज्योतिषी पुराणिक रामकृष्णभट्ट अनंत भट्टाचा पक्ष बोलत होते तेथें चितळे जनार्दनभट्टिं आमचे घरीं देवर्षिब्राम्ह-

णांचे अनंतभट्टिं उद्धारपत्र लिहिलें तें आहे तें पत्र आणुनि सभासदिं वाचून पाहिलें अनंतभट्टिं लिहिलें देवर्षि ब्राम्हणा- सांगातें द्वेषु केला होता जो तो शास्त्रविरुद्ध त्यास आम्हास अन्न- संबंध आहे जे न म्हणति त्यास विश्वेश्वराची आण इतुके आईकोन तेथें सभासदिं विचारू केला जो अनंतभट्टिं देवर्षी ब्राम्हणांसांघातें द्वेषु केला तो शास्त्रविरुद्ध या कारणें चिपळुणे देवर्षी महा- राष्ट्र हे समस्त ब्राम्हण समान वैदिक कर्मि वा अन्नसंबंधिं समस्तांशि अधिकार ऐसा निश्चय जाहाला यांहिं ब्राम्हणिं परस्पर द्वेषु करू नये तत्र संमतिः । भावये गणेश दीक्षित प्रमुख चिपोळणे बखले कृष्णभट्ट प्रमुख कन्हाडे शेष कृष्णभट्ट पंडित प्रमुख महाराष्ट्र गोपीभट्ट प्रमुख गुर्जर विद्यानिवास भट्टाचार्य प्रमुख गौड रघुपति उपाध्याय प्रमुख तैलभुक्त समस्त ब्राह्मणाचें समत्ति करून खरे गणेशभट्ट चितळे जान- भट्ट सावरकर विठोवा केशव नाईक प्रमुखांपाशि देवर्षी ब्राह्मणाचे ताम्रपट्टे पाठविले असतिं देवर्षी ब्राह्मणांस आम्हास पूर्वी अन्नसंबंध होता मध्यें अनंतभट्टिं नाहिं म्हणितलें होतें तें गोविंदभट्ट आदिकरून देवर्षी ब्राह्मण विठ्ठल अग्निहोत्री याचे घरीं आम्हि अन्न- संबंध केला तुम्ही सकळक अरित साकोणि (सकळ करितसा कोणि) अन्नसंबंध न म्हणतिं त्याशि श्रीविश्वेश्वराची आण जे अति पाषांड मत्त करेती-त्याचे मायवरि गर्दभ इतिं मुक्तिमंडपमध्ये निर्णयः ॥ तथा पुरोहित विश्वनाथ भट्टांशि कोझरेकर गणेश भट्टांचे अनेक नमस्कारः । विश्वेवर प्रसन्न ॥ कृष्णाजि व कानोजि राजे गोसावि याशि काशिस्थ कोझरेकर गणेश भट्टाचे अनेक आशिर्वादः सकळ ब्राह्मणांचे प्रतिपाळक देवर्षी ब्राह्मणाचे ताम्रपटे पाठविले असति इतिं विज्ञप्तिः ॥ काळभैरवायनमः ॥ तौ ताम्रपटौ धामणसे ग्रामे दैवज्ञाग्निहोत्रिगृहे इदानिं तौ ताम्रपटौ स्त इतिं ॥ छ ॥

## ( २ )

## मुक्तिमंडपांतील निर्णय शाक १५७२; सन १६५७.

### ॥ श्रीविश्वेश्वरो जयतेतराम् ॥

॥ श्रीः ॥ श्रीः ॥ अथ देवर्षिविप्राणां काश्यां श्रीमुक्तिमंडपे ॥ यतिमिश्रविपश्चिद्भिः सद्ब्राह्मण्यं विविच्यते ॥ १ ॥ तत्र तावत्पूज्यपादपरमहंसपरिव्राजकमहाराष्ट्रकार्णाटककोंकणतैलंगद्राविडादिसकलज्ञातीयविद्वद्गृहस्थनिचयसंमत्या वेदशास्त्रलोकतो विमृश्य देवर्षिब्राह्मणा वेदशास्त्रपुराणेतिहासेभ्योधिगतपरमार्थाः ॥ क्रतुयजनयाजनादिसदाचरणशीलाः पंक्तिपावनाः शरीरान्वयार्हा अत्युत्तमब्राह्मण्यशालिनः ॥ शिष्टानुष्ठितशरीरान्वयाश्चेति सिद्धांतितम् ॥ दृष्टं चैतत् ॥ भट्टमीमांसकश्रीभट्टरघुनाथाख्यसूरिभिः ॥ मणिकर्णीत्युपाख्यस्यानंतभट्टस्य कन्यका ॥ देवर्षेः प्रसमुद्वाह्य वाजपेययाजिः कृता ॥ भूयांसश्चेदृशा अन्ये तद्वंशीया वयं च ते ॥ ब्रुवाणा दोषमत्रार्थे विद्वद्भिः परिशोधिते । विश्वेशद्रोहिणो ब्रह्मघातिनश्च भवंति ते ॥ इति दिक् ॥ लिखितं चैतन्मीमांसकभट्टलक्ष्मणेन लिखितं विद्वदनुज्ञातेन ॥ ॥ संवति कृतक्षगाब्द १७१४ संमितौ नंदशैलशरभू १५७९ मितशाके ॥ हेमलंबशारदि समपत्रं ज्ञायते सकलभूसुरवृंदैः १ ॥ श्रीः ॥ ७ ॥ ७ ॥

संमतार्थोयं पूर्णेंद्रसरस्वतीयतेः ।

व्यासेंद्रस्य संमतार्थः ।

पत्रार्थे संमतं भट्टनीलकण्ठस्य ।

संमतं चक्रपाणिपंडितशेषस्य ।
संमतश्चार्थोऽयं आउबाशुक्लस्य ।
संमतिरत्र काळोपनामगोविंदभट्टस्य ।
संमतं बापुव्यासस्य ।
संमतं मौनीगोपीभट्टस्य ।
संमतं रघुदेवभट्टाचार्यस्य ।
संमतार्थोऽयं दशपुत्रगोविंदभट्टस्य ।
अत्र संमतं विनायकशुक्लस्य ।
संमतं टेंकाळोपाख्यबापुभट्टस्य ।
संमतश्चार्थोयं विद्वांसोपाख्यबहिरवभट्टस्य ।
गणेशदीक्षितस्य च संमतम् ।
संमतं दातारविश्वनाथस्य ।
संमतं कोबाइवासुदेवस्य ।
संमतं नारायणभट्टआरडे इत्युपनाम्नः ।
संमतं गह्वारनृसिंहभट्टस्य ।
पायसोपाख्यनृसिंहभट्टस्य संमतम् ।
संमतं वडेरुतमणभट्टस्य ।
संमतं कुंडलीघाऊभट्टस्य ।
संमतश्चार्थोऽयं ब्रह्मेन्द्रसरस्वत्याख्ययतेर्नृसिंहाश्रमस्य ।
संमतश्चार्थोयं अनंतदेवस्य ।
संमतार्थो गागाभट्टस्य ।
अस्मिन्नर्थे संमतं साम्राज्यपंडितस्य ।
संमतं भय्याभट्टस्य ।
संमतं गोविन्दभट्टाचार्यस्य ।
संमतं बालकृष्णदीक्षितस्य ।

संमतं शुक्लोपाख्यवीरेश्वरस्य ।
संमतं कोरडेहरिशंकरस्य ।
तुलसीदेवभट्टस्य संमतं
संमतं चंडीभैरवस्य ।
संमतं मनोहरविश्वनाथस्य ।
अप्पायादीक्षितस्य संमतोऽर्थोऽयम् ।
रामहृदस्थधुंढिराजसंमतम् ।
संमतं भास्करज्योतिर्विदः ।
संमतं महाशब्दोपाख्यज्योतिर्विदः ।
संमतं नगरकरकृष्णभट्टस्य ।
संमतं वैशंपायनगिरिधरभट्टस्य ।
संमतं खरोपनामकगणेशभट्टस्य ।
संमतं गौतमरामभट्टस्य ।
संमतं चिंतामणिभट्टद्रोणस्य ।
संमतं कविमंडनबालकृष्णभट्टस्य ।
संमतं काळबांडे वीरेश्वरभट्टस्य ।
संमतं पाटणकरविष्णुदीक्षितस्य ।
संमतार्थः शिवरामतीर्थनारायणतीर्थस्य च ।
संमतोऽयमर्थः खडदेवस्य ।
संमतार्थो भट्टअनंतमीमसकस्य ।
संमतं चात्र लक्ष्मणपंडितवैद्यस्य ।
संमतं चैतन्माधवदेवस्य ।
रामरामभट्टाचार्यस्य चार्थोऽयं संमतः ।
रामहृदयस्य गोमाजीभटस्य संमतार्थः ।
संमतार्थोयं डाउगणेशदीक्षितस्य बापुदीक्षितस्य च ।

संमतं पाळशेतकरज्योतिर्विन्नारायणस्य ।
संमतं दाभोळकरज्योतिर्विद्विठ्ठलस्य ।
संमतं भावेरुद्रदीक्षितस्य ।
संमतं काशीसोमयाजिनो लक्ष्मणसोमयाजिनश्च ।
संमतं महाशब्देदेवभट्टस्य ।
संमतं घुमरेमहादेवभट्टस्य ।
संमतं पोळकाशीभट्टस्य ।
अभिमतोऽर्थोऽयं सच्चिदानंसरस्वत्याख्यस्य
संमतोर्थोयं तिलभांडेश्वरस्य ।
संमतोर्थोयं मौनीविष्णुदीक्षितस्य ।
पत्रार्थे संमतिर्नरहरिदीक्षितस्य विष्णुदीक्षितस्य च ।
लक्ष्मणदीक्षितस्य संमतोर्थः ।
संमतोर्थो दीनदीक्षितस्य नमूदीक्षितस्य च ।
संमतं वाछाभट्टस्य ।
संमतं चैतत् पौराणिकगदाधरस्य ।
संमतार्थोऽयं जयरामन्यायपंचाननस्य ।
संमतं भारद्वाजमहादेवस्य ।
संमतं साठे उपनामकमहादेवस्य ।
संमतं पोटे महादेवभट्टस्य ।

---

## ( ३ )

## श्रीक्षेत्र काशी येथील ब्राह्मण भोजन.

## शक १६०५; सन १६८३.

॥ श्रीकाशीविश्वेश्वरो जयति ॥

श्री सर्वोपमयोग्य नारायण दीक्षित वेदमूर्ति यांसी हरि दीक्षित नारायण दिक्षित यांचे अनेक नमस्कार:

उपरि तुमची आज्ञा घेऊन वाराणसीस आल्यानंतर तुमचे जांवई गोविंद दीक्षित चौधरी यांबरोबर जे कोण्ही स्पर्धा करीत होते ते ब्राम्हण पंडित वैदिक आम्हापाशि येऊन बोलले जे तुम्हां-आम्हांमध्यें द्वेष करीत होते आजपर्यंत स्पर्धा होती ते स्पर्धा मोडावी तर तुम्ही शेंदोनशें ब्राम्हण भोजन कराल तरी स्पर्धा मोडेल त्या उपरि आम्ही व गोविंद दीक्षित चौधरी विचार करून ब्राम्हण भोजन केलें. सर्वही ब्राम्हण महाराष्ट्र येणें प्रमाणें ब्राम्हण भोजनास आले होते. संवत् १७४० शके १६०५ रुधिरोद्गारी संवत्सरे आश्विन कृष्ण द्वितीया गुरुवासरे शुभ योगे.

गंगाधरभट्ट लंगडे यांचा तड

बाळंभट्ट आंबेकर पुत्रसहित

१ शंकरभट्ट आंबेकर

१ वीरेश्वरभट्ट आंबेकर पुत्रसहित

१ लक्ष्मणभट्ट आंबेकर पुत्रसहित

१ रामभट्ट ठोसर

१ रघुनाथभट्ट ठोसर

१ शामभट्ट रामडोहकर

१ बापूभट्ट लंगडे

१ गणेशभट्ट लंगडे

३ विश्वनाथभट्ट लंगडे

१ शामभट्ट द्रोण

३ कृष्णंभट्ट नगरकर

३ गाव्या

४ श्रीपतभट्ट करवे

१ अनंतभट्ट घुमरे

१ गोपाळभट्ट वाळवे
१ गदाधरभट्ट व्यास
१ कृष्णंभट्ट बारहाते
१ गणेशपंत दशपुत्र
१ महादेवपंत दशपुत्र
५ भैरवभट्ट आत्रे
३ गौरीपतिभट्ट
१ गोविंदभट्ट पुराणिक
१ वेणीभट्ट पुराणिक
१ गर्लेडे
१ पाळभट्ट पोहनर्कर
४ केशव आचार्य
१ वैजनाथभट्ट डोबे
१ रघुनाथभट्ट पन्नाभट्टी
१ गोविंदभट्ट तत्सत्
१ केशवभट्ट रामडोहकर नडाचे
१ गंगाधरभट्ट द्वितीय सरस्वती
१ सोमयागी दामोदरभट्ट
१ जयरामभट्ट कोळत
१ गोपाळभट्ट काळे
१ महादेवभट्ट कस्तुरे
१ वैजननाथभट्ट खंदारकर
१ त्र्यंबक श्रोत्रीय

केशवभट्ट रामडोहकर यांचा तड

१ आमाभट्ट रामडोहकर
१ सर्वोत्तमभट्ट निम्हर्ले
१ नारायणभट्ट निम्हले
१ काशीभट्ट पोहळ
१ मार्कंडेयभट्ट द्रोण
१ विष्णुभट्ट द्रोण
१ यादवभट्ट काळबांडे
१ भय्याभट्ट काळबांडे
१ गोपाळभट्ट व्याघ्र
१ सदाशिवभट्ट व्याघ्र
१ सदाशिवभट्ट व्याघ्र
१ विरेश्वरभट खरडे
१ महादेवभट्ट खरडे
१ अनंतभट्ट खरडे
१ नारायणभट्ट खरडे
१ बाळंभट्ट खरडे
१ रामकृष्णभट्ट मोगकर
१ विश्वनाथभट्ट शुक्ल
१ रामभट्ट उपासनी
१ कृष्णभट्ट उपासनी
१ वासुदेवभट्ट उपासनी
१ गोविंदभट्ट उपासनी
१ केशवभट्ट शिंगी
१ नारायणभट्ट भड
१ बाळंभट्ट भड
१ जिवरामभट्ट भड

१ नारायणभट्ट सामक
१ शंकरभट्ट कविमंडन
१ काशिभट्ट कविमंडन
१ महादेवभट्ट पोटे
१ नारायण भट्ट निरंतर
१ त्रिंबकभट्ट काळवोंडे
१ विष्णुभट्ट मुरडी
१ जिवराम मुरडी
१ जिवरामभट्ट राक्षसभुवन
१ त्र्यंबकभट्ट कोकीळ
१ नारायणभट्ट आर्वीकर
१ श्यामभट्ट काळे
१ रघुकेदार
१ चिमणभट्ट केदार
१ विद्याधर जोशी
१ वैजनाथभट्ट डोंबे
१ नारायणभट्ट भिवंपुरे
१ जानराय
१ महादेवभट्ट ताम्हण
१ महारुद्र दशपुत्र
१ लक्ष्मण विद्यार्थी
१ वचाभट्ट तत्सत्
१ श्यामभट्ट तत्सत्
१ काशीभट्ट तत्सत्
१ धुंडिराजभट्ट कुस्तुरे
१ वासुदेवभट्ट कुस्तुरे
१ घोडे नरसिंह भट्ट
१ आप्पाभट्ट दशपुत्र
१ सदाशिवभट्ट श्रीवश
१ शिवराय
१ बाळंभट्ट जबाने
१ श्यामभट्ट ताम्हण
१ विनायक श्रीवश
१ रामभट्ट व्यास
१ कानभट्ट संवत्सर
१ दुर्गाभट्ट राक्षसभुवन
१ नरसिंहभट्ट कुर्दवाडकर
१ गोविंदभट्ट आंबेरकर
१ रघुनाथभट्ट आरवेकर
१ राजारामभट्ट अयाचित
१ वैजनाथभट्ट अयाचित
१ शिवरामभट्ट महाशब्दे

येणेंप्रमाणें ब्राम्हणभोजन करून ग्रामण्य वारले कळले पाहिजे हे विज्ञप्तिः ॥ ६ ॥

अस्सल पत्र वे. शा. कृष्णंभट्ट उर्फ धाकंभट्ट कारूळकर मु० हिदवली यांचे घरीं आहे.

## (४)

## सं. राजवाड्याचें सुपारें येथील निर्णयपत्र येणेंप्रमाणें:—

स्वस्ति श्रीमधुमारमणचरणरुहांतःकरण
षट्कर्मपरायण वेदशास्त्रसंपन्न राजपूज्य
विद्वद् गृहस्थवृन्द शूपारक्षकक्षेत्रस्थितेषु

स्नेहाभिषक्त धर्माधिकारी ज्योतिर्विदुपाध्याय प्रमुख विद्ववृंद श्रीक्षेत्रस्थित कृतानेकशो नतयः क्रमश आशीरायायः शर्मिहे-षासित शिखि तिथ्यंतं वरिवर्ति भावत्रकमाशास्महे विशेषस्तु

तुम्ही पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान विदीत जालें तेथें लिहिलें होतें कीं परशुराम क्षेत्रीं महाराष्ट्र व चितपावन व कऱ्हा-टक ब्राम्हण आणखी जवळ शेणवि व किरवंत व देवरुखे इत्यादिक वेदोक्त कर्माधिकारी अनेक जाती आहेत. त्यामध्यें महाराष्ट्र व चितपावन व कऱ्हाटक या तिहीं जातींमध्यें परस्परें अन्नव्यवहार व पंक्तिव्यवहार परंपरागत चालत असे. इतर जातींमध्यें कोणाचे घरीं अन्नव्यवहार व पंक्तिव्यवहार नाहीं ऐसे असोन सांप्रति देवरुखे यांनीं मुद्गलभटाजवळ येऊन अर्ज करून सांगितलें. जे चितपावन व कऱ्हाटक हे पूर्वीं आमचें घरीं जेवित होते आणि पंक्तिसहि घेत होते त्यास अलीकडे दोनशें वर्षांपूर्वीं अनंतभट्ट चितळे चित्तपावन ब्राम्हण हे मउजे वसणीचें तळें उपशित होते तेथें नियत केला अइसा जे ह्या मार्गें जाईल त्याणें एक पाटी माती खणून तळ्या बाहेर टाकावी अशियासि मानपुरु(ष) तेरा देवरुखा हा त्या मार्गें जात होता. त्यास अनंत भट्टीं आज्ञा केली कीं जे एक पाटी माती टाकून जाणें त्यास त्यानें अवज्ञा केली म्हणउन त्यास

शाप दिला त्यापासून उभयतां आमचे घरीं जेवित नाहीं तरी स्वामीनीं अंगीकार करून आमचे घरीं जेवित असें केलें पाहिजे म्हणवून विज्ञप्ति केली. त्यानं(त)र राजेश्री मुद्गलभट्ट पंडितराय यांशि परशुराम क्षेत्रिंचि व्यवहार विचारणा विदित नसतां त्याचे वचन प्रमाण मानुन अजम शिदि यांशि अनेक पत्रें लिहिलीं ऐसे जे हे देवरुखे उत्तम ब्राह्मण अन्नव्यवहारास योग्य आहेत आम्हीं देशस्थ तों यांचे घरीं जेवितच आहों तरी तुम्हीही ते प्रांतीचे सारे ब्राम्हण मिळऊन यांचे घरीं जेवणें त्यास तेणेंप्रमाणें दाभोळ व राजापूर या दोन सुभ्यांचे ब्राम्हण सारे मेळऊन परस्परें मनास आणितां अनादिसिद्धि जेवित नाहीं. असें चितांत आणून अजमशिर्दि ब्राम्हणास बालिलें ऐसे जे आम्ही तुम्हांस जेववावे तरी हाकिमीच्या बळें जेविलें असें दिसोन येतें. पंडितराय तों लिहितात जे ब्राम्हण उत्तम अन्नव्यवहारास योग्य आहेत अशियाशिं मुकदमा हिंदु महजबा करून फसल होईल तर तुम्ही सारे ब्राम्हण सातेरेयास महाराज राजेश्री छत्रपतिपाशीं जाऊन कजा चुकऊन येणें नाहीं तरी देशांतून जागजागांचिं संमतपत्रें घेऊन येणें. ब्राम्हण जे येथें काजिया चुकेल म्हणऊन बोलिले त्याजवरून आम्ही चितपावन व कऱ्हाटक सारे सातेरेयास हुजूर येऊन राजश्रीस विज्ञप्ति केलि ऐशी जे वेदमूर्ति मुद्गलभट्ट पंडितराय यांहिं पत्रें पाठवून आम्हांस श्रमी केले ( धर्मास श्रमी केलें ) तनिमित्य येथें आलों तरी महाराजाहिं पंडित मिळऊन धर्मशा(स्त्र) न्याय करून आमचा कजिया चुकविला पाहिजे म्हणून विनंति केली त्याजवरी महाराज बोलिले जे मुद्गलभटिं पत्रें लिहीलीं तीं बाष्कळ रद्द असेत म्हणऊन त्याच्या हातुन मुद्रांकित कागद लिहून देविले आणि बोलिले जें आपण ब्राह्मण जातीचा न्याय मनास आणित नाहीं तुम्हीं आपले क्षेत्रीं जाऊन पूर्वापार

व्यवहार चालत असेल त्याप्रमाणें चालविणें असें बोलोन आम्हांस निरोप दिला. यानंतर आम्ही आपल्या क्षेत्रास जाणार तरी संमत्तपत्रें घेऊन गेलें पाहिजे यास्तव तुम्हांस पत्र लिहिलें असे तरी स्वामिनी शास्त्रावलोकन करून धर्मशास्त्रीचीं वचनें लिहून संमत्तपत्र पाठवणें म्हणऊन तुम्ही लिहिलें तरी पत्रार्थ मनास आणितां भानपुरु तेरा यांस अनंतभटिं येक पाटिं मृत्तिके-करितां शाप दिला त्याजवरून साऱ्या देवरुख्यांचे घरीं चितपावन कऱ्हाटक जेवीत नाहींत म्हणऊन देवरुखे मुद्गलभट्टांजवळि बोलिले तर हे गोष्टि असंबद्ध दिसोन येत्ये निमित्य जे ब्रह्मशापेकरून वंशक्षय होतो तर भानपुरुचा वंशक्षय तों झालाच त्याची संतति तो नाहीं म्हणउन परस्परें लोक सांघतात घरीं जेवीत नाहींत व पंक्तीस घेत नाहींत. सबहिष्कार म्हणतात शाप व बहिष्कार यांचा अर्थ एक होत नाहीं हें तो सर्वांस विदित असे. यद्यपि भानु-पुरुस बहिष्कार केला असता तथापि ज्याचा अपराध त्यासच होईल. जातिसि संबंध काय असें याजवरून दिसोन येतें जे हे पूर्वापारच अपांक्त आहेत असें असोन लटका व्यवहार करितात हें सर्वांस कळतच असेल तथापि तुम्ही लिहिलें जे शास्त्रींचीं वचनें लिहोन संमत्तपत्र पाठवून देणें त्याजवरून अनेक पुस्तकें पाहोन धर्मशास्त्रींचीं वचनें लिहिलीं असत त्याजवरून संशय दूर होईल. यास्तव या पत्रिं सिधातवचनें लिहिणें लागलीं येणें प्रमाणें धर्म-शास्त्रें निषिद्ध ब्राम्हण वचनानिं ॥

॥ मत्स्यपुराणे ॥

**त्रिशंकून्बर्बरानंध्रांस्तथा द्रविडकेरलान् ॥**
**कर्नाटकांस्तथाभीरान्कलिंगांश्च विवर्जयेत् ॥१ ॥**

॥ सौरपुराणे ॥

अगंवंगकलिंगांश्च सौराष्ट्रान् गुर्जरांस्तथा ॥
आवंत्यान्मागधांश्चैव ब्राह्मणांश्च विवर्जयेत् ॥ १ ॥

॥ पद्मपुराणे ॥

अंगवंगकलिंगांश्च साल्वमाथुरमागधाः ॥
पाशाशाभिरतौलाश्च चौलत्रिगुडसौपराः ॥
यमलावंत्यसौराष्ट्रा देवराष्ट्राश्च पार्थिकाः ॥
यद्रिका निगलाश्चैव सर्वे ते पंक्तिदूषकाः ॥

॥ यमः ॥

राष्ट्राः कामास्तथोन्मत्ताः सर्वे ते पंक्ति दूषकाः ॥

॥ मनुः ॥

सद्भिश्च निंदीताचाराः स्वकर्मपरिवर्जकाः ॥
चतुराश्रमबाह्याश्च सर्वे ते पंक्तिदूषकाः ॥
यस्तेनः पतितो क्लीबो ये च नास्तिकवृत्तयः ॥
तान्हव्यकव्ययो विप्राननर्हान्मनुरब्रवीत् ॥

॥ स्कांदपुराणे ॥

अन्येपि देवराष्ट्रीया देवराष्ट्रादुपागताः ॥
अपांक्तेया अयाज्याश्च गिरिकांतावरासिनः ॥

इति धर्मशास्त्रपुराणवचनैः देवराष्ट्राणां पंक्तिदूषणमस्त्येव अन्नव्यवहारस्य खपुष्पवदत्यंताभाव एवं ॥ देशाचारतोपि ए ( त ) द्वेश्मनि अन्नव्यवहारो न श्रूयते ॥

तत्र देशाचारग्रामाचारकुलाचारस्यापि प्रामाण्यमस्ति ॥

॥ स्मृत्यर्थ सारे ॥

**सामयाचारिकाधर्मो ज्ञातिऽदेशकुलोद्भवः ॥**
**ग्रामाचाराः परिग्राह्या ये च विध्यविरोचतः ॥**

इत्यनेन वचनेनापि देवराष्ट्रीयानां पंक्तिदूषणं निर्णीतमितिदिक् ॥ पत्र लेखनार्थं प्रमाणमवगम्य सर्व संमतानि लिख्यते शके १६४५ क्रोधी संवत्सरे संमतो यमर्थः सर्वेषां ॥

---

## ( ५ )

## पैठण येथील पत्र शके १६९६; सन १७७४.

श्री

**शिक्का**

श्रीमद्रमारमण प्रसादासादितरमणीय
गुणगणमंडित श्रौतस्मार्तकर्मानुष्ठान-
परायणांतःकरणेषु वेदार्थविज्ञानगत-
परमार्थतत्त्वेषु देवदीक्षितस्वामिचरणेषु

श्रौति मुद्गलभट्ट पंडितरायविरचिता प्रणतिपरंपरा विशेषः— सांप्रत राजद्वारी देवरुखे व चित्तपावन यांचा पूर्वीपासून हर्षामर्ष आहे तो प्रसंग प्रप्त झाला आहे. म्हणोन शामलाभट्टजी गिद्रे वांईकर यांनीं पत्र पाठविलें होतें. तें व हें या उभयतांचें वृत्त मनास आणोन निर्वाह करणें म्हणून त्यास आम्हीं तुमच्या लिहिण्यावरून व शास्त्रसंमतेंकरून पत्राचें उत्तर पाठविलें आहे. देवरुखे यांचा शास्त्रीं पुरावा आहे किंवा नाहीं म्हणून लिहिलेंत तर तुमची कैशी समजुत असेल ती असो. परंतु देवरुखे यांस दोष नाहीं. ते सर्व कर्मांत अधिकारी आहेत व दोहीं वेदीं अध्ययन करितात व श्रौत-

स्मार्तादिक कर्मे करीत आहेत. याविषयीं आपण शंका केली त्यास या शंकेचें कारणहि नाहीं. यास समस्त क्षेत्रांचे विप्रवृंद, शास्त्री, पंडित, दिक्षीत, महाजन, थोरथोर यांची शास्त्रावरून संमतें आहेत याबद्दल मागें तुमचे पत्र आम्हांस आलें होतें त्याचा विचार काशी क्षेत्रीं व नाशिक, त्र्यंबक वगैरे क्षेत्रांत सभा होऊन सर्वांचे मतें देवरुखे ब्राह्मण यांस दोष नाहीं असें ठरलें. चित्तपावन ब्राम्हण हेच उत्तम म्हणून लिहितां परंतु राजपरत्वेंकरून तुम्हांस भासलें असेल. तरी ग्रंथावलोकन विचारपूर्वक करावें म्हणजे ध्यानांत येईल. देवरुखे ब्राह्मण यासीं दोन्ही वेदीं अध्ययन व यागादि उत्तर क्रतु-पावेतों अधिकार आहे. व हे शरीरसंबंधास पवित्र व पंक्तिपावन आहेत, संशय धरूं नये, त्यांचे घरीं अन्नव्यवहार व षट्कर्मास हे अधिकारी आहेत. त्यांची उत्पत्ति देवराष्ट्रपर्वतापासून आहे. वासुदेवभट्टजी चितळे यांनीं याजला तळ्याचे मृत्तिकेकरितां शाप दिला असें ते म्हणतात परंतु शास्त्रसंमतेंकरून दोष नाहीं. कऱ्हाडे ब्राह्मण यांमध्यें त्रिपादे यांजला दोष आहे. याखेरीज जे कऱ्हाडे ब्राह्मण व देशस्थ ब्राह्मण व देवरुखे ब्राह्मण याचे परस्परें शरीरसंबधास विरोध नाहीं. व चित्तपावन हेच अलाहदा आहेत. याशी ग्रंथाधार आहे व त्या ग्रंथांचीं नांवेंः— ॥ विश्वदर्शग्रंथ १ व ज्ञातिमुख २, ज्ञातिपिंदिका ३, ज्ञातिदर्पण, ४, ज्ञातिविवेक ५, सह्याद्रि खंड इ. सहा ग्रंथांचीं नांवें लिहून पाठविलेलीं आहेत. येथें हरि दिक्षित नेवासकर, काशिकर व कृष्णदीक्षित सौत्रामणी आरेकर व विश्वनाथ दीक्षित गोंधळेकर आदीकरून पूर्वी गागाभट्टजी दीक्षित यांणीं पैठण मुक्कामीं सभा करून सातारा येथें पत्र पाठविलें व शामलाभट्टजी गिद्रे वांईकर यांस दिलें असे सर्वज्ञा-प्रति प्रमाणें काय लिहिणें हे विज्ञप्ति ५ मिति आश्विन शुद्ध १०

दशमी शके १६९६ गागा भटजी दीक्षित व्यास पैठणकर याणीं लिहून दिलें असे; हें लिहिलें सत्य-मार्ग शंकराचार्य विश्व केशवाचार्य पंडित यांणीं मौजे कालें येथें सभा केली होती तीहि पाहोन हाली मुद्गलभट्ट पंडित याणीं आपलें समत लिहिलें असे.

गागाभट दीक्षित व्यास पैठणकर

हस्ताक्षर खुद्द.

---

इतिहाससंशोधक राजवाडे यांचा लेख "देवरुखे यांची उत्पत्ति"

शक १८३६; सन १९१४.

ज्ञानकोश शक १८४७ सन १९२५.

---

## रा० माधवराव पिंपुटकर, उंबरगांव, यांचे घरीं सांपडलेला जुनापुराणा कागदाचा तुकडा.

नत भट चितले याचे ............

लप गणेशभट चितले ला ( क ? )............

यात होते त्यास सज ( न ? ) समज खाशेर मी...

या व आलफै मधे किले आजणवेलीचे मुकामी आणउन ये बावीची हकीकत पुसीली त्यावर त्याही तकरार लेहून दिल्ही आसे की आनतभट चीतले आपले पणजे हे मौजे बसणी ता। मार येथील तले मातीनें होरले होते ते उसपोन पाणी करावे म्हणोन गावकरी लोक व आणखी गावचे लोकास आखी (?) काम म्हणउन बोलावून आणून माती उस

पिता तेरे देवरुखे देसाई तो मदंदाबाद हे घोड्या-
वर बैसोन सोबत लोक आसे प्रभावलीस माहालास
सर हवालदार ... ... ... ... ... ... ...
फसल करावे असे केले आसे आमा(?)सरकार तर्फेचे
हुकुमाचा हुजुर कोणी आणतील सबब देवरुखे ब्राह्मण
याही सुभा किले आजणवेळीचे मुकामी येउन सर
हुर (हुजुर?) हकीकत जाहीर केली त्याजवरोन
फर्माविले जात असे तर देवरुखे ब्राह्मणाचे जातीचे
दुसरे ब्राह्मण जातीचा द्वेष आहे तो मोडून खाना-
पिना दुरास्त चाले असे केले पाहिजे सरकार तर्फेचा
हुकुमाचा उजुर ये बाबे दिलात अणिलाज पाहिजे
दराज काय लिहिणें रसमा छ २७ माहे मोहर सन
५ जुलीस मोर्तब असे.

REFBK-0003131

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3937

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| १ | २२ | नष्टचयेचे | नष्टचर्येचे |
| २ | अनुक्रमणिका | निषयानुसंधान | विषयानुसंधान |
| ३ | २१ | ' वरुखे ' | ' देवरुखे ' |
| ८ | २१ | पळशे | पळशीकर |
| १७ | ५ | गोडेबोले; | गोडबोले |
| १७ | ६ | गोविंदभट्ट, | गोविंदभट्ट; |
| १९ | १५ | क ( अ ? ) | क अ (?) |
| २० | २५ | अवलोकन पूर्ण | पूर्ण अवलोकन |
| २३ | १२ | १३४६ | १६४६ |
| ४६ | १५ | देवरुखचें | देवरखचें |
| ४६ | १६ | देवरख | देवरुख |
| ४६ | २० | ही | ही. |
| ६६ | १४ | डलेला | घडलेला |
| ७८ | २ | १५७२ | १५७९ |
| ९२ | १ | मदंदम्बादँ | महंदाबाद |